# **प्रकरण 2**
# **पौवात्यवाद भारतीय इतिहास लेखनातील प्रवाह**
# *Oriantalism*

प्रस्तावना:-

'ओरीयंटालीझम' हा इंग्रजी भाषेतील शब्द आला की, विद्यार्थी आणि शिक्षकही दचकतात. कारण इझम म्हटले की, त्यांना वाटते एखादे मुलभुत कींवा जटिल तत्व त्यात अनुत्सूत असावे. मात्र ओरीयंटालिझम या इंग्रजी शब्दाची उत्पत्ती '*Orians*' या लॅटीन शब्दापासून झाली आहे. या शब्दाचा अर्थ उदय असा होतो. शिवाय या शब्दातील '*Oriant*' या शब्दाचा अर्थ 'पौवात्य जग' अथवा ' उगवत्या सूर्याकडील जग !' असा होतो. हि संज्ञा स्थूलमानाने पाश्चात जगापासून दूर असलेल्या अशियाबाबत वापरली जात असली तरी या संज्ञेने प्रामुख्याने अशियाई देर्शाचा म्हणजे जपान, चिन, भारत या अशियायी राष्ट्रचा निर्देश होतो. या संकल्पनेविषयी चिकित्सक स्पष्टीकरण 'डॉ एडवर्ड सैद' यांनी आपल्या ' ओरीयंटालिझम' या ग्रंथात केली आहे. ते म्हणतात '*Orientalism can be discuss and analysed as the Corporate institution for dealing with the orient*' अशी ओरीयंटालिझमची ते व्याख्या करतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, पौवात्य जगाविषयीचा विचार अगर दृष्टीकोन म्हणजे ओरीयंटालिझम होय.

प्राचीन काळी पौवात्य जगाला पुर्वेकडील देशांविषयी अस्पष्ट अशी कल्पना होती. मध्ययुगात अरब लोकांनी चालविलेला व्यापार पाश्चात्य आणि पौवात्य जगाला जोडणारा दुवा ठरला. पुढे युरोपात झालेल्या धर्मयुद्धांच्या काळात पाश्चात्य जगाला पौवात्य जगाची माहिती झाली. या कालावधीत पुर्वेकडील जगाच्या संपन्नतेची, भारतातील समृद्धीची तसेच भारतीय संस्कृती भिन्न असल्याची कल्पना पाश्चात्यांना आली. तरीही पुर्णपणे पौवात्य जगाची माहीती पाश्चात्यांना झाली नाही. ग्रिक आणि रोमन वाड्.मयात विखुरलेल्या संदर्भावरुन पाश्चात्यांनी भारतविषयक ज्ञानाची चाचपणी केली. या विद्याअभ्यासात खिश्चन मिशनरी अग्रेसर होते. 'केरळच्या मलबार भागात कार्य करणाऱ्या खिश्चन धर्मप्रचारकांनी संस्कृतच्या अभ्यासाला सुरुवात केली आणि कोरडू या पाद्रयाने संस्कृत ग्रंथांचा अभ्यास करुन संस्कृतचे पहिले व्याकरण प्रकाशित केले.' यानंतर भारतीय विद्या (*Indology*) अभ्यासाला सुरुवात झाली. मार्कोपोलो सारखे प्रवासी आणि ख्रिस्ती मिशनरी यांच्याकडून मिळालेल्या पुर्वीय देशांविषयीच्या त्रोटक माहितीमुळे, या प्रदेशाबाबतचे एकप्रकारचे गुढरम्य आकर्षण पाश्चात्य जगात निर्माण झाले. या संपन्न प्रदेशाशी व्यापार करण्याच्या हेतूने आलेल्या पाश्चात्य व्यापारी मंडळीला या प्रदेशाची सर्वांगीण भौगोलिक, राजकिय, सामाजिक आणि सांस्कतीक माहिती करुन घेणे आवश्यक वाटले. आजवर अज्ञात असलेल्या या भागातील समाज, संस्कृती, कला, विद्या, वाड्.मय, तत्वज्ञान, धर्म, जीवनपद्धती या बाबत जी जिज्ञासा निर्माण झाली, त्यात पौवात्यवादाचा आणि पौवात्यविद्याअभ्यासाचा उगम अढळून येतो.

पौवात्य जगाविषयीचा व लेखनाविषयीचा विचार १८ व्या शतकात पुढे आला. १८ वे शतक हे इंग्लडमधील वैचारीक प्रबोधनाचे युग होते. भारतात नुकत्याच स्थिरस्थावर झालेल्या ब्रिटीश ईष्ट इंडीया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी प्राचीन भारतात जी मोठ्या प्रमाणावर साहित्यनिर्मिती झाली होती. त्यात वैदीक साहित्य, पुराणग्रंथ, तत्वज्ञानात्मक ग्रंथ, या ग्रंथसाहित्याचा अभ्यास स्वतःहाच्या राजकिय आणि आर्थिक फायद्यासाठी केला असला तरी त्यातून भारतीय संस्कृतीची ओळख जगाला झाली. युरोपातील तरुणांनी अज्ञाताचे ज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा, बुद्धीनिष्ठा, विवेकवाद, शास्त्रीय दृष्टी, ही प्रबोधनाची वैशिष्ट्ये या तरुण पिढीने आत्मसात केली होती. शिवाय भारतावर मुठभर इंग्रजांनी राज्य करावयाचे म्हणजे येथील सामाजिक व्यवस्था, रुढी, धार्मिक संस्था, नितीमुल्ये, साहित्य, शासनपद्धती यांचे ज्ञान असणे निकडीचे होते. या सर्व बार्बीचे ज्ञान नसल्यास कायदे करणे धोक्याचे होणार होते. कंपनी शासनाला स्थानिक लोकांचा विरोध होणार नाही याची खात्री नव्हती "प्लासी युद्धानंतर काही वर्षाच्या कालावधीत प्रशासकिय कामकाज स्थानिक दुय्यम अधिकाऱ्यांच्या मदतीने चालविण्याचे धोरण कंपनी सरकारने अंवलंबीले. परंतु इंग्रजांच्या हाताखाली काम करणारे लोक आपल्याला पुरेसे सहकार्य देत नाही, मागीतलेली माहिती पुरवत नाही, आदेशांची अम्मलबजावणी करीत नाही. अशा तक्रारी अधिकारी करु लागले." या दृष्टीने दुय्यम भारतीय अधिकाऱ्यांवर विसंबून

राहून चालणार नाही. महत्वाची कामे इंग्रज अधिकाऱ्यांनी करणे श्रेयस्कर ठरेल. म्हणून भारतीय भाषांच्या आणि भारतीय विद्याअभ्यासाला त्यांनी सुरुवात केली.

प्राच्यविद्या अभ्यासक कोणाला म्हणावे हा सुद्धा एक यक्षप्रश्न आहे. काही वेळा १८ व्या शतकातील चार्लस विल्किन्स, विल्यम जोन्स (१७४६-१७९४) हेनरी स्थामस कोलब्रुक, मॅक्स मुलर (१८२३-१९००) विल्यम रॉबर्टसन, होरेंस विल्सन, जेम्स प्रिन्सप, अलेकझांडर कनिंगहम, ॲनक्विटेल ड्युपरौ, युजिन बरनॉफ, ओल्डनबर्ग, न्हिस डेविस, इ. प्राच्यविद्या अभ्यासकांना *Oriantalist Scholar, Ideologist* उद्देशून शब्दप्रयोग केला जातो. पुर्वेविषयीच्या जिज्ञासेने, तसेच ब्रिटीशांच्या प्रशासकिय गरजेपोटी, त्यांनी पूर्वेचा संशोधनपर अभ्यास आरंभ केला. किंबहूना प्राच्यविद्येची व भारतविद्येची एक स्वतंत्र ज्ञानशाखाच विकसित केली.

भारतात ब्रिटीश सत्तेची घडी बसत असतांना परकिय सत्ताधारी गोटात प्रशासन आणि शिक्षणाबाबत विभिन्न मतप्रवाह होते. त्यातील एक संप्रदाय म्हणजे उपरोलिख्खीत प्राच्यविद्या अभ्यासकांचा संप्रदाय, जो भारतीय संस्कृती आणि परंपरेविषयी आदर बाळगुन होता. तसेच भारतीयांना लोकभाषेद्वारे नवशिक्षण देण्यास अनुकूल होता. भारतात घडवून आणण्याच्या बदलांबाबत तो इंग्लडमधील 'एडमंड बर्क' सारख्या परंपरावादी विचारांशी सहमत होता. वेगाने कृत्रीम बदल लादण्याऐवजी भारतातील संस्था, परंपरांमधील काही आशय टिकवून, त्याचा पाश्चिमात्य संस्था-परंपरांशी गरजेनुरुप मेळ घालुन धिमेपणाने सुधारणा राबविण्यास तो अनुकूल होता. एलफिन्स्टन, मनरो, मॅटकॉफ आदी भारतातील इंग्रज प्रशासकांचा कलसुद्धा याच भुमिकेकडे होता. आरंभकालीन प्राच्यविद्या अभ्यासकांवर तत्कालिक स्वच्छंदतावादाचा प्रभाव होता. तर दुसरा संप्रदाय आग्लवादी म्हणून ओळखला जातो. जेम्स मिल, लार्ड मेकॉले, विल्यम बेंटीग, यांच्यासारख्या प्रशासकांचा यामध्ये समावेश करता येईल. हे आग्लवादी भारताला आणि भारतीय संस्कृतीला हिन लेखणारे होते. 'हिंदू संस्कृती' ही मूळात संमृद्ध आहे पण ती आता क्षीण आणि मलिन झालेली आहे. असे आरंभकोलीन प्राच्यविद्या अभ्यासक मानत असत. तर ती मुळातच क्षिण आणि मलिन असल्याचा आंग्लवाद्यांचा दावा होता. " इंग्रजी शिक्षणाद्वारे पाश्चात्य ज्ञान-विज्ञानाचा प्रसार करुन या देशाला वेगाने सुसंस्कृत आणि आधूनिक बनविले पाहिजे, जेथे पाश्चात्य मुल्ये, परंपरा व संस्था रुजवल्या पाहिजेत, भारतीयांचे आग्लीकरण केले पाहिजे." अशी त्यांची ठाम धारणा होती. जेम्स मिलचा 'भारताचा इतिहास' (१८१८) लार्ड मेकालेचे शिक्षर्णावषयक टिपण (१८३५) यातून त्यांच्या भुमिकेचा प्रत्यय येतो. मेकॉलेने १८३५ मध्ये म्हटल्याप्रमाणे, ब्रिटीश राज्यकर्ते व भारतीय जनता यांच्यामधील मध्यस्तांचा असा वर्ग निर्माण करणे निर्माण करणे ब्रिटीशांना अभिप्रेत होते की, 'जो वर्ग रक्ताने आणि रंगाने भारतीय असेल पण त्यांच्या आवडीनिवडी, मते, नितीनियम आणि बुद्धीमत्ता इंग्रजी असेल.' आग्लवादी भुमिका मांडणारे विचारवंत, प्रशासक हे मुलतः उदारमतवाद (*liberalism*) आणि उपयुक्ततावाद (*Utilitarianism*) विचारप्रणालीचे उपासक होते. तिसरा संप्रदाय शुभवर्तमानवादी (*Evangelical*) संप्रदाय मुलतः ख्रिस्ती मिशनरींचा संप्रदाय होता. खुद्द इंग्लडमध्ये शुभवर्तमानवाद्यांचे उदारमतवादी व उपयुक्ततावादी संप्रदायाशी बरेच मतभेद होते. परंतु भारतात मात्र ब्रिटीश साम्राज्याच्या छत्राखाली या तिनही गटांच्या धार्मिक व आर्थिक हितसंबंधाची युती घडून आली. भारतीय संस्कृती व धर्म हे चार्लस गॅट व विल्यम विल्बरफोर्स आदी शुभवर्तमानवाद्यांचे टिकेचे लक्ष होते. मात्र या बाबतीत आग्लवाद्यांशी त्यांचा मेळ होता. किंबहूना शुभवर्तमानवाद्यांचा भारतविषयक दृष्टीकोन आग्लीकरणवादीच होता.

एकंदरीत प्राच्यविद्या अभ्यासक आणि आंग्लवादी असे दोन ठळक गट मानले तर त्यांच्या पूर्वेविषयीच्या दृष्टीकोनामध्ये भिन्नता होती. परंतु मुलतः हे दोन्ही गट पाश्चात्य सम्राज्यवाद्यांचे प्रतिनिधी होते., समर्थक होते. पुर्वेकडे पहाण्यासाठी पश्चिमी वर्चश्ववादाचा चष्मा त्यांनी लावलेला होता. त्यामुळे या प्राच्यप्रणालीकारांमध्ये सर्वांचाच समावेश एडवर्ड सैद हा अभ्यासक करतो. एवढेच नव्हे तर भारताच्या स्थगिततेविषयी भाष्य करणाऱ्या हेगेल व मार्क्सला सुद्धा तो या परंपरेत नेवून बसवतो. स्वाभाविकपणे पश्चिमी दृष्टीकोनातूनं पूर्वेचा अभ्यास करणारे पश्चिमी विचारक, सम्राज्यवादी, प्रशासक, लेखक, कलावंत, धर्मप्रसारक व विचारवंत यांचा समावेश होतो. सैद यांच्या विवेचनामुळे प्राच्यप्रणाली व प्राच्यप्रणालीकार या शब्दांना विशीष्ठ अर्थ प्राप्त झाला आहे. अल्बर्ट हैरानी यांनी म्हटल्याप्रमाणे "सैद

यांच्या ग्रंथामुळे प्राच्यप्रणाली हा शब्द इतका आरोप व शिवीमय *(A Term of Abuse)* झाला आहे की, त्याचा सर्वमान्य आणि टतस्थ मार्गाने वापर करणे दुरापास्त झाले आहे." त्यामुळे रा. गो. भांडारकर ते रा. ना. दांडेकर या भारतीय प्राच्यविद्यावंत परंपरेला काय म्हणावयाचे आणि न्यायमुर्ती रानडे ते आर. सी. मुजुमदार या राष्ट्रवादी, दा. घ. कोसंबी ते रोमिला थापर या मार्क्सवादी, रणजित गुहा व गायत्री स्पिवेंक यांच्या वंचितवादी, महात्मा फुले, अंबेडकर, ते कॉम्रेड शरद पाटील अशा विद्रोही प्रतिसंस्कृतीवादी, परंपरांच्या पूर्वभारतविषयक व भारतविषयक प्रतिपादनाची दखल कशी घ्यावयाची, हा मोठा यक्षप्रश्नच आहे. त्याची दखल भारतीय इतिहासलेखन शास्त्रात घेणे आवश्यक आहे. या मुद्याची सविस्तर चर्चा येथे

अभिप्रेत नाही मात्र " देशांतर्गत प्राच्यप्रणाली " या चर्चाविश्वाचे दालन खुले झाले पाहिजे असे वाटते. प्राच्यप्रणालीचा विचार करतांना सैद यांचे विवेचन लक्षात घेणे आवश्यक आहे. ते नमुद करतात की, "प्राच्यप्रणालीचा ज्ञानकोषीय इतिहास लिहू पहाणे मला मुर्खपणाचे वाटत आहे." त्यांचे विवेचन अरब जगत व इस्लामच्या आग्ल-फ्रेंच व अमेरीकी अनुभवावर अधारलेले होते. या संदर्भातील गरजेनुरुपच तो इराण, भारत इ. पौवात्य देशांचा विचार करतो. त्यामुळे त्याच्या विवेचनातील अनेक तपशिल आणि उदाहरणे प्राच्य देशांच्या अभ्यासाकरीता उपयुक्त नसले तरी प्राच्यप्रणालीविषयक त्याचे सर्वसाधारण भाष्य महत्वाचे आहे. त्यामुळे या भाष्याची निदान गोळावेरीज तरी देणे महत्वाचे वाटते.

मिशेल फुकोची ज्ञान, सत्ता, सहयोगाची कल्पना *(Knowledge, Power and Relationship)* पूर्व पश्चिम द्विधृवीतेचा विचार *(Binary Opposition)* मिशेल फुकोची विचारव्युहाची कल्पना, *(Discourse)* आणि अँन्टोनियो ग्रामशीची धुरीणत्वाची *(Hegemony)* एडवर्ड सेदच्या विवेचनाला आधारभुत आहे. पूर्व ही प्राचीन काळापासून पाश्चात्यांसाठी स्वप्नभुमी होती. आधुनिक युगाच्या आरंभकाळात पाश्चात्यांनी ही भुमी अंकीत केली. पुर्वकडील प्रभुत्वसंपादनाच्या प्रक्रियेतच प्राच्यप्रणाली अंर्तभुत होती. पूर्व आणि पश्चिम या निव्वळ भौगालिक दिशा नव्हेत, तर ती एक मानसिक आणि सांकृतीक निर्मीती आहे., ते एक कल्पित वास्तव आहे. पूर्व ही पश्चिमेची विभेदी प्रतिमा आहे. पूर्व प्रणाली ही पूर्व आणि पश्चिम यांच्यातील अस्तित्वशास्त्रीय *(Ontological)* आणि ज्ञानशास्त्रीय *(Epistemological)* विभेदावर अधारीत विचारशैली आहे. पुर्वशी व्यवहार करण्याची ती एक सामुदायीक संस्थाच *(Corporate Institution)* आहे. पुर्ववरील प्रभुत्व, पूर्वेची पुर्नघडण, आणि पुर्वेवरील सत्ता यांची ती पाश्चात्य शैली आहे. ज्यांच्याद्वारे पाश्चात्य संस्कृतीने, राजकिय, समाजशास्त्रीय, लष्करी प्रणालीय, शास्त्रीय या प्रमिभा पद्धतीने ज्ञानोदयोत्तर काळात पुर्वशी व्यवहार केला. किंबहूना पुर्व निर्माण केली असा विचारव्युह *(Discourse)* म्हणजे प्राच्यप्रणाली होय. प्राच्यप्रणाली मुख्यतः आग्ल आणि फ्रेंच यांचा सांकृतिक उद्योग होता.

१९ व्या शतकाच्या आरंभापासून दुसऱ्या महायुद्धापर्यंत इंग्लड व फ्रान्सने पुर्वेवर व पूर्वविषयक प्रणालीवर सत्ता गाजविली. दुसऱ्या महायुद्धानंतर हे प्रभुत्व अमेरीकेकडे जावू लागले. पश्चिमेचे पूर्वेशी असणारे नाते हे सत्तेचे, वर्चश्वाचे आणि धुरीणत्वाचे नाते होते. या नात्याने निर्धारीत केलेल्या नजरेतून पूर्वेची निर्मिती झालेली होती. म्हणजे एका अर्थाने "पूर्वेचे पौवात्तीकरण" झालेले होते. प्राच्यप्रणाली ही काही निव्वळ पाश्चात्य भुलथापांची चळवळ नव्हती, ती काही पुर्वेबद्दलची अद्‌भुतरम्य कथाही नव्हती तर ती सिद्धांत आणि व्यवहाराची एक देहाकृती होती. यामध्ये पाश्चात्यांच्या काही पिढ्यांनी भलीमोठी भौतिक गुंतवणुक केली होती. प्राच्य-प्रणाली हे पाश्चिमात्यांच्या पुर्ववरील सांकृतिक धुरीणत्वाचे *(Cultural Hegemony)* प्रतिक होते. प्रत्येक प्रणालीकार हा पुर्वमध्ये निश्चित स्वरुपाचे हितसंबंध गुंतलेल्या सत्तेचा प्रतिनिधी होता. आणि हे अगदी ग्रिक कवी होमरच्या काळापासून चालत आलेले दिसते. युरोपचे आणि अमेरीकेचे पुर्वेतील हितसंबंध हे राजकीय होते हे उघड दिसते. परंतु खरे तर त्यांच्या संस्कृतीने हे हितसंबंध निर्धारीत केले होते. आणि पाशवी अशा राजकीय, आर्थिक आणि लष्करी समर्थनाबरोबरच सांस्कृतीक समर्थनाचा जो गतिशिल खेळ चालु होता, त्यातून पूर्व हा प्रणाली क्षेत्रातील विविधतापुर्ण व व्यामिश्र आवकाश बनला. प्राच्य-प्रनाली हे आधुनिक राजकिय, बौद्धिक संस्कृतीचे एक उसउसीत रुप बनले. प्राच्यप्रनाली हे आग्ल, फ्रेंच व अमेरीकी साम्राज्यामुळे आकाराला आलेले राजकिय हेतू आणि व्यक्तीगत लेखक यांच्यातील गतिशिल विनिमय होता. या तिन

सम्राज्यांच्या बौद्धिक आणि काल्पनिक आवकाशातच प्राच्य-प्रनालीय लेखन झालेले होते. एकंदरीतच प्राच्य-प्रनालीचा गृहिताधार बाह्यकेंद्री होता. प्राच्य प्रनालीकार हा तन-मनाने पुर्वेच्या बाहेरचा असतो. त्यामुळे प्राच्य-प्रनालीद्वारे पुर्वेचे उपरे दर्शन अथवा चित्रण दिसते. अशा उपऱ्या सांस्कृतिक विचारविव्हातून ते वितरीत केले जाते. ते सत्य नसते तर ते बहुविध चित्रण असते. प्राच्य- प्रनालीच्या आरंभिक टप्यापेक्षा आधुनिक टप्प्यात अशा प्रतिनिधीक चित्रणांचा रंगपट अधिक विस्तारला. पाश्चिमात्य संस्कृतीवर प्रभाव गाजविणाऱ्या कल्पना, सिद्धांत आणि प्रवाह यांच्याकडून प्राच्य प्रनाजलीने खुप काही ग्रहण केले. त्यामुळे पूर्व ही भाषाशास्त्रीय पूर्व, स्पेंगलरी पूर्व, फ्राइंडी पूर्व, स्पेंगलरी पूर्व, डार्विनी पूर्व, इ. होती आणि आहे. पण ती कधीही निभिळ, अनिबंध आणि अभौतिक पूर्व मात्र नव्हती.

प्राच्य- प्रनाली म्हणजे केवळ कल्पना व विचारांच इतिहास नव्हे, तर तिचे भौतिक अंगही महत्वाचे आहे असे सैद यांना वाटते. म्हणूनच त्यांनी असेही नमूद केले आहे की, "माझा दृष्टीकोन हा इतिहास आणि मानवशास्त्र यांचा संकरीत दृष्टीकोन आहे. त्यामध्ये विद्वानांच्या ग्रंथाप्रमाणे साहित्य, राजकिय ग्रंथ, वृत्तपत्रीय लेखन, प्रवासवर्णने आणि धार्मिक तत्वज्ञानात्मक अभ्यास, या सर्वांचीच दखल घेतलेली आहे. सैदवर फुकोचा प्रभाव असला तरी फुकोपेक्षा एका बाबतीत सैदची विचार भिन्नता आहे. एरवी निनावी संहिता संग्रहातून साकारणाऱ्या प्राच्य प्रनाली सारख्या विवेचक निर्मितीवर सैदच्या मते मात्र काही लेखकांचा ठसा उमटलेला आहे. तरीही सैद भल्यामोठ्या संहिता सांभाराचे विष्लेषण यासाठी करतात की, या संहिता परस्पर संदर्भ देणा-या आहेत. त्यांच्यामते प्राच्य-प्रनाली ही ग्रंथ व ग्रंथकारांच्या उधृतांची एक व्यवस्था आहे." लेखकाचे व्यक्तीगत लेखन एखादा ग्रंथ आणि त्याला सामावणारा एकत्रित संहिता सांभार यांच्यातील द्वंदात्मकतेचा शोध सैदला महत्वाचा वाटतो. अर्थात सैदच्या मते अनेक ग्रंथकारांचा परामर्श घेवूनही त्यांचा प्राच्य प्रनालीवरील ग्रंथ म्हणजे या विषयाच्या एका दिर्घ चर्चाप्रक्रियेचा एक हप्ता असल्याचे समाधान ते मानून घेतात. या साऱ्या उद्योगाचा सैद यांनी नमुद केलेला उद्देश फार व्यापक आहे. आणि इतिहास लेखनशास्त्रीय दृष्ट्या तो मोलाचाही आहे. पूर्व पश्चिमेच्या द्वंदात्मक द्वैताची मांडणी ही त्यांच्यामते दिशाभुल करणारी आहे. परदेशी राष्ट्रवादाला विरोध करुन ते बहूसंस्कृतीवादाचा पुरस्कार करतात. सैद यांचा प्रमुख उद्देश म्हणजे प्राच्य-प्रनालीला असा एक समकालीन पर्याय उभा करणे जो एका उन्मुक्त, दमनरहीत, निष्कपट दृष्टीकोनातून परक्या संस्कृतीचा आणि जनसमुहांचा अभ्यास करु शकेल. मात्र या उद्दीष्टपूर्तीच्या अधुरेपणाने आलेले आवघडलेपणही सैद नमुद करतात. "आपल्या स्वत्वात नाव-गाव विरहीत अनंत पाऊलखुणा पेरणाऱ्या ऐतिहासिक प्रक्रियेचा वेध घेवून त्याद्वारे आत्मशोधाचा जागर करणे हा कोणत्याही चिकित्सक विवेचनाचा आरंभबिंदू असतो. असे ग्रामशी मानतो. मात्र त्यासाठी पाऊलखुणांची शोधीका तयार करणे त्याला गरजेचे असते. " सैदच्या मते त्यांनी केलेल्या प्राच्य प्रनालीचा अभ्यास एकप्रकारे आत्मशोधीकाच आहे.

सैद ज्यांना प्राच्य-प्रनालीकार म्हणतात, त्यांचा इतिहासविषयक दृष्टीकोन साम्राज्यवादी होता. पश्चिमी 'स्व' व पौवात्य 'पर' यांच्यात विषमद्वैत निर्माण करणारा असा हा दृष्टीकोन होता. पाश्चात्य म्हणजे श्रेष्ठ, उद्योगी, आणि आधुनिक तर पौवात्य म्हणजे हिन, आळशी आणि मागासलेले अशी त्यांची धारणा होती. भारत आणि अरेबियातील एकत्रित ज्ञानभांडारापेक्षा युरोपीयन ग्रंथसंग्रहाचे एक कपाटसुद्धा अधिक श्रेष्ठ होय ? हि मेकॉलेची धारणा प्रातिनिधीक म्हणावी लागेल.' प्राच्य-प्रनालीकारांनी केलेल्या प्राच्यविद्या व्यासंग ही काही निरागस निरुपद्रवी ज्ञानसाधना नव्हती तर 'बर्नाड कोव्हन' यांनी म्हटल्याप्रमाणे "प्रभुत्वाची भाषा निर्माण करण्यासाठी त्यांनी देशी भाषांवर प्रभुत्व निर्माण केले होते. किंबहूना पौवात्य भाषा, इतिहास, संस्कृती, कायदा यावरील प्रभुत्वाद्वारे प्रभुत्वाची भाषा, प्रभुत्वदायी इतिहास, प्रभुत्वदायी संस्कृती, व प्रभुत्वदायी कायदा निर्माण करावयाचा होता." प्राच्य-प्रनालीकार हा जणू दुर्बोधता, परात्मकता आणि विचीत्रपणातून पूर्वेची मुक्तात करणारा नायक आणि नव्या जगाचा ऐहिक निर्माताच होता. इतिहासहीन पूर्वेला इतिहास दिल्याचा त्यांचा दावा होता. प्राच्य-प्रनालीकारांच्या दृष्टीने इतिहास हे पूर्वेवरील सांस्कृतिक धुरीणत्वाचे साधन होते. या इतिहासाद्वारे पाश्चिमात्यांचे श्रेष्ठत्व आणि पौवात्यांचे हिनत्व अधोरेखीत करण्याचा आणि दुहीची बिजे पेरण्याचा प्रयत्न त्यांनी केला. प्राच्यविद्याकारांनी केलेल्या 'शकुंतला' या ग्रंथाच्या भाषांतरावरील व्हिक्टोरीयन मुल्यांचे आवरण, जेम्स मिलने केलेली भारतीय इतिहासाची कालविभागणी, इ. द्वारे पेरलेली दुहीची बिजे, गँट डफने मराठ्यांच्या

उदयाबाबत मांडलेला वणवा सिद्धांत, ही उदाहरणे त्याचीच द्योतक म्हटली पाहीजेत. 'गौरी विश्वनाथन' यांचा शब्दप्रयोग वापरुन असे म्हणता येईल की, "प्राच्य-प्रनालीकारांचा इतिहास म्हणजे विजयासाठीचा व प्रभुत्वाचा दिखावू मुखवटा होता." प्राच्यप्रनालीकारांच्या विचारव्युहाची तसेच एडवर्ड सैद व ब्रायन टर्नर सारख्यांनी प्राच्यप्रनालीबाबत केलेल्या मांडणीची सखोल आणि विविधांगी मिमांसा शिकागो संप्रदायाने केलेली आहे. हेगले आणि मार्क्स प्रणीत भारतीय स्थगिततेचे मिथकही आता नाकारले जावू लागले आहे. सबाल्टर्न तथा वंचीतवादी, स्त्रीवादी संप्रदायांनीही आपले मुद्दे जोरकसपणे मांडले आहेत. केट क्यूरी लिखीत "*Beyond Oriantalism*" या सारख्या ग्रंथाद्वारे प्रतिमिमांसा प्रवाहाचे दर्शन घडू शकते.

**काही महत्त्वाचे पौर्वात्यवादी लेखक :**

प्राचीन भारताच्या अध्ययनात रुची घेणारा इंग्रज अधिकाऱ्यांचा वर्ग साधारणतः इ.स.१७७० पासून सक्रिय झालेला आढळतो. ह्या अध्ययनासाठी संस्कृत व फारसी भाषांचा अभ्यास आवश्यक असल्याने ह्या भाषा अवगत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. बंगालचा त्यावेळेचा गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याने फारसी भाषेचा अभ्यास केला. ह्या भाषेच्या अध्ययनाला प्रोत्साहन देण्यासाठी त्याने १७८१ साली कलकत्त्याला मदरसा स्थापन करण्यात पुढाकार घेतला. बनारसला कंपनी सरकारचा रेसिडंट म्हणून काम करीत असलेल्या जोनाथन डंकनने प्राचीन भारतीय विद्येच्या पुनरुज्जीवनाचे महत्त्व प्रतिपादन केले आणि बनारसला १७९१ साली संस्कृत पाठशाळा स्थापन केली. प्राचीन भारतीय विद्येच्या अध्ययनाला उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक प्रोत्साहन दिल्यामुळे ह्या प्रवाहाला चालना मिळाली. चार्लस् विल्किन्स याने संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवून गीतेचा इंग्रजीत अनुवाद केला. ह्या अनुवादाने वॉरन हेस्टिंग्ज इतका प्रभावित झाला की त्याने इंग्लंडला पाठविलेल्या काही पत्रांत गीतेतील वचने उद्धृत केलेली आढळतात. भारतीय भाषांच्या व विद्यांच्याअध्ययनाचे महत्त्व तो इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनावर बिंबवीत असे.

**रॉबर्ट ऑर्मे** (*Robert Orme) :-*

१७६९ साली कंपनीतर्फे इतिहासलेखक म्हणून नियुक्ती झाली त्याचे भारताच्या इतिहासाविषयीचे दोन ग्रंथ '*A History of the Military Transactions of the British Nation in Hindostan*' आणि '*Historical Fragments of the Mughal Empire, of the Marathas and of the English concerns in Hindostan*' हे याच सुमारास लिहिले गेले. प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीविषयी तो उपहासात्मक विधाने करतो. विलियम रॉबर्टसन याने लिहिलेल्या '*Historical Disquisition Concerning the knowledge which Ancients Had of india*' या ग्रंथात ग्रीक व रोमन ग्रंथांतून आलेली भारताबाबतची माहिती संकलित केली. फ्रान्सिस ग्लाडविनने '*History of Hindostan*' हा ग्रंथ १७८३ साली आणि त्यानंतर अबूल फजलच्या ऐनी अकबरीचा संक्षिप्त अनुवाद तयार केला, तर नथानिअल हालहेडने १७७८ साली हिंदू कायद्यावर व नंतर बंगाली भाषेच्या व्याकरणावर अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला. ह्या लेखकांनी प्राचीन भारताच्या इतिहासाची मळवाट तयार केली. हा प्रवाह प्रभावी बनला तो सर विलियम जोन्स यांचे भारतात आगमन झाल्यानंतर!

**सर विलीयम जोन्स** (*William Jones) :-*

प्राचीन भारतीय संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचे खंदे पुरस्कर्ते आणि भारतातील प्राच्यविद्येचे जनक असल्याचा मान सर विलियम जोन्स यांचा आहे. कलकत्त्याला स्थापन झालेल्या न्यायालयाचे पहिले न्यायाधीश म्हणून इ.स. १७८३ मध्ये त्यांची नियुक्ती झाली. त्यापूर्वी ऑक्सफर्ड विद्यापीठात विद्यार्जन करीत असतानाच ते प्राच्यविद्येकडे आकर्षित झाले होते. तेथेच अरेबिक व फारसी भाषेचा अभ्यास त्यांनी केला. भारतात आल्यानंतर ते साहजिकच प्राचीन भारतीय विद्येकडे वळले. प्राचीन भारतीय संस्कृती संपन्न आहे, मात्र तिची सलग माहिती उपलब्ध नसल्यामुळे प्राचीन साहित्याच्या अध्ययनातून ती उभी करावी लागेल याची त्यांना जाणीव झाली. यासाठी त्यांनी वैयक्तिक पातळीवर अध्ययन केले व संस्कृत पंडिताकडून संस्कृत भाषेचे धडे घेतले. त्याचे दृश्य फळ म्हणजे त्यांनी कालिदासाच्या

शाकुन्तलाचा आणि जयदेव कवीचे गीतगोविंद ह्या काव्याचा इंग्रजीत अनुवाद केला. त्यांनी मनुस्मृतीचा केलेला अनुवाद त्यांच्या मृत्यूनंतर *The Institutes of Hindu Law*' ह्या शीर्षकाखाली प्रकाशित झाला. सर विलियम जोन्सची यापेक्षाही अधिक महत्त्वाची कामगिरी म्हणजे गव्हर्नर जनरलच्या ' पाठिंब्याने १७८४ साली कलकत्त्याला रॉयल एशिॲटिक सोसायटीची केलेली पायाभरणी ही होय. प्राचीन भारतीय विद्येच्या, वाङ्मयाच्या व इतिहासाच्या संशोधनाला प्रोत्साहन देणे, संशोधनपर लेखांवर चर्चा आयोजित करणे आणि असे साहित्य प्रकाशित करणे ही या संस्थेची उद्दिष्टे होती. ह्या संस्थेतर्फे १७८८ साली एका नियतकालिकाचे प्रकाशन सुरू झाले. ह्या नियतकालिकातून संशोधनपर लेख प्रकाशित केले जाऊ लागले. प्राच्यविद्येच्या संशोधनाचे केंद्र म्हणून ही संस्था ओळखली जाऊ लागली. पुढे याच्या शाखा इतर प्रांतांत स्थापन झाल्या. मुंबईला ह्या संस्थेची शाखा १८०४ साली प्रस्थापित करण्यात आली. ह्या संस्थेच्या बैठकीत जोन्स यांनी आपले संशोधनपर निष्कर्ष श्रोत्यांपुढे मांडले. संस्कृत, फारसी आणि प्राचीन युरोपीय भाषांचा तौलनिक अभ्यास करून त्या मधील सादृश्य त्यांनी दाखवून दिले आणि त्या आधारे या सर्व भाषांचे प्राचीन काळी एकच उगमस्थान असावे असा सिद्धांत मांडला. तसेच अतिप्राचीन काळी समान भाषा बोलत असलेले लोक समान वंशाचे असावेत, मूलतः लोक आर्य वंशाचे असावेत आणि काळाच्या ओघात ते भिन्न प्रदेशात विभागले गेले असावेत, त्यांचे काही गट युरोपात तसेच भारतात आले असावेत असा अभिनव सिद्धांत त्यांनी मांडला. याशिवाय, ग्रीक इतिहास व प्राचीन भारतीय वाङ्मय यांच्या तौलनिक अभ्यासातून चंद्रगुप्त मौर्याचा काळ इ.स. पूर्व ३२५ हा असावा असा सिद्धांत त्यांनी मांडला. प्राचीन भारताच्या इतिहासातील एका महत्त्वाच्या घटनेचा काळ निश्चित केल्यामुळे इतर घटनांची त्या अनुषंगाने कालनिश्चिती करणे सुकर झाले. अशा प्रकारे प्राचीन भारतीय संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाला जोन्सनी केलेल्या सक्रिय व बहुविध योगदानामुळे त्यांना भारतातील प्राच्यविद्येच्या जनकत्वाचा मान देणे समर्पकच ठरते.

**हेन्री कोलब्रूक (*Henry Colebrook*) :-**

प्राचीन भारतीय वाङ्मयाचा उत्साही अभ्यासक आणि प्रशंसक म्हणून हेन्री कोलब्रूक याचे नाव महत्त्वाचे आहे. वयाच्या अठराव्या वर्षी कंपनीच्या सेवेत रुजू झालेल्या कोलब्रूकने प्राचीन विद्येचे केंद्र असलेल्या बनारस येथे संस्कृत भाषेचे अध्ययन केले. हिंदू तत्त्वज्ञानाने तो विशेष प्रभावित झाला. त्याने वेदांचा सखोल अभ्यास करून वेदांवर दीर्घ लेख लिहिला. त्याद्वारे वैदिककालीन भारतीय समाजाचे चित्र त्याने रेखाटले. त्या काळात समाज निकोप होता, लोक धडधाकट, वृत्तीने आनंदी व प्रगतीशील होते. हुकुमशाही नव्हती, सती सारख्या अनिष्ट चालीरीती नव्हत्या, एकूण ते सुवर्णयुग होते असा निष्कर्ष तो काढतो. त्याने जैन व बौद्ध धर्माचाही अभ्यास केला. हे धर्म वैदिक काळानंतरचे आहेत असे मत त्याने मांडले. जैन व बौद्ध धर्मावर, तसेच महावीरावर त्याने स्वतंत्र लेख लिहिले. प्राचीन भारताच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटनांचा कालानुक्रम निश्चित करण्याचाही त्याने प्रयत्न केला. त्याचे अनेक संशोधनपर लेख एशिॲटिक सोसायटीच्या नियतकालिकातून प्रकाशित झाले. *Lilavati, Beejganeet, Digest of Hindu Law, Hindu Philosophy* हे त्याचे काही मोलाचे ग्रंथ होत.

**विलियम रॉबर्टसन (*William Robertson*) :-**

भारतीय संस्कृती उच्च दर्जाची असल्याची ज्यांची पूर्ण खात्री होती अशा इंग्रज अधिकाऱ्यांत रॉबर्टसनची गणना करणे आवश्यक आहे. त्याने संस्कृत विद्येचा सखोल अभ्यास करून गीता व शाकुन्तलाचा अनुवाद तर केलाच, त्या शिवाय ग्रीक व भारतीय संस्कृतींचा तौलनिक अभ्यास करून भारतीय संस्कृती वरिष्ठ दर्जाची असल्याचे मत मांडले आणि बनारस हे प्राचीन भारतीय विद्येचे केंद्रस्थान असल्यामुळे त्याचे व भारतीय सल्ला इंग्रज शासकांना दिला. संस्कृतीचे जतन व जोपासना करण्याचा हा त्याचा उदार दृष्टीकोन होता.

**होरेस विल्सन (*Horace Wilson*) :-**

व्यवसायाने डॉक्टर असलेला होरेस विल्सन १८०८ साली कंपनीच्या तर्फे भारतात आला. येथे त्याने टांकसाळीतही काम केले. विलियम जोन्सपासून प्रेरणा घेऊन त्याने प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास केला. त्याने मेघदूताचा इंग्रजी अनुवाद केला, कल्हणाच्या राजतरंगीणीवर भाष्य केले, काश्मीरच्या इतिहासाचा कालानुक्रम निर्धारित केला, विष्णुपुराणावर संशोधन केले, भारतीय नाणकशास्त्रावर संशोधनपर लेख लिहिले; इंग्रजी-संस्कृत शब्दकोषाची निर्मिती हे त्याचे मोलाचे योगदान होते. तसेच जेम्स मिलने लिहिलेल्या भारताच्या इतिहासातील खोडसाळ, पक्षपाती विधानांवर आक्षेप घेतले आणि इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनावरील त्याच्या दुष्परिणामाचे परिणाम भविष्यात धोकादायक ठरतील असा इशाराही दिला.

अशाप्रकारे प्राचीन भारतीय संस्कृतीची माहिती करून घेण्यासाठी काही इंग्रज अभ्यासक प्राचीन भारतीय वाङ्मयाकडे वळले, तर इतर काही इंग्रज अधिकारी पुरातत्त्वीय पुराव्यांच्या शोधाचा प्रयत्न करू लागले. भारतात निरनिराळ्या ठिकाणी विखुरलेले पुरातत्त्वीय अवशेष, शिलालेख, स्तूप, विहार, मंदिरे, स्थापत्य, शिल्प, नाणी यांचा शोध ते घेऊ लागले. शिलालेखांचा आशय उलगडण्याच्या हेतूने प्राचीन ब्राह्मी लिपीच्या अभ्यासात ते गळून गेले. त्या काळात इंग्लंडमध्ये इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्रांचा विकास होत होता. ग्रीस व इजिप्तमध्ये पुरावशेषांच्या शोधासाठी उत्खनन होत होते. त्याच ज्ञानशाखांच्या मदतीने काही इंग्रज अधिकाऱ्यांनी भारतातही उत्खनन सुरू केले व प्राचीन भारतीय संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत झाली. या क्षेत्रात मोलाची कामगिरी करण्याचे श्रेय जेम्स प्रिन्सेप आणि अलेक्झांडर कनिंगहॅम यांना द्यावे लागते.

**जेम्स प्रिन्सेप (*James Princep*):**

प्राचीन ब्राह्मी लिपीतील अक्षरांचा उलगडा करण्याचा पहिला प्रयत्न चार्लस् विल्किन्स याने केला. कोरीव लेखांचा अर्थ लावून १७८१ साली बंगालमधील पाल राजवंशाचा इतिहास त्याने तयार केला. परंतु सम्राट अशोकाच्या काळातील जुन्या ब्राह्मी लिपीचा अर्थ लावण्यात मात्र विल्किन्स व इतर अभ्यासकांना यश आले नव्हते. सुमारे पन्नास वर्षांच्या प्रयासानंतर हे काम तडीस नेण्याचा मान प्रिन्सेप याने पटकावला. तो टांकसाळीत अधिकारी असला तरी त्याचा पुरातत्त्वशास्त्राचा अभ्यास होता व उत्खननांत त्याला रस होता. त्याने शिला, स्तंभ, भिंती यांवर कोरलेले लेख गोळा केले. सुमारे सात वर्षे सातत्याने, नेटाने अशा लेखांवर मनन चिंतन केले. अखेरीस त्याच्या कळकळीच्या प्रयत्नांना १८३४ साली फळ आले. अशोकाच्या काळातील ब्राह्मी लिपीचा अर्थ लावण्यात त्याला यश मिळाले. यामुळे प्राचीन इतिहासातील एक मोठे दालन खुले झाले. केवळ अशोकासंबंधीचीच नव्हे तर सर्व बौद्ध काळाची माहिती कळण्याचा मार्ग मोकळा झाला. त्याने लिपीशाख व नाणेशास्त्रावर तसेच प्राचीन भारतीय इतिहासावर लेख लिहीले. या सुमारास लुडार्स (*Ludars*) हा जर्मन अभ्यासक ब्राह्मी लिपीचा शोध घेण्यात गुंतला होता. त्याच्या पूर्वी आपले प्रयत्न यशस्वी व्हावेत ही प्रिन्सेपची इच्छा पूर्ण झाली. त्याने लिहिलेले अनेक लेख १८५८ साली *Indian Antiquities* ह्या मथळ्याखाली प्रकाशित झाले.

**अलेक्झांडर कनिंगहॅम (*Alexander Cunningham*):**

कंपनीच्या सेवेत काम करीत असताना पुरातत्त्वीय संशोधनाचा छंद जोपासणारा इंग्रज अधिकारी म्हणून त्याची प्रसिद्धी आहे. भारतात पुरातत्त्वीय अभ्यासाचा पाया त्याने घालून दिला. वयाच्या १९ व्या वर्षी १८३३ साली तो बंगालमधील पायदळाच्या इंजिनिअरिंग शाखेत कामाला लागला. प्रिन्सेपचे संशोधनकार्य त्याचे जीवनकार्य बनले. कामाच्या निमित्ताने भारतातील अनेक प्राचीन ऐतिहासिक स्थळांचा त्याने दौरा केला. स्तूप, विहार, चैत्य, गुहा यांचा अभ्यास केला. साची व बारहूतच्या सुप्रसिद्ध स्तूपांचा शोध लावण्याचे श्रेय कनिंगहॅमच्या संशोधनकार्याला आहे.

कनिंगहॅमने अनेक स्थळी उत्खनने केली. त्यांपैकी १८३७ साली सारनाथजवळ, १८५० साली साची जवळ व नंतर तक्षशीलाजवळ केलेली उत्खनने प्रसिद्ध आहेत. ह्या क्षेत्रातील त्याचे कार्य लक्षात घेऊन १८६२ साली पुरातत्त्वीय

सर्वेक्षक म्हणून त्याची नियुक्ती झाली व आठ वर्षांनंतर त्याच विभागाचा संचालक होण्याचा मान त्याला मिळाला. मुख्य महत्त्वाचा मुद्दा असा की त्याने आपल्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांचा एक गट तयार केला. त्यांना कनिंगहॅमने वेळोवेळी ज्या सूचना दिल्या त्यावरून ह्या क्षेत्रातील त्याचे सखोल ज्ञान व रुची ध्यानात येते.

कनिंगहॅमने केलेल्या पुरातत्त्वीय सर्वेक्षणाचे पुरावे त्याने प्रकाशित केलेल्या अहवालातून निदर्शनास येतात. *'Coins of Ashoka', 'Inscriptions of Ashoka', 'Stupa of Barhut'* हे त्याचे प्रसिद्ध लिखाण होय. याबरोबरच प्राचीन भारतातील ऐतिहासिक महत्त्वाच्या स्थळांची भौगोलिक स्थिती दाखविणारा नकाशाही त्याने तयार केला. त्याच्या कार्यापासून स्फूर्ती मिळून मॅकेन्झीने सुमारे ८००० कोरीव लेख संकलित केले. हीच परंपरा पुढे विकसित होत जाऊन १९२२ साली डॉ. मार्शल व डॉ. राखलदास बॅनर्जी यांनी हडप्पा व मोहेंजदाडो संस्कृती प्रकाशात आणून भारतीय संस्कृती वैदिक काळापेक्षाही पूर्वीची असल्याचे पुराव्यानिशी सिद्ध केले.

इतर युरोपीय प्राच्यविद्या विशारद - एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून इंग्रजांप्रमाणे काही युरोपीय विद्वानही प्राचीन भारतीय विद्येकडे आकर्षित झाले. फ्रेंच अभ्यासक अनक्वेटिल ड्यूपराँने १८०१-०२ च्या सुमारास दाराशुकोने केलेल्या उपनिषदाच्या अनुवादाचे फ्रेंच भाषेत भाषांतर केले. यामुळे शॉपेनहावर सारख्या फ्रेंच तत्त्वज्ञांना भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख झाली. युजीन बरनॉफने ऋग्वेद आणि झेंद अवेस्ता यांच्या भाषांतील साम्य उलगडून दाखविले; तर ओल्डनबर्ग, बरनॉफ व हीस डेव्हिस यांनी पाली भाषेचा अभ्यास करून बौद्ध व जैन धर्मशास्त्राचा परिचय पाश्चात्य जगाला करून दिला.

युरोपीय प्राच्यविद्या विशारदांत जर्मन विद्वान फ्रेडरिच मॅक्स मुल्लर *(Max Muller)* याला मोलाचे स्थान आहे. हा जर्मन अभ्यासक ऑक्सफर्ड विद्यापीठात तौलनिक तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक होता. कोणाचीही मदत न घेता त्याने संस्कृत भाषेत प्राविण्य मिळविले. पौर्वात्य जगातील धर्मांचा तौलनिक अभ्यास केला. सायनाच्या भाष्यासह ऋग्वेदाचा अनुवाद केला. संस्कृत वाङ्मयाचा इतिहास महत्त्वाच्या ग्रंथांच्या कालानुक्रमानुसार १८५९ साली तयार केला. पुराणकथांत त्याला विशेष रुची होती. आर्य हे बाहेरून भारतात आले हा सिद्धांत त्याने उचलून धरला. ख्रिस्ती धर्म सोडून पूर्वेकडील सुमारे पन्नास धर्मग्रंथांचा त्याने इंग्रजीत अनुवाद केला. *'The Sacred Books of the East'* म्हणून हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. इंग्लंडमधील प्राचीन भारतीय विद्येचा गाढा अभ्यासक ही मॅक्स मुल्लरची ओळख आहे. त्याच्या प्रेरणेने अनेक जर्मन अभ्यासक प्राचीन भारतीय विद्येच्या अध्ययनाकडे वळले.

**पौर्वात्यवादाचे भारताला योगदान :-**

पौर्वात्य जगाविषयीच्या कुतूहलाने व जिज्ञासेने प्रेरित झालेल्या विद्वानांनी तोवर काही अंशी अज्ञाताच्या पडद्याआड असलेल्या प्राचीन भारताच्या इतिहासाच्या व संस्कृतीच्या संशोधनाचा नवा प्रवाह सुरू केला. लंडन मधील रॉयल सोसायटीच्या धर्तीवर भारतात संस्था स्थापन करून ह्या क्षेत्रातील शास्त्रीय संशोधनाला संस्थात्मक आधार दिला. उच्चपदस्थ प्रशासकांनी ह्या कार्याला प्रोत्साहन व पाठिंबा दिल्यामुळे ह्या क्षेत्रातील संशोधनाकडे अनेक जिज्ञासू अभ्यासक आकर्षित झाले आणि हा प्रवाह विस्तारत गेला. प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीच्या क्षेत्रात झालेल्या संशोधन कार्याच्या प्रकाशनालाही उत्तेजन मिळाल्यामुळे ह्या संशोधनाला चिरकालीन स्वरूप प्राप्त झाले. नंतरच्या पिढ्यांना तो संपन्न वारसा लाभला.

प्राचीन भारतीय अभिजात वाङ्मयाचे व तत्त्वज्ञानपर ग्रंथांचे अनुवाद युरोपीय भाषांत होऊ लागल्यामुळे युरोपीय जगाला प्राचीन भारतीय संस्कृतीचा व समृद्ध वाङ्मयाचा परिचय झाला. यामुळे प्राचीन भारतीय संस्कृती प्रगत होती, विकसित होती. युरोपात प्रचलित असलेल्या सर्वसामान्य समजाप्रमाणे येथील लोक रानटी, मागासलेले नव्हते याची युरोपीय विद्वानांना जाणीव झाली. त्यामुळे अनेक फ्रेंच व जर्मन विचारवंत प्रभावित झाले. चार्लस् विल्किन्स याने केलेला गीतेचा अनुवाद वाचून 'भारतीय लोक आमच्यापेक्षा कोणत्याही दृष्टीने हीन दर्जाचे नाहीत' असे वॉरन हेस्टिंग्जने काढलेले उद्‌गार प्रसिद्ध आहेत.

प्राचीन भारताच्या अध्ययनाला वाहून घेतलेल्या विद्वानांमुळे प्राचीन ब्राह्मी लिपीचाउलगडा होऊन प्राचीन इतिहासातील अज्ञात दालने खुली झाली. तसेच त्यांच्या परिश्रमामुळे प्राचीन इतिहासातील महत्त्वाच्या घटनांची कालनिश्चिती झाल्यामुळे कालक्रमानुसार घटनांची संगती लावणे शक्य झाले. कालगणना हा इतिहासाचा डोळा आहे असे म्हणतात. त्या दृष्टीने कालगणनेचे शास्त्र येथे विकसित करण्यात ह्या विद्वानांनी केलेले कार्य मोलाचे ठरते. तसेच पुरातत्त्वीय शोधांमुळे प्राचीन इमारती, स्तूप, गुहाशिल्प, चित्रकला यांवरही प्रकाश पडला आणि प्राचीन संस्कृतीची संपन्नता जगापुढे आली. भारतीयांना देखील तोवर अज्ञात असलेला त्यांचा इतिहास परकीयांच्या प्रयत्नांमुळे वाचायला मिळाला आणि आपल्या संस्कृतीच्या संपन्नतेची साधार जाणीव झाली.

परकीय प्राच्यविद्या अभ्यासकांच्या लिखाणाने पुढे भारतीय अभ्यासकांना आपला इतिहास, साहित्य, संस्कृती यांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली. भारतीय अस्मिता जागृत होताच अनेक भारतीय संशोधक प्राच्यविद्या अध्ययनाकडे वळले.

पौर्वात्यवादी प्रवाहाचे जसे काही लाभदायक परिणाम झाले, तसेच काही प्रतिकूल परिणामही झाले. भारतीयांना आपला इतिहास परकीयांच्या नजरेतून पाहावा लागला. त्यामुळे परकीयांच्या लिखाणातून व्यक्त झालेले विचार व मतेही प्रचलित झाली. वैदिक संस्कृती ही आर्यांची संस्कृती आहे व आर्य लोक बाहेरून भारतात आले ह्या सिद्धांतामुळे उत्तर व दक्षिण भारतातील संस्कृती भिन्न असल्याचे व द्रवीड संस्कृती हीन असल्याचे मत प्रसृत झाले. तसेच आर्यवंशाच्या श्रेष्ठत्वाच्या सिद्धांताचा आधार पुढे साम्राज्यवादी ब्रिटिश लेखकांनी घेतला आणि गौरवर्णीयांच्या श्रेष्ठत्वाचा पुरस्कार केला जाऊ लागला. याशिवाय भारतीय संस्कृतीच्या संपन्नतेने प्रभावित झालेल्या विलियम जोन्स, रॉबर्टसन सारख्या विद्वानांनी केलेली काही विधाने अतिशयोक्त, अतिरंजित स्वरूपाची होती. ग्रीक व प्राचीन भारतीय संस्कृतीची तुलना करून ग्रीक संस्कृतीला कमी लेखणे, गणित, तर्कशास्त्र, खगोलशास्त्र यांचा उगम भारतात आहे, ॲरिस्टॉटलवर भारताचा प्रभाव होता, न्यूटनच्या सिद्धांताची बीजे वैदिक साहित्यात आढळतात अशी विधाने करण्यात आली. मात्र त्यासाठी बळकट पुरावे दिलेले नव्हते. अशा विधानांमुळे काही भारतीयांत प्राचीन संस्कृतीविषयी असलेल्या अभिमानाला दुराभिमानाचे स्वरूप प्राप्त झाले, यातून स्वतःला महान लेखण्याची वृत्ती बळावली व बदलत्या परिस्थितीत नवी आधुनिक विद्या हस्तगत करण्याची गरज आहे याचे महत्त्व जाणवले नाही. पुढे स्वातंत्र्य चळवळीच्या प्रारंभीच्या पर्वात प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभिमानाने पुनरुज्जीवनवादी विचारप्रवाहाला खतपाणी पुरविले.

**केंब्रीजपंथी इतिहासलेखन**

*Cambridge School Historiography*

**प्रस्तावनाः-**

राष्ट्रवादाच्या राजकारणाच्या काळात भारताच्या राजकारणाची व्याख्या करणाऱ्या केंब्रीजमधील इतिहासकारांच्या समुहाला 'केंब्रीज स्कुल' या नावाने ओळखले जाते. त्यांच्या मतानुसार साम्राज्यवाद आणि राष्ट्रवाद यांच्यामध्ये कोणताही अंन्तर्विरोध नव्हता. थोडक्यात केंब्रिजपंथी इतिहासकारांची भूमिका परोपकारी सम्राज्यवाद आणि स्वहितैषी राष्ट्रवाद' दाखविणे ही होती. त्याच्या मतानुसार स्थानिक हितसंबंध आणि भिन्न गटांमध्ये असलेली गटबाजी आणि द्वेषभावना भारतीय राष्ट्रवादाच्या इतिहासाची मुख्य वैशिष्ट्ये होती. अशा प्रकारे स्थानिक प्रश्नातून स्थानिक भेदभाव आणि गटबाजी असूनही भारतीय राष्ट्रवादाचा उदय झाला. याचे कारणही तसेच होते. इंग्रजांनी एककेंद्री राज्याची स्थापना केलेली होती. इंग्रजांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या पुवार्धात राजकिय प्रतिनिधीत्व काही प्रमाणात भारतीयांकडे सुपूर्त केले. भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिलेल्या प्रतिनिधीत्वामुळे, लोकांना प्रशासकिय बाबीची माहिती मिळण्यास मदत झाली परिणामी त्यांनी विधान परीषदांमध्ये आणि गर्व्हनरच्या कौन्सिलमध्ये जावून भारतीयांचे प्रतिनिधीत्व केले. मात्र यामुळे भारतीयांना राजकारण आणि राज्यकारभारासंबंधी माहिती मिळण्यास मदत झाली. परिणामी त्यांनी राष्ट्रीय विचारांना चालना देण्याचा प्रयत्न केला. या भारतीयांच्या राजकिय जाणिवेचा अन्वयार्थ लावतांना केंब्रिजपंथी इतिहासकारांनी "भारतीय राष्ट्रवादाच्या उदयामागे सरकारची प्रेरणा होती" असे मत मांडले. तर केंबिज पंथाचे समर्थन करणारे इतिहासकार कुपलंड यांनी तर "भारतीय राष्ट्रवाद हे ब्रिटीश राजवटीचे अपत्य होते." असे मत मांडले. ब्रिटीश केंबिजपंथी इतिहासकारांचा हा दृष्टीकोन पूर्वग्रहदुषीत होता. कारण जर भारतीय राष्ट्रवाद हे ब्रिटीश राजवटीचे अपत्य होते तर त्या अपत्याला दुध पाजण्याचे काम आईने करायला हवे होते. मात्र मातृत्व स्विकारणाऱ्या त्या ब्रिटीश आईने भारतीय राष्ट्रवादाच्या अपत्याला कधीच दुध पाजले नाही. आणि शिवाय मातृत्व स्विकारणाऱ्या या ब्रिटीश आईनेच भारतीय राष्ट्रवाद या अपत्याचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. या गोष्टीकडे कुपलंड या साम्राज्यवादाच्या समर्थक असलेल्या केंब्रिजपंथी इतिहासकाराने सोईस्कर दुर्लक्ष केले. ब्रिटीश शासकांनी केलेल्या सत्तेच्या केंद्रीकरणामुळे भारतीय राष्ट्रवादाचा उदय झाला. असा विचार *locality Provence and Nation Essays on Indian Politics* १८७० ते १९४० या ग्रंथात केंब्रिज इतिहासकारांच्या लेखांमध्ये संकलित करण्यात आला आहे. हा ग्रंथ जॉन गॅलाघर, गार्डन जॉनसन आणि आनिल सिल यांनी संपादीत केला होता. हा ग्रंथ १८७३ मध्ये केंब्रिज युनिर्व्हसिटी प्रेसने प्रकाशित केला. अनेक टिकाकारांनी या ग्रंथावर भारतीय राष्ट्रवादीची बदनामी केल्याचा आरोप ठेवला. असा आरोप करणे संयुक्तीकच होते. कारण या विषयावरुन या गंथावर अनेक ठिकाणी वादविवाद झाले.

१९६० पर्यंत इतिहासलेखनात दोन प्रमुख विचारप्रवाह होते. एका गटाने मार्क्सवादी विचारांची कास धरली तर दुसऱ्या गटाने पश्चिमेकडील कुलीन सिद्धांताची कास धरली. या इतिहाकारांमध्ये १९६० च्या दशकात जे विचारमंथन झाले त्यातून केंब्रिज स्कूलच्या विचारप्रवाहांचा उदय झाला. थोडक्यात १९६० च्या दशकातील हे विचारमंथन तिन प्रश्नांभोवती केंद्रीत झालेले आपणास दिसते. १९ व्या शतकाच्या उत्तरर्थात आणि २० व्या शतकाच्या पुर्वार्धात भारतात ब्रिटीश राजवटीच्या काळात आधुनिक राजकारणाचा परिघ काय होता? हे राजकारण अर्थशास्त्रावर अधारीत होते का ? किंवा इंग्रजी शिक्षणाने दिलेल्या नवविचारांवर अथवा भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिलेल्या प्रतिनिधीत्वावर अधारीत होते ? या प्रश्नावरील चर्चाविश्वात मार्क्सवाद्यांनी असे मत मांडले की, तत्कालिन राजकारण हे अर्थशास्त्रावर अधारीत होते. मात्र कुलीन इतिहासकानी असे मत व्यक्त केले की, ही इंग्रजांनी भारताला दिलेली देणगी होती. दुसरा महत्वाचा प्रश्न असा होता की, भारताच्या उपमहाद्वीपातील राजकारणाच्या बदलांचा अभ्यास करण्यासाठी सर्वात महत्वाचे एकक काय आहे ? भारतीय उपमहाद्विप हे एक राष्ट्र होते, की, भुभाग ? मार्क्सवाद्यांनी राष्ट्र ही संकल्पना मानून या प्रश्नाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला. मात्र कुलीन इतिहासकारांनी भारतीय उपमहाद्विपाला एक भुभाग हे एकक मानून या प्रश्नाचे विश्लेषण केले. या शिवाय या तथ्यावरुनही मतभेद होते की, सामाजिक समुह

केंद्रीभुत मानून इतिहासाचे विश्लेषण करण्यात यावे की, वर्ग संघर्षाला केंद्रीभूत मानून विश्लेषण करण्यात यावे. या शिवाय या प्रश्नावरही या इतिहासकारांमध्ये मतभेद होते की, इंग्रजी शिक्षीत वर्गाच्या मिळवण्याच्या स्पर्धेतून विविध जाती- समुहातील मतभेद समोर ठेवून विश्लेषण करण्यात यावे की, वर्ग संघर्ष समोर ठेवून विश्लेषण करण्यात यावे. मार्क्सवादी इतिहाकारांनी वर्गसंघर्षाचा आधार घेतला तर कुलीनवाद्यांनी जात, पंथ, आणि मध्यमवर्गाच्या मतभेदांवर आपले लक्ष केंद्रीत केले.

कैंब्रिजपंथाचा उदय कुलीन सिद्धांततून झाला. कैनबेरा, ससेक्स, आणि केंब्रिज सारख्या पाश्चिमात्य विद्यापीठातील इतिहासकारांनी भारत आणि रशियातील मार्क्सवादी इतिहास लेखनाच्या विरोधात आपल्या व्याख्या केल्या. भारताच्या राजकारणातील इंग्रजी शिक्षण घेतलेल्या कुलीन वर्गाच्या भुमिकेवर भर देण्यासाठी लगोपाठ तिन पुस्तकांचे प्रकाशन झाले. डि ए. लो. (संपा.) साऊंडींग इन मॉडर्न साऊथ एशियन हिस्ट्री (*Sounding in Modern South Asian History)* (लंडन १९६८), जे. एच. बुमफिल्ड एलिट कनफ्लिक्ट इन ए प्लुरल सोसायटीः टेन्टिथ सेंच्युरी बंगाल (बर्कले आणि लॉस एंजल्स, १९६८) (*A Conflict in a Plural Societies: Twentieth Century Bengal)* आणि अनिल सिल यांचा द इमरजेंस ऑफ इंडीयन नॅशनालिझमः कोंपिटीशन ॲन्ड कोलाबरेशन इन द लेटर नाईन्थटिन्थ सेंच्युरी (केंब्रीज १९६८) (*The Immergence of Indian Nationalism: Competition and Collaboration in the letter Nineteenth Century)* यामध्ये मार्क्सवाद्यांच्या विरोधात तिन मुद्यांवर भर देण्यात आला. पहिला मुद्दा असा की, आधुनिक राजकारणात राष्ट्रवादी राजकारणाचाही सहभाग होता. मात्र यामागे मुख्य प्रेरणा आर्थिक बदल नसून इंग्रजांनी भारतात निर्माण केलेल्या संस्था आणि पाश्चिमात्य विचार यामागे प्रेरणा होती. अनिल सिल यांनी इंग्रजांनी भारतीयांना दिलेले इंग्रजी शिक्षण, पाश्चिमात्य संस्था, लहान सरकारी नोकऱ्या, कायदे, चिकीत्सा, पत्रकारीता आणि शिक्षणाच्या क्षेत्रावर दिलेला भर यामुळे प्रेरणा निर्माण झाल्या असे मत मांडले. जॉन ब्रुमफिल्डच्या मतानुसार भारतीय जनतेला कायदेमंडळात आणि कौन्सिलमध्ये स्थान मिळाल्यामुळे राजकारणी लोकांचा नवा गट तयार झाला. प्रतिनिधी निवडून आल्याने नवे संविधान अस्तित्वात आले.

**केंब्रिजपंथी इतिहासलेखनाचा उदयः-**

अनिल सिलच्या शोधप्रबंध द इमरजेंस ऑफ इंडीयन नॅशनालिझमः कॉपिटीशन ॲन्ड कोलाबरेशन इन द लेटर नाईन्थटिन्थ सेंच्युरी (केंब्रीज १९६८) केंब्रिजच्या जॉन गॅलाघर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला. या शोधप्रबंधावर गॅलाघरच्या विचारांचा प्रभाव होता. या शिवाय अनिल सिल यांच्या पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांनी विशेषतः ज्युडिथ ब्राऊन, गांधीज राईज टू पावर (केंब्रिज १९७२) *Gandhis Rise to pawer* मध्ये हीच परंपरा पुढे ठेवण्यात आली होती. त्याच्या मते इंग्रजी शिक्षण घेतलेले कुलीन वर्गातील लोक, बंगाल, मुंबई आणि मद्रासमधील उच्चवर्णिय अल्पसंख्याक होते. आणि मागास जातीय भागालील राजकारण या इंग्रजी शिक्षीत राष्ट्रवादाच्या विरोधात असून या उच्चवणिय अल्पसंख्यांकांना त्यांचा विरोध होता. मात्र गॅलाघर आणि त्यांच्या विद्याथ्यांनी लवकरच या विचारात परीवर्तन केले हे नविन विचार म्हणजे केंब्रिजपंथाचे वैचारीक अधिष्ठान ठरले.

जॉन गॅलाघर यांनी रोनाल्ड रॉबिन्सन बरोबर अफ्रिका ॲन्ड द व्हिक्टोरीयन्स (१९६१) *Africa and the Victorians* हा ग्रंथ लिहला. या ग्रंथामध्ये त्यांनी सम्म्राज्यवादी अभ्यासाकडे टिकात्मक दृष्टीकोनातून पाहिले. थोडक्यात सम्म्राज्यवाद यूरोपातील नव्या आर्थिक शक्तीचे उत्पादन नव्हते तर अशिया आणि आफ्रिका खंडामध्ये स्थानिक कारणांनी झालेल्या राजकिय हासाचा तो परिणाम होता. एतद्देशिय समाजातील अंर्तगत कलहामुळे निर्माण झालेली राजकिय पोकळी भरुन काढण्यासाठी सम्म्राज्यवादाला पुढे यावे लागले. गॅलाघरच्या प्रसिद्ध शिष्य असलेल्या अनिल सिल यांनी आधुनिक भारतातील राजकारणाच्या उदयाची व्याख्या करतांना भारतीय समाजातील अंर्तगत राजकीय कलहाकडे दृष्टीक्षेप टाकला आणि प्रामुख्याने भारतीय जाती आणि समाजाने इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी जी स्पर्धा सुरुइ केली होती ती बरोबरच होती असे विधान केले. १९७० च्या दशकात गॅलाघर, अनिल सिल, गार्डन जॉनसन यांच्या भोवती संशोधकांचा एक समुह तयार झाला. यापैकी गॉर्डन जॉनसन मॉर्डन एशियन स्टडीजचे संपादक होते ते

अनिल सिल यांचे शिष्य होते. त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर संशोधन केले. त्यांचे संशोधन अनिल सिल आणि ज्युडीथ ब्राऊन यांच्या संशोधनाच्या अगदी जवळ जाते. मात्र आत्ता नव्याने तयार झालेल्या या कॅंगिज समुहाने स्वतः हास कुलीन सिद्धांतापासून वेगळे करुन सुरु असलेल्या विवादात भाग घेवून नवीन उत्तरे शोधली. व राष्ट्रवाद हा सत्ता प्राप्तीचा एक खेळ होता. असे मत नंतरच्या काळात केंब्रिज विचारप्रवाहाने मांडले. या काळादरम्यान केंबिजपंथीनी नवा दृष्टीकोन मांडण्यास सुरुवात केली.

या नंतरच्या काळात केंब्रिजपंथी इतिहासकारांमध्ये जो नवा दृष्टीकोन विकसित झाला त्यात ते म्हणतात की, आधुनिक राजकारणात इंग्रजी शिक्षणाची भूमिका महत्वाची नव्हती आणि वसाहतीक काळात आर्थिक परीवर्तनाची भुमिकाही महत्वाची नव्हती तर भारतीय उपमहाद्वीपात ब्रिटीशांनी केलेले सत्तेचे केंद्रीकरण महत्वाचे होते. ब्रिटीशांनी सत्तेचे केंद्रीकरण केल्याने हे केंद्रीकरण ग्रामिण भागापर्यंत पोहोचले. कार्यकारी मंडळातील प्रतिनिधीत्वाच्या नव्या शैलीमुळे केंद्रला दुरवरच्या प्रांताशी जोडण्याचे काम करण्यात आले.यामुळे ग्रामिण भागातही प्रतिनिधीत्व मिळविण्यासाठी स्पर्धा सुरु झाली. राष्ट्र नव्हे तर स्थानिक प्रदेश राजकारणाचा आधार बनला. राजकारणाशी स्थानिकता जोडली गेल्यामुळे या स्थानिक हितसंबंधानी संपूर्ण देशाच्या राष्ट्रहितालाही महत्व दिले नाही. भारताच्या राजकारणातील स्थान जाती किंवा वर्गाच्या आधारावर देण्यात आले नाही तर संरक्षक आणि आश्रीत संबंधांच्या आधारावर एकक स्थापन करण्यात आले. संरक्षक आश्रीत संबंधातून निर्माण झालेल्या या वर्गाने जाती किंवा समुदायाच्या परंपरागत सिमारेषांना छेद दिला. भारताच्या राजकारणात हा जो संरक्षक आणि आश्रीत वर्ग होता. हा कोणत्याही एका जातीसमुहाचा नव्हता तर हा जो संरक्षक वर्ग होता याला ग्रामिण भागातील मोठा जमिनदार असावयाचा किंवा शहरी भागातील व्यापारी असायचा. यांचे संबंध मालक आणि नोकरांचे संबंधासारखे संबंध होते. शासनाने केंद्रीय आणि प्रांतिय कायदेमंडळात दिलेल्या प्रतिनिधीत्वामुळे संरक्षकांचे महत्व वाढले.

**केंब्रिजपंथीयांचे लिखाणः-**

केंब्रिज स्कूलचा उदय गॅलाघरच्या *Africa and the Victorians* आणि अनिल सिलच्या *Immergence of Indian Nationalism: Competition and Collaboration in the letter Nineteenth Century* मानला जातो. मात्र अनिल सिल यांनी आपला ग्रंथ *Locality,Province, and Nations* (१९७३) प्रकाशित केला. अनेक लेख आणि ग्रंथ लिहून केंब्रिजपंथीयांनी विचार मांडले. *Garden Johnson Provincial Politics and Indian Nationalism. Bombay and Indian National Congress, 1890 to 1905 (1973),*
*C. A. Belly The Local Routes of Indian Politics. Allahabad 1880 to 1920(1975), David Washbruke The Emergence of Provincial Politics. Madras presidency .1870 to 1920(1976),*
*C. J. Baker The Politics of India 1920 to 1937 (1976),*
*B.R. Tomlinson - The Indian National Congress and Raj 1929 to 1942(1976)*
*C.J. Baker, Garden Johnson, Anil Seal (Ed) Power, Profit and Politics (1981)*

वरील ग्रंथांमध्ये मांडणी आणि विचार यामध्ये भिन्नता आहे. मात्र अनेक साम्यस्थळे देखील आहेत. वरील सर्वच लेखक बरोबर केंब्रिज स्कूलचे प्रतिनिधीत्व करतात. अनिल सिलच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या केंब्रिजच्या संशोधनाचे केवळ एकच वैशिष्ट्य नाही तर अनेकविध अर्थाने हे संशोधन वैशिष्ट्यपूर्ण आहे. उदा. मुशिरुल हसनचे नॅशनालिझम ॲन्ड कम्युनिअल पॉलिटीक्स इन इंडीया १९१६- १९२८ (१९७९) आणि रजत कांता राय यांचा सोसियल कनफ्लिक्ट ॲन्ड पॉलिटीकल अनरेस्ट इन बेंगाल १८७५- १९२७ (१९८४) या ग्रंथांमध्ये सत्तेच्या खेळावर भर देण्यात आला नाही तर विचार आणि आर्थिक कारणांचेही दाखले या लेखकांनी दिले आहेत. हे दोनही प्रबंध अनिल सिलच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले असूनही ते केंब्रिज स्कुलचे प्रतिनिधीत्व करीत नाही. केंब्रिज स्कुलने व्यक्ती आणि गटांनी कशाप्रकारे सत्ताप्राप्त करण्यावर भर दिला हे विचार मांडले. ते आपल्या संशोधनात राष्ट्र, प्रदेशाकडून स्थानिकतेकडे येतात आणि या स्थानिकतेमध्ये त्यांचे लक्ष वर्ग अथवा जाती या सामाजिक समुहांकडे नाही तर सामाजिक उच्चवणीय गटांच्या संबंधावर अधारीत आहे. त्यांच्या विश्लेषणात या स्थानिक गटांचे आपसात संपर्क झाल्यामुळे स्थानिकता अखिल भारतीय चौकटीत आली. त्यामुळे दुरवरच्या भागातून केंद्रीय सत्तेमध्ये हस्तक्षेप सुरु झाला. या शिवाय

सरकारच्या केंद्रीकरणामुळे आणि केंद्रीकृत चौकटीमुळे प्रातिनिधीक तत्व समोर येवून स्थानिकता राष्ट्रीय राजकारणात विलीन झाली. या दृष्टीकोनातून जर इतिहासाचे विश्लेषण केले तर थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की, राष्ट्रवाद आणि सम्राज्यवाद यांनी अंधारात हातमिळवणी केली.

**केंब्रिज पंथीयांच्या व्याख्येची वैशिष्ट्ये :-**

केंब्रिज स्कूल स्थानिकता आणि तेथे अस्तित्वात असणाऱ्या संबंधांवर विशेष भर देत असे. सी. ए. बेलीने १९ व्या शतकाच्या मध्यातील अहलाबाद शहराच्या राजकारणाचे विश्लेषण करतांना स्थानिक राजकारणाचा संदर्भ देवून कशा प्रकारे प्रभावशाली लोक आपल्या प्रभावात रहाणाऱ्या लोकांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करीत होते. शहारात मोठ- मोठे शेठ-सावकार रहात त्यांना श्रीमंत किंवा प्रसिद्ध व्यकतीचा दर्जा होता. या शेठ-सावकारांचे आणि श्रीमंतांचे विविध प्रकारचे प्रभाव क्षेत्र होते. या श्रीमंतांच्या संपर्कात सर्व जातीधर्माचे लोक होते. नंतरच्या काळात श्रीमंतांचा वाढलेला हा संपर्क अलाहाबादच्या राजकारणाचा अविभाज्य भाग बनला.

मुंबईच्या राजकारणाचा अभ्यास करतांना गॉर्डन जॉनसनने सी. ए. बेलीच्या मताचे समर्थन केले. प्रत्येक भारतीय राजकाण्यांचे खास वैशिष्ट होते. प्रत्येक राजकारण्याला भारतीय समाजातील सर्वच थरातील समान हितसंबंध आणि विरोधी हितसंबंध एका सुत्रात बांधून ठेवण्याची कसरत करावी लागत होती. म्हणून हे राजकारणी असे करतांना वर्ग, जात, प्रदेश आणि धर्म मोडून काढीत हाते.

अनिल सिल यांनी आपला ग्रंथ *Locality, Province, and Nations* या ग्रंथाला लिहलेल्या प्रस्तावनेच्या *Imperialism and Nationalism In India* या लेखात ते म्हणतात " राजकारण ही मुलतः स्थानिक बाब होती. भारतात प्रभाव, मालमत्ता आणि साधने काबिज करण्याची स्पर्धा होती. या स्पर्धेमध्ये संरक्षक आपल्या अधिपत्याखाली असलेल्या अश्रीतांना विविध गटांमध्ये विभागून मदत करीत होते. व सावकारांचे किंवा जमिनदारांचे संघ किंवा गट होते. हे गट एकमेकांशी जोडलेले होते मात्र त्यांचे संबंध उभ्या रेषेप्रमाणे असत. थोडक्यात स्थानिक भांडणांमध्ये जमिनदार जमिनदारांचे, मुसलमांनांचे, ब्राह्मणांचे गट होते. हिंदू मुसलमांनांच्या बरोबर काम करीत, ब्राह्मणांची अब्राह्मणांशी युती होती."

केंब्रिजपंथीयांनी केलेल्या व्याख्येनुसार भारताच्या राजकारणाची मुळे स्थानिक म्हणजे जिल्हा, नगरपालिका आणि गाव यांच्यामध्ये होती. शहरी भागातील प्रभावी लोक आणि गावातील शेठ सावकार कमजोर साम्राज्यशाही सरकारद्वारे कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय साधनांचे वितरण करीत. असे असले तरी १९ व्या शतकाच्या शेवटी आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी परिस्थितीत बदल झाला. डेव्हिड वाशबुक च्या मतानुसार " प्रगती करण्यासाठी, अधिकाधिक संपत्ती मिळविण्यासाठी, लोककल्याणाची कामे करण्यासाठी साम्राज्यवादी शासनाने अनेक प्रशासकिय आणि घटनात्मक सुधारणा केल्या. त्यामुळे स्थानिक राजकारणी, स्थानिक राजकारण सोडून केंद्राकडे आकर्षीत झाले. मात्र याचा अर्थ असा नाही की, भारतीय राजकारणाला सामाजिक समुहांच्या आवश्यकतेनुसार कार्यक्रमांबरोबर राजकिय पक्षांशी जोडण्यात आले. मात्र आजुनही संरक्षक आणि आश्रीतांच्या संबंधावर भारतीय राजकारण आधारलेले होते. या शिवाय स्थानिक ठिकाणी पसरलेले संपर्क आणि विविध गटांमध्ये झालेले करार प्रमुख मुद्दा होता." *John Galaghar Congress in Decline Bengal 1930 to 1939 (Locality, Province, and Nations* या लेख) आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेतही अनिल सिलने याच मुहयांवर दृष्टीक्षेप टाकला. केंद्रीकृत आणि प्रानितिधीक सरकार अस्तित्वात आल्यामुळे भारतीयांकरीता आता राजकीय फायदा केवळ स्थानिक भुभागांपुरता सिमीत राहीला नाही तर अखिल भारतीय राजकारणाचा उदय झाला. मात्र मद्रास नेटीव्ह असोशिएशन आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस प्रांतांच्या आणि केंद्राच्या राजकारणात नवीन राजकीय डावपेच खेळू लागले. सरकारच्या औपचारीक चौकटीत मध्ये राजकारणाचा चौकट तयार झाली. याच चौकटीच्या परिघात राहून भारतीय सत्ता आणि संरक्षणाची जबाबदारी मिळवू शकत होते. *Imperialism and Nationalism In India (Locality, Province, and Nations)* तरीही सी. जे. बेकर म्हणतात "आजूनही स्थानिक प्रभावी व्यक्ती आपल्या सत्तेचा उपयोग आपल्या मर्जीप्रमाणे करीत होता. मात्र आता

त्याला ब्रिटीश राज्याच्या प्रशासकिय आणि घटनात्मक चौकटीनूसार बदल करावे लागले. आणि स्थानिक संरक्षक आणि आश्रीत ची भुमिका आता दुर जावू लागली व त्यांना नव्या मोठ्या संघटनामध्ये भाग घ्यावा लागला. जस्टीस पार्टी, हिंदू महासभा, अखिल भारतीय मुस्लिम लिग, आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अशाच मोठ्या संघटना होत्या." केंब्रिजपंथीयांनी या राजकारणावर दृष्टीक्षेप टाकतांना आणखी एका मुद्यावर भर दिला की, भारताच्या राजकारणात गांधींच्या प्रवेशाने राजकारणात बदल घडून आले मात्र हे जनअंदोन नव्हते तर हे अंदोलन उच्चवर्णीय कुलीनांच्या हातामध्ये होते. प्रत्येक वेळी होणारे घटनात्मक बदल अखिल भारतीय राजकारणाला प्रेरणा देत होते. उदा. मौटफर्ड सुधारणांनी असहकार आंदोलनाला प्रेरणा दिली. सायमन कमिशनने सविनय कायदेभंग अंदोलनाला प्रेरणा दिली. क्रिप्स मिशनने छोडो भारत अंदोलनाचा मार्ग निर्माण केला. जेव्हा जेव्हा सरकारने केंद्रामध्ये नवीन सुधारणा कायदे करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तेव्हा भारतात अंदोलने झाली. म्हणून गॉर्डन जॉनसन म्हणतात " भारतात राष्ट्रवादाच्या विकासाचा कालानुक्रम दिसून येत नाही. सरकारच्या राजकिय कारवाह्याबरोबर राष्ट्रीय अंदोलनामध्ये चढउतार होत राहीला."

**केंब्रिज स्कूलच्या विचारांवर प्रश्नचिन्हः-**

केंब्रिज स्कूल राष्ट्रीय काँग्रेसच्या राष्ट्रवादावर प्रश्न उपस्थित करते. आणि भारतीय राष्ट्रवादावर शंका उपस्थित करतात. या शंकेमागे भारतीय राजकारणाच्या बाबतीत विशिष्ट विचार होते. ते असे की, व्यक्ती सत्ता, संरक्षण आणि साधने मिळविण्यासाठी राजकारण करतो. या केंब्रिजपंथींनी स्विकारलेल्या तथ्याच्या मागे कोणतीही सामाजिक भावना आणि आणि आर्थिक दृष्टीकोन नव्हता. मात्र भारतात ब्रिटीशांनी लागू केलेल्या संस्थामधील राजकारणाचे नियम आणि कायदे होते. मात्र डेव्हिड वाशबुकने हा मुद्दाही खोडून काढण्याचा प्रयत्न केला. "कोणत्याही राजकिय संघटनेला वर्ग अधार कींवा जातीचा आधार असतो. त्याने असे मत मांडले की काही लोक सत्ता प्राप्त करण्यासाठी कोणत्याही थराला जातात. व्यक्ती आपल्या स्वार्थासाठी सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करातो. सत्ता आणि पद प्राप्त करणे राजकारण्यांचे प्रमुख उद्दीष्ट असते. त्यामागे कोणत्याही समाज सुधारणेची प्रेरणा दिसत नाही. मद्रास प्रेसिडेन्सीतील समाजाबद्दल वाशबुकने या गोष्टीकडे लक्ष वेधले की, जेथे संपत्ती फक्त काही लोकांकडे होती. कोणताही महत्त्वाचा व्यक्तर परिस्थितीत बदल करु इच्छीत नव्हता. सत्ता प्राप्त करण्यासाठी राजकारण्यांना भिन्न हितसंबंधाच्या वर्ग आणि समुदायांच्या सहकार्याची आवश्यकता होती. सत्ताप्राप्तीसाठी व्यापारी, जमिनदार, वकिल, ब्राह्मण, अस्पृश्य हिंदू, आणि मुसलमान खांद्याला खांदा लावून काम करीत. या वाशबुकच्या दृष्टीकोनावर संशयवाद इतका वरचढ आहे की यात कोणत्याही सामाजिक आणि आर्थिक विवाद होवू शकत नाही. या शिवाय केंब्रीज स्कूल सम्राज्यवादी शासन आणि एतद्देशिय प्रजा यांच्यातील कोणताही अंर्तविरोध नाकारतो.

केंबिजपंची विचारांप्रमाणे साम्राज्यवादाने उपमहाद्वीप आणि त्याच्या प्रजेवर नियंत्रण मिळवले नाही. साम्राज्यवाद्यांचा प्रामुख्याने स्थानिक मुद्यांशीच संबंध होता. अनिल सिल द इमरजेन्स आफ इंडीयन नॅशनालिझम मध्ये म्हणतात की, इंग्रज शासनाशी हातमिळवणी करण्यासाठी भारतीयांमध्ये स्पर्धा लागलेली होती. लोकॅलिटी, प्रोव्हिन्स ॲन्ड नेशन त्यांनी एक पावून पुढे टाकून असे सांगीतले की, भारतात कोणत्याही राष्ट्रीय अंदोलनाचा उदय झाला नाही व या अंदोलनाचे कोणतेही निश्चित असे उद्दीष्ट नव्हते. या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या लोकांची पार्श्वभूमी वेगवेगळी होती., त्यांचे हितसंबंध आणि गटही वेगवेगळे होते. त्यांच्या मतानुसार ही संपूर्ण चळवळ कुचकामी होती. चळवळ एकतेने तयार झाली अशा गप्पा लोक करीत होते. अंदोलनाची शक्ती अगदी काल्पनिक होती ज्या प्रकारे सम्राज्यवादाची शक्ती होती. हे अंदोलन कुचकामी असूनही सम्राज्यवादाला आव्हान देण्याचे प्रयत्न करीत होते. राष्ट्रीय चळवळीचा इतिहास हा भारतातील आपसातील वैमनस्याचा इतिहास आहे. त्यामुळे साम्राज्यवाद आणि राष्ट्रवादाच्या जुन्या विचारांच्या अधारावर आधुनिक भारताचा इतिहास लिहला जावू शकत नाही. (अनिल सिल इंपेरियालिझम ॲन्ड नॅशनालिझम लोकॅलिटी, प्रोव्हिन्स ॲन्ड नेशन) केंब्रिजपंथी सामान्यतः संपूर्ण राजकारणाला आणि मुख्यतः भारतीय राष्ट्रवादाकडे संशयास्पद भूमिकेतून बघतात. त्यांनी अर्थशास्त्र आणि समाजशास्त्राच्या तत्वांना नाकारुन भारताच्या इतिहासाची मांडणी करण्यासाठी त्यांनी राजकिय दृष्टीकोनातून मांडणी केली. या दृष्टीकोनाप्रमाणे मनुष्य राजकारण

आणि बाजारात एकसारखा बगतो. राजकारणात त्याला सत्ता मिळते तर बाजारात त्याला नफा मिळतो. दोघांमध्ये मनुष्य स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करतो.

**केंब्रिजपंथाचा शेवटः-**

जॉन गॅलाघर हे केंब्रिज विद्यापीठात इंपेरीयल अॅन्ड नेवल हिस्ट्रीचे प्राध्यापक होते. १९८० मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या स्मरणार्थ केंब्रिजच्या समुहाने लेखांचा एक संग्रह काढला. या लेखसमुहाला ख्रिस्तोफर बेकर, गॉर्डन जॉनसन आणि अनिल सिल यांनी पावर, प्राफिट अॅन्ड पोलिटीक्सः एसेज ऑन इपेरीयालिझम, नॅशनालिझम अॅन्ड चेन्ज इन ट्वेटिंथ सेंच्युरी पॉलिटीक्स (केंब्रिज १९८१) संपादीत केले. या लेखमालेत आयशा जलाल आणि अनिल सिल यांचा एक संयुक्त लेख अल्टरनेटिव्ह टू पार्टीशनः मुस्लिम पॉलिटीक्स बिट्वीन वार्स या लेखात फाळणी विषयाच्या विचारांचे पुन्हा पुर्नरज्जीवन करण्यात आले. नंतरच्या काळात आयशा जलाल यांनी एक महत्वाचा ग्रंथ द सोल स्पोकमैनः जिन्ना, द मुस्लिम लिग अॅन्ड द डिमांड फॉर पाकिस्तान (केंब्रिज १९८५) लिहला. त्यामध्ये त्यांनी असा तर्क मांडला की, मुस्लिमांच्या सहकार्याने एक महासंघ निर्माण होवू शकला असता आणि फाळणीचा विकल्प त्यांच्याकडे होता. मात्र पावर, प्राफिट अॅन्ड पोलिटीक्सः या ग्रंथातून केंबिजपंथीलयांनी शेवटचे विचार मांडले कारण या नंतर केंबिज पंथ अस्ताव्यस्त झाला. अनिल सिलच्या मार्गदर्शनात आयशा जलाल यांनी द सोल स्पोकमैनः जिन्ना, द मुस्लिम लिग अॅन्ड द डिमांड फॉर पाकिस्तान (केंब्रिज १९८५) हा प्रबंध लिहला. आणि जोया चटर्जी यांनी बंगाल डिवाईडेडः हिंन्दू कम्युनालिझम ऍन्ड पार्टिशन १९३२-१९४७, केंब्रिज्ञ १९९४ मात्र हा सामुहिक प्रयत्नांचा भाग नसून त्यांचे व्यक्तीगत लिखाण होते.

१९८२ मध्ये इतिहासाचा एक नवा दृष्टीकोन समोर आला. याला सबआर्स्टन स्टडीज असे नामाभिधान मिळाले. या दृष्टीकोनाने केंब्रिज स्कूलवर टिका केली मात्र काही बाबतीत या दोहांमध्ये साम्य दिसून येते. ते असे की, सबआर्त्यनिष्ट राजकारणात वर्ग विभाजनाच्या तत्वाला नाकारतात आणि वर्ग संबंधाऐवजी ते सत्तासंबंधांना जास्त महत्व देतात. सबाल्टर्न राजकारणाची पाळेमुळे शोधतांना स्थानिकतेकडे लक्ष केंद्रीत करतात. मुल्यमापनः-

भारतातील सर्वच इतिहासकारांनी केंब्रिज स्कूलच्या संशयवादावर कळाडून टिका केली. या शिवाय केंब्रिजपंथ म्हणजे नेमियरवादाचा प्रसार करणारी एक संस्था होती अशी टीका त्यांच्यावर करण्यात आली. ऑस्कफर्ड इतिहासकार लोविस नेमियर याचे म्हणणे असे होते की, " इंग्लडमधील संसदीय राजकारण शुद्धपणे स्वार्थ आणि सत्तेचा खेळ होता." यामुळे विविध वृत्तपत्र आणि मासिकातूनही केंब्रिज स्कूलवर टिका करण्यात आली. तपन रायचौधरी यांनी इंडीयन नॅशनालिझम ऐज एनिमल पॉलिटीक्स हा धारधार लेख लिहला. नंतरच्या एका लेखात रायचौधरी यांनी असे मत मांडले की, "वसाहतवादी दृष्टीकोनाचे संशोधीत पुर्नव्याख्या म्हणून टाकून देण्यात येवू नये. ज्यानी भारतीय राष्ट्रवादाला फक्त लोभ आणि स्वार्थाकरीता चाललेली स्पर्धा असे म्हटले. निश्चितच भारता इंग्रजी राज्य काही लोकांच्या सहकार्यावर आणि बऱ्याचश्या लोकांच्या उदासिनतेवर अधारलेले होते. भारताच्या राजकारणाच्या या बाबीवर केंब्रिजपंथाने प्रथम दृष्टीक्षेप टाकला. त्यामुळे ही पुर्ण पक्रिया भारतीयांच्या समोर आली. या शिवाय रायचौधरी या गोष्टीवर टिका करतात की, साम्राज्यवादाचा वास्तविक विरोध म्हणजे तात्पुरत्या उपयांचे राजकारण होते. आणि भारताच्या बाबतीत राष्ट्रवाद ही संकल्पना काल्पनिक होती. त्यांच्यामते केंब्रिज पंथीयांनी भारतीयांच्या मनातील अपमानाची व्यापक भावना आणि सांस्कृतीक आत्मबोधाच्या आवश्यकतेवर लक्ष दिले नाही."

केंब्रिजपंथीनी भारतीयांना दोन उपयोगी दृष्टीकोन दिले. भारतीयांनी केंब्रिजपंथ नकारलेला असला तरी हे दृष्टीकोन नाकारता येत नाही.

## राष्ट्रवादी इतिहासलेखन

## *(Nationalist History)*

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दोन दशकांत आंग्लशिक्षित भारतीय तरुणांच्या एक दोन पिढ्या पाश्चात्य संस्कृतीने भारावून गेल्या. जेत्यांची संस्कृती भारतीय संस्कृतीपेक्षा उच्च दर्जाची आहे, भारतीय संस्कृती सदोष आहे, भारतीय लोक अज्ञानी आहेत, बौद्धिक दृष्ट्या निकृष्ट आहेत, येथील साहित्य व कला देखील पाश्चात्यांपेक्षा खालच्या दर्जाच्या आहेत, अनिष्ट स्वरूपाच्या चालीरीतींच्या बंधनांनी जखडलेला समाज ह्या शृंखला तोडून बाहेर आल्याखेरीज प्रगतीपथावर वाटचाल करू शकणार नाही अशी यांची पाश्चात्यधार्जिणी धारणा बनली. त्यांची अस्मिता नष्ट झाली आणि जेत्यांच्या वेषभूषेचे, जीवनपद्धतीचे ते अंधानुकरण करू लागले. गीतेच्या ऐवजी बायबल आणि कालिदासाऐवजी शेक्सपीअर वाचण्यात ते धन्यता मानू लागले.

**वैचारिक क्रांती :-** पाश्चात्य संस्कृतीच्या अंधानुकरणाची ही अश्लाघ्य अवस्था फार काळ मात्र टिकली नाही. याविरुद्ध प्रतिक्रिया अल्पावधीतच सुरू झाली. पाश्चात्य शिक्षण घेतलेले काही तरुण अंधानुकरणाच्या प्रवाहातून बाहेर पडले आणि त्या शिक्षणातून आत्मसात केलेल्या काही मूलभूत विचारांच्या आधारे ते आत्मपरीक्षण करू लागले. विवेकवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, उपयुक्ततावाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद, शास्त्रीय विचार पद्धती हे त्याकाळी इंग्लंडमध्ये प्रचलित असलेले प्रबोधनकालीन (*Enlightenment)* विचार त्यांनी आत्मसात केले. ह्या नव्या दृष्टिकोणातून त्यांनी पाश्चात्य व भारतीय समाज व संस्कृती यांचा तौलनिक अभ्यास सुरू केला. तसेच हिंदू धर्मशास्त्र हा हिंदू समाजधारणेचा मूलाधार असल्याने धर्मशास्त्रीय ग्रंथांचे अध्ययन सुरू केले. अशा प्रकारे भारतात आंग्लशिक्षित वर्गात वैचारिक क्रांती सुरू झाली. यातून भारतात प्रबोधनाचा सूर्योदय झाला.

वैचारिक प्रबोधनाने आंग्लशिक्षित भारतीयांना आत्मशोधनाची गरज जाणवली. पाश्चात्य शिक्षणातून मिळालेल्या नव्या प्रगत विचारांच्या आधाराने भारतीय समाजपद्धतीचे, धर्मशास्त्रांचे, धार्मिक व नैतिक मूल्यांचे वस्तुनिष्ठपणे परीक्षण करून, त्यातील दोषस्थळे शोधणे, ती नाहीशी करण्याचा प्रयत्न करणे, मात्र त्याबरोबरच आपल्या संस्कृतीत जे मौलिक असेल ते कायम टिकविणे याची गरज त्यांना प्रतीत होऊ लागली.

पाश्चात्य शिक्षणातून भारतीय आंग्लशिक्षित तरुणांनी जसे बुद्धिप्रामाण्याचे, शास्त्रीय वस्तुनिष्ठ दृष्टिकोणाचे धडे गिरविले तसेच इंग्लंड, फ्रान्स, इटली, अमेरिका ह्या राष्ट्रांच्या इतिहासाच्या परिशीलनातून राष्ट्रवादाची, लोकशाहीची, घटनात्मक शासनपद्धतीची व राजकीय क्रांतीची त्यांना माहिती झाली. यातून राष्ट्रीय जाणिवेचे बीज रुजविले गेले. आत्मसन्मानाची जाणीव जागृत होऊ लागली. भारतीयांची खच्ची होत असलेली अस्मिता पुनरुज्जीवित होऊ लागली. मिशनऱ्यांनी भारतीय धर्मांवर केलेली चिखलफेक, देवदेवतांची चालविलेली नालस्ती त्यांना खटकू लागली. इंग्रजांनी लिहिलेल्या इतिहासग्रंथातून प्राचीन भारतीय जीवनाचे व संस्कृतीचे जे चित्र रंगविण्यात येत होते, त्यामुळे त्यांच्या आत्मसन्मानाला धक्का बसू लागला. भारतीय समाजात पसरू लागलेल्या न्यूनगंडाचे त्यांना वैषम्य वाटू लागले. पाश्चात्य शिक्षणाने आत्मविश्वास निर्माण झालेल्या भारतीयांना ही दु:स्थिती साहाजिकच जाचू लागली. राष्ट्रीय जाणिवेचे हुंकार : भारताची नष्ट होत असलेली अस्मिता पुनरुज्जीवित करावयाची असेल, न्यूनगंड नाहीसा करावयाचा असेल आणि भारताला प्रगती पथावर न्यावयाचे असेल तर त्यांच्यात आत्मविश्वासाची, आत्मसन्मानाची भावना जागृत करायला पाहिजे, याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली; आणि हे साध्य करण्याचे इतिहास हे उत्तम व परिणामकारक साधन आहे; असे मत बंकिमचंद्रासारखे सुजाण विचारवंत मांडू लागले. इंग्रज इतिहासकारांनी लिहिलेला भारताचा इतिहास शास्त्रीय पद्धतीने लिहिला असला तरी तो जेत्यांनी पक्षपाती दृष्टिकोणातून पूर्वग्रहदूषित वृत्तीने लिहिलेला इतिहास आहे, तो विकृत स्वरूपाचा आहे, भारताच्या इतिहासाला न्याय देण्याचे कार्य भारतीयच करू शकतील, म्हणून सुशिक्षित भारतीयांनी इतिहास अध्ययनाकडे वळावे, मूळ साधनांचा चिकित्सक अभ्यास करून

शास्त्रीय पद्धतीने पुराव्यानिशी भारताचा इतिहास लिहावा असा विचार मूळ धरू लागला. रमेशचंद्र दत्त इंग्लंडहून उच्च शिक्षण पूर्ण करून भारतात परत आल्यानंतर बंकिमचंद्रांनी त्यांना भारताचा इतिहास अभ्यासण्याची आणि तो मातृभाषेत लिहिण्याची प्रेरणा दिली याची ते आवर्जून नोंद करतात.

पाश्चात्य शिक्षणाने शास्त्रीय इतिहासलेखनाचे तंत्र भारतीयांना अवगत करून दिले. पाश्चात्य इतिहासग्रंथांचे अध्ययन करताना ते कशा पद्धतीने लिहिले गेले, त्यासाठी कोणते ऐतिहासिक आधार वापरले, ते कशा पद्धतीने वापरले, शास्त्रीय पद्धतीने संशोधन व लेखन निरनिराळ्या लेखकांनी कसे केले आहे याची माहिती त्यांना झाली. युरोपात त्यावेळी विकसित झालेल्या शास्त्रीय इतिहासलेखन पद्धतीचा अंगिकार करून भारताचा इतिहासलिहिण्याची क्षमता पाश्चात्य इतिहासग्रंथांच्या परिशीलनाने सुशिक्षित भारतीयांत निर्माण झाली.

**राष्ट्रवादी इतिहासलेखनामागील प्रेरणा :**

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून इंग्रज शासकांचा भारतीयांप्रतीचा तोवरचा सहानुभूतीचा दृष्टिकोण व वर्तणूक बदलून त्याची जागा श्रेष्ठत्वाच्या दंभाने, उद्दामपणाने आणि आक्रमक भूमिकेने घेतली होती. राजा राममोहन राय सारख्या प्रतिष्ठित सन्मान्य व्यक्तीचा उघडपणे अधिक्षेप इंग्रज शासक बेदरकारपणे करीत होते. तसेच ख्रिस्ती मिशनरी शासकांच्या पाठिंब्यावर सार्वजनिक स्थळी भारतीय धर्माची अवहेलना करीत होते, देवदेवतांची उपहासाने टवाळी करीत होते, पाश्चात्य संस्कृतीचे व ख्रिस्ती धर्माचे गुणगान करून धर्मांतरासाठी भारतीयांवर दबाव आणीत होते. इंग्रज इतिहासकार प्राचीन भारतीय संस्कृतीचे, समाजाचे अवमूल्यन करून ती रानटी, अप्रगत असल्याचे ठाम प्रतिपादन करीत होते, अशा प्रकारे जेत्यांच्या वेगवेगळ्या गटांकडून भारतीयांना दूषणे दिली जात होती, त्यांचे चारित्र्यहनन केले जात होते. ही अपमानास्पद परिस्थिती आत्मविश्वास जागृत झालेल्या, आत्मसन्मानाची चाड असलेल्या सुशिक्षित भारतीयांना सहन होणे अशक्य होते. त्यांनी मिल सारख्या साम्राज्यवादी इंग्रज लेखकांनी प्राचीन भारतीय संस्कृतीवर केलेल्या दोषारापांचे खंडन करण्याचे आव्हान स्वीकारले, आणि ते लिखाण किती असत्य, सदोष आणि पूर्वग्रहदूषित आहे हे साधार सिद्ध करण्याचा चंग बांधला. प्राचीन भारताची माहिती देणाऱ्या वाङ्मयाच्या अध्ययनासाठी त्यांनी संस्कृत, पाली, फारसी इत्यादी भाषांवर प्रभुत्व मिळविले. प्राचीन हस्तलिखिते, पुरातत्त्वीय अवशेष, कोरीव लेख इत्यादी साहित्य गोळा केले आणि त्यांचा शास्त्रीय पद्धतीने

चिकित्सकपणे अभ्यास करून त्याचे सार आपल्या ग्रंथात शब्दबद्ध केले. अशा प्रकारे, जेत्यांची साम्राज्यवादी उद्दाम भूमिका आणि साम्राज्यवादी इंग्रज लेखकांनी भारतीयांना दिलेली दूषणे हा राष्ट्रवादी इतिहासलेखनामागील प्रेरणास्त्रोत ठरला. ही प्रेरणा काहीशी नकारात्मक स्वरूपाची होती. साम्राज्यवादाने केलेल्या आरोपांचे खंडन करण्याची भूमिका होती. ह्याला सकारात्मक प्रेरणेचा तात्त्विक आधार बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या सारख्या राष्ट्रीय वृत्तीच्या विचारवंतांनी दिला.

**राष्ट्रवादी लेखनाची उद्दिष्टे :**

राष्ट्रवादी इतिहासलेखनाच्या व्यापक प्रवाहाचे अवलोकन केल्यास त्यात प्रामुख्याने तीन उपप्रवाह निदर्शनास येतात. पहिला महत्त्वाचा उपप्रवाह प्रारंभीच्या काळातील इतिहासलेखनाच्या पहिल्या टप्यात आढळून येतो. राष्ट्रवादी इतिहास लेखनाला प्रारंभ स्थूलमानाने एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर झाला. ह्या कालावधीतील इतिहासलेखन ही प्रामुख्याने साम्राज्यवादी इतिहासलेखनाविरुद्धची प्रतिक्रिया होती. प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीवर परकीयांनी जे गंभीर दोषारोपण केले होते, त्यांचे साधार खंडन करून त्या लिखाणातून प्रसृत झालेले गैरसमज व अपसमज दूर करून भारतीयांत निर्माण झालेला न्यूनगंड दूर करणे, त्यासाठी प्राचीन साहित्य साधनांचे पुनःपरीक्षण व पुनर्मूल्यांकन करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते.

प्राचीन भारतावर ब्रिटिश इतिहासकारांनी पुढील आरोप केले. भारतात कधीच ऐक्याची भावना नव्हती, येथे सतत अराजक व अव्यवस्था होती, राजकीय व शासकीय विचार व संस्था येथे विकसित झाल्या नाहीत, येथे फक्त जुलमी हुकुमशाही अस्तित्वात होती,

भारतीय लोक कूपमंडूक वृत्तीचे होते, ते कधी देशाबाहेर पडले नाहीत, ते केवळ परलोकांवर दृष्टी ठेऊन जगत राहिल्यामुळे त्यांची भौतिक प्रगती झाली नाही, जे उत्तम साहित्य अगर शास्त्रीय ज्ञान येथे आढळते ते सर्व परप्रभावी आहे; महाभारत, रामायण सारख्या महाकाव्यांवर ग्रीक कवी होमरचा प्रभाव आहे, वैदिक संस्कृती ही बाहेरून आलेल्या आर्यांची निर्मिती होती, तत्त्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र यांवरही ग्रीकांचा व अरबांचा प्रभाव आहे; याचे सार म्हणजे येथे जे जे स्पृहणीय व प्रशंसापात्र आढळते ते भारतीयांचे स्वतःचे नसून परकीयांपासून मिळविलेले अगर परकीयांच्या प्रेरणेने निर्माण केलेले आहे; म्हणजेच भारतीय स्वयंप्रज्ञ नाहीत; भारतीय समाज एकसंघी नव्हता, जातीजातीत भेद केला जात होता, स्त्रियांना हीन दर्जा होता, अंधश्रद्धा, कर्मकांड, जादूटोणा, सती अशा अनिष्ट प्रथा होत्या, असे नानाविध दोषारोप केले जात होते. प्राचीन भारतात अंधश्रद्धा, जादूटोणा सारख्या अनिष्ट प्रथा अस्तित्वात होत्या असे विधान करताना, पाश्चात्य जगात मध्ययुगामध्ये देखील गुलामगिरी, भूदासप्रथा, प्रचलित धर्मव्यवस्थेविरुद्ध सूर काढणाऱ्यांना पाखंडी ठरवून जीवंत जाळणे अशा दुष्ट प्रथा होत्या, याचा मात्र साम्राज्यवाद्यांना सोईस्कर विसर पडला. तसेच प्राचीन भारतीय संस्कृतीतील स्पृहणीय व गौरवास्पद गोष्टींकडे ते काणाडोळा करीत होते याचीही भारतीयांना जाणीव होत होती. अशा पूर्वग्रहदूषित लिखाणातील खोटेपणा पुराव्यासह उघडकीस आणण्याचा प्रारंभीच्या इतिहासलेखनाचा मुख्य हेतू होता.

राष्ट्रवादी लेखनातील प्रवाह पहिल्या पिढीतील राष्ट्रवादी इतिहासकारांनी हिंदू धर्म व संस्कृतीवरील आरोपांचे खंडन केले. वेदांचा व महाकाव्यांचा काळ इंग्रज लेखक मानतात त्यापेक्षा पूर्वीचा आहे; असे रमेशचंद्र दत्त यांनी आपल्या *'Civilization in Ancient India'* ह्या त्रीखण्डात्मक ग्रंथात प्रतिपादित केले, तर त्यानंतर लोकमान्य टिळकांनी तो इ.स. पूर्व ४००० वर्षे हा होता असे सिद्ध केले. वैदिक धर्म व प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान तत्कालीन पाश्चात्य जगातील धर्म व तत्त्वज्ञानापेक्षा अनेक पटींनी वरच्या दर्जाचे होते; जातिव्यवस्था ही विषमतेचे द्योतक नसून ती श्रमविभाजनाच्या तत्त्वावर आधारली होती; प्राचीन काळी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा होता, असा पुरावा पुढे ठेऊन भारतीय समाजव्यवस्थेवर केलेला विषमतेचा, असमानतेचा आरोप खोडून काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच भारतीयांना प्राचीन काळी राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेची माहिती नव्हती; येथे फक्त जुलमी एकतंत्री हुकुमशाही होती ह्या आरोपातील फोलपणा दाखविण्यात आला; आणि भारतात राजावर प्रजेचा अंकुश होता, सभा, समिती अस्तित्वात होत्या, गणराज्येही अस्तित्वात होती असे ठामपणे प्रतिपादित करण्यात आले. याशिवाय भारतीय केवळ अध्यात्मातच बुडून राहिले नव्हते; त्यांना भौतिक व शास्त्रीय विकासाचे ज्ञान होते; गणित, खगोलशास्त्र, शरीरशास्त्र, औषधीशास्त्र अशी विविध शास्त्रेच नव्हेत तर अस्त्रविद्याही येथे विकसित झाली. नानाप्रकारचे उद्योग वाढले होते व परदेशी व्यापार समुद्रमार्गे चालणारा व्यापारही भारतीय करीत होते. जहाज बांधणीचे तंत्र ते जाणत होते, साहित्य, नृत्य, गायन, शिल्प, स्थापत्य अशा विविध कलांमध्ये ते पारंगत होते, हे दाखवून देण्याचा कसोशीचा प्रयत्न ह्या इतिहासलेखकांनी केला. अशा लेखकांत काशीप्रसाद जयस्वाल, राधाकुमुद मुखर्जी यांची नावे विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांचे लिखाण काहीसे अभिनिवेषी स्वरूपाचे आहे.

राष्ट्रवादी लेखनातील दुसरा प्रवाह वस्तुनिष्ठ लेखकांचा आहे. प्राचीन धर्म व संस्कृतीवर इंग्रजांनी केलेले आरोप त्यांनाही खटकले होते. त्यामुळे ते अस्वस्थ झाले होते. त्या आरोपांची सत्यता पडताळून पाहण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यासाठी ते प्राचीन भारताच्या अभ्यासाकडे वळले. परंतु ह्या अभ्यासकांचा दृष्टिकोण कोणत्याही प्रकारच्या अभिनिवेषाने प्रभावित झाला नव्हता. ऐतिहासिक सामग्रीचा व साधनांचा चिकित्सक अभ्यास करून हाती आलेले निष्कर्ष वस्तुनिष्ठपणे शब्दबद्ध करावयाचे अशी त्यांची इतिहास संशोधन व लेखनामागील शास्त्रीय दृष्टी होती. इंग्रजांनी केलेल्या आरोपांचे खंडन करणे, त्यातील फोलपणा दर्शविणे हाच केवळ त्यांचा हेतू नव्हता, तर ऐतिहासिक साधनांच्या चिकित्सक विश्लेषणातून जे सत्य हाती येईल, त्याची पुराव्यासह शास्त्रीय पद्धतीने मांडणी करणे अशी त्यांची

ऐतिहासिक सत्यशोधकाची भूमिका होती. त्यामुळे त्यांच्या लिखाणात अभिनिवेष आढळत नाही, तर विषयाची वस्तुनिष्ठ मांडणी आढळते. अशा लिखाणावर युरोपमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात प्रचलित झालेल्या वस्तुनिष्ठ इतिहासलेखनपद्धतीचा (*Positivist*) प्रभाव आढळून येतो.

तसेच इतिहासविषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करता यावा या उद्दिष्टाने प्रेरित होऊन अनेक इतिहासकारांनी ऐतिहासिक साधनांचा, लिखित साहित्याचा, पुरातत्त्वीय साधनांचा शोध घेण्याचे कसोशीने प्रयत्न केले. भारतात अनेक ठिकाणी विखुरलेले ऐतिहासिक साहित्य गोळा करून ते संपादित व प्रकाशित करण्याचे अथक प्रयत्न करण्यात अनेकांनी सारी हयात घालविली. इतिहास संशोधन, संपादन व लेखनाला संपूर्ण जीवन निःस्वार्थपणे वाहून घेणाऱ्यांनी भारतीय इतिहासाच्या क्षेत्राला केलेले योगदान निश्चितच मौलिक स्वरूपाचे आहे. यामुळे पुढील पिढीतील इतिहास अभ्यासकांचा मार्ग सुकर झाला. अशा वस्तुनिष्ठ इतिहास अभ्यासकांत डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, डॉ. आळतेकर, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, डॉ. जदुनाथ सरकार, डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांची नावे विशेषत्वाने उल्लेखनीय ठरतात. राष्ट्रवादी भारतीय इतिहासलेखनातील आणखी एक महत्त्वाचा प्रवाह लक्षणीय आहे.

प्रारंभीच्या इतिहासलेखकाप्रमाणे इंग्रजप्रणित आरोपांचे खंडन करण्यात ह्या प्रवाहातील लेखकांना रस नव्हता. किंवा वस्तुनिष्ठ लिखाणाने इतिहासदर्शन घडविण्याचीही त्यांची भूमिका नाही. त्यांची भूमिका आव्हानात्मक आणि आक्रमक होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत दादाभाई नौरोजी, रमेशचंद्र दत्त, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी ब्रिटिश वसाहतवादाचे आणि इंग्रजांनी चालविलेल्या भारताच्या आर्थिक शोषणाचे स्वरूप उघडकीस आणले होते. इंग्रजांचा कल्याणकारी शासनाचा दावा फोल असल्याचे बुद्धिवाद्यांच्या ध्यानात आले होते. राष्ट्रीय अस्मिता जागृत होऊ लागली होती. राष्ट्रवादाचे स्पष्ट हुंकार उमटू लागले होते. अशा परिस्थितीत इंग्रजांच्या शासन व्यवस्थेमागील उद्दिष्टे, त्यांची धोरणे, त्यांच्या राजकीय व लष्करी हालचाली यांचा चिकित्सक अभ्यास करण्यास भारतीय इतिहासकार पुढे सरसावले. इंग्रज शासनातील दुटप्पीपणा, फसवेगिरी, कावेबाजपणा, भेदनीती, अन्याय यांची स्पष्ट कल्पना भारतीय अभ्यासकांना होऊ लागली आणि ह्या जाणिवेतून जन्माला आलेले लिखाण आव्हानात्मक आणि आक्रमक बनले. इंग्रज शासनाच्या अन्याय्य शोषक स्वरूपाचे तसेच फंदफितुरीचे, कुटील राजनीतीचे पितळ उघडे पाडणारे इतिहासलेखन राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा महत्त्वाचा प्रवाह बनला. इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने प्रारंभीच्या लढाया लष्करी बळावर अगर श्रेष्ठत्वावर जिंकल्या नाहीत, तर त्या फंदफितुरी माजवून भारतीयांत फूट पाडून जिंकल्या, लॉर्ड डलहौसीचे संस्थानांच्या विलीनीकरणाचे धोरण हा उघडानागडा विस्तारवाद होता, ते धोरण अन्याय्य व अनैतिक होते असे इंग्रजांवर उघडउघड आरोप करणारे आणि त्याला सबळ पुराव्याचा विश्वासार्ह आधार देणारे लिखाण मेजर बी.डी. बसू यांनी '*The Story of Satara*' आणि पंडित सुंदरलाल यांनी '*How India Lost Her Freedom*' ह्या ग्रंथांमध्ये केले. तसेच भारतीय समाजात विभिन्न गट प्राचीन व मध्ययुगात एकत्र गुण्यागोविंदाने नांदत होते, त्याकाळी समाज दुभगलेला नव्हता, भारतात जमातवादाला, जातीयवादाला आणि फुटीर वृत्तींना इंग्रजांनी स्वार्थासाठी खतपाणी घातले, मुस्लिम शासनकाळातही सामान्य नागरिक ब्रिटिश शासनकाळापेक्षा अधिक सुखी व सुरक्षित होता; भारतीय संस्कृती ही प्राचीन भारतीय व इस्लामिक संस्कृतीच्या समन्वयातून उत्क्रांत झाली आहे, भारतीयांच्या आर्थिक अवनतीला ब्रिटिशांचे वसाहतवादी धोरण प्रामुख्याने कारणीभूत आहे; भारतीयांना स्वशासनाचा अधिकार नाकारण्यासाठी पुढे मांडण्यात येणारे दोन भिन्न विरोधी समाजगटांच्या अस्तित्वाचे कारण खरे नाही, ते निमित्त पुढे करून शासनकर्ते आपल्या एकतंत्री शासनव्यवस्थेला यत्किंचितही तडा जाऊ नये म्हणून भारतीयांना स्वशासनाचे अधिकार नाकारीत आहेत, असे आक्रमक स्वरूपाचे लिखाण स्थूलमानाने विसाव्या शतकाच्या तिसऱ्या चौथ्या दशकात सुरू झाले. इतकेच नव्हे तर इंग्रज आक्रमणाला भारतीयांनी प्रतिकार केला; सिराज उद्दोला, मीर कासीम यांनी, तसेच नानासाहेब पेशवे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे इत्यादींनी निर्भीडपणे परकीय सत्तेला आव्हान दिले; असे ठामपणे प्रतिपादन करीत १८५७ चा उठाव हे भारतीयांचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते, त्यामागे निश्चित पूर्वयोजना होती आणि त्यात हिंदू व मुस्लीम ह्या दोन्ही जमातीचे लोक उत्साहाने सहभागी झाले होते; असा निष्कर्ष पुराव्यांच्या आधारे विनायक दामोदर सावरकरांनी काढला. तसेच '*Civil Rebellions in the Indian Mutiny 1857-59*' ह्या आपल्या ग्रंथात भारतीय

शिपायांनीच केवळ नव्हे तर सर्वसामान्य लोकही उठावात सामील झाले असल्यामुळे ते राष्ट्रीय युद्ध होते असे निःसंदिग्ध मत मांडले.

राष्ट्रवादी भूमिकेने आणखी एका इतिहासअध्ययन प्रवाहाला जन्म दिला. हा प्रवाह प्रादेशिक इतिहासलेखनाचा होता. भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांचे इंग्रजांनी लिहिलेले लिखाण अपूरे व सदोष होते, मूळ ऐतिहासिक साधनांचा चिकित्सक अभ्यास करणे भाषेच्या अडचणीमुळे त्यांना कठीण असल्यामुळे त्यांच्या लेखनात त्रुटी होत्या, शिवाय लेखनामागील वृत्ती जेत्यांची होती. त्यामुळे भिन्न प्रदेशांतील अभ्यासकांनी आपल्या प्रदेशांचा इतिहास भारतीय भूमिकेतून लिहिण्याचे कार्य हाती घेतले. ह्या प्रयत्नांचे दृश्य फळ म्हणजे महाराष्ट्र, राजस्थान, दक्षिण भारत, बंगाल इत्यादी प्रदेशांचे लिहिलेले इतिहास हे होय. हा राष्ट्रवादी वृत्तीचाच एक आविष्कार होता. उदाहरणार्थ; मराठी सत्तेचा इतिहास ग्रांट डफ याने १८२६ साली लिहिला होता. ह्या ग्रंथातील काही चुका दाखवून देणारा निबंध निळकंठ जनार्दन कीर्तने नावाच्या पुण्याच्या डेक्कन कॉलेजातील बी. ए. च्या वर्गातील विद्यार्थ्याने 'पूना यंग मेन्स असोसिएशनच्या' सभेत १८६७ साली वाचला. सुप्रसिद्ध इतिहास संशोधक वि. का. राजवाडे यांनाही हा ग्रंथ प्रामुख्याने चिटणीस बखरीच्या आधारे लिहिला असल्यामुळे अपुरा व अविश्वसनीय वाटला पातून मराठ्यांचा इतिहास अभ्यासण्यास महाराष्ट्रातील अभ्यासकांना प्रेरणा मिळाली ह्या विषयाचा सखोल व सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी फारसी भाषेचा अभ्यास होऊ लागला. मूळ कागदपत्रांचा शोध घेण्यास आणि ठिकठिकाणी विखुरलेली साधने गोळा करण्याचे कार्य वेगाने सुरू झाले. ही हस्तलिखित कागदपत्रे गोळा केल्यानंतर त्यांचे चिकित्सक विश्लेषण, संपादन व प्रकाशन करण्यास मराठी संशोधक पुढे सरसावले. प्रथम काव्येतिहास संग्रहासारख्या प्रकाशनातून लिखित साधने फुटकळ रूपात प्रकाशित झाली. पुढे अशा विश्वासार्ह कागदपत्रांचे संग्रह अभ्यासपूर्ण प्रस्तावना व टीपांसह प्रकाशित होऊ लागले. अशा संग्रहांमध्ये राजवाडे संपादित मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पारसनीसांचे इतिहास संग्रह, सरदेसाईचे पेशवा दफ्तर यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. जदुनाथ सरकारांसारख्या परप्रांतीय विद्वानानेही शिवाजीवर ग्रंथ लिहून व पुण्याच्या रेसिडेन्सीचा पत्रव्यवहार छापण्यास मदत करून मराठ्यांच्या इतिहासाला मोलाचे योगदान केले. असाच प्रवाह इतरत्रही सुरू झाला. दक्षिण भारताचा इतिहास प्रकाशात आणण्याचे मोलाचे कार्य कृष्णस्वामी अय्यंगार, डॉ. नीळकंठ शास्त्री यांनी केले. वर उल्लेखिलेले वेगवेगळे उपप्रवाह मिळून राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा प्रवाह रुंदावत गेला, व्यापक होत गेला. यांपैकी सावरकरांसारख्याचे लिखाण प्रचारकी थाटाचे आहे आणि म्हणून त्याचा अंतर्भाव इतिहासग्रंथात करू नये, असा आक्षेप काही वस्तुनिष्ठ इतिहासकार घेतात. परंतु अशा लेखकांनी घटनांचा अन्वयार्थ आपल्या मतानुसार लावला असला, तरी लिखाण पुराव्यांच्या आधारे केलेले असल्यामुळे, त्यांनी केलेली विधाने कपोलकल्पित व निराधार नसल्यामुळे त्यांना इतिहासग्रंथाचा दर्जा देण्यास प्रत्यवाय नाही. सी.एच्. फिलिप्स यांनी संपादित केलेल्या '*Historians of India, Pakistan and Ceylon*' ह्या ग्रंथातील लेखांत डॉ. रमेशचंद्र मुजुमदारांनी राष्ट्रवादी इतिहासकाराची व्याख्या केली आहे. 'प्राचीन भारताची केवळ महती दाखविण्यासाठी सबळ पुराव्याच्या आधाराखेरीज केलेले लिखाण प्रचारकी थाटाचे होते; परंतु राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या मुद्यांबाबत प्रचलित असलेल्या गैरसमज अगर अपसमजांचे मूळ विश्वसनीय साधनांच्या आधारे परिक्षण अगर पुनर्मूल्यांकन करणे समर्थनीय ठरते आणि ते राष्ट्रवादी लेखनाच्या कक्षेत अंतर्भूत करण्यास प्रत्यवाय नाही' असे मत त्यांनी प्रदर्शित केलेले दिसते. यावरून भारताबाबत इंग्रज लेखकांनी निर्माण केलेले गैरसमज ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे दूर करण्याचा प्रयत्न करणारे लिखाण राष्ट्रवादी इतिहासाच्या कक्षेत मोडते.

**राष्ट्रवादी इतिहासलेखन :**

राष्ट्रवादी इतिहासलेखनाचे क्षेत्र व्यापक आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी ह्या प्रवाहाचा उगम दिसला तरी तो लक्षणीय बनण्यास विसावे शतक उगवावे लागले. ह्या क्षेत्रात प्राचीन भारतीय संस्कृतीबद्दलच्या आरोपांचे खंडन करणाऱ्या लेखकांत काशीप्रसाद जयस्वाल आणि राधाकुमुद मुखर्जी, तर वस्तुनिष्ठ इतिहासात प्रामुख्याने डॉ. भांडारकर आणि डॉ. आळतेकर यांचा अंतर्भाव होतो. मध्ययुगीन भारताबाबत इंग्रजांच्या आक्षेपांना उत्तर देण्याचे काम डॉ. आशिर्वादीलाल श्रीवास्तव, डॉ. महम्मद हबीब, के. एम्. अशरफ, ताराचंद यांनी केले, तर वस्तुनिष्ठ लिखाण करणाऱ्यांत सर जदुनाथ सरकार अग्रगण्य ठरतात. मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाशझोत टाकण्यात राजवाडे,

पारसनीस, सरदेसाई यांनी मोलाची कामगिरी केली. भारतावरील ब्रिटिश शासनकाळावर लिखाण करणाऱ्यांपैकी मेजर बसू आणि पंडित सुंदरलाल सारख्यांनी इंग्रजांच्या कावेबाजपणाचे, फसवेगिरीचे, भेदनीतीचे वाभाडे काढले, तर डॉ. ईश्वरीप्रसाद, डॉ. ताराचंद सारख्या लेखकांनी भारतातील जमातवादाला इंग्रज शासकांनी खतपाणी घातले, ज्या ज्या वेळी राष्ट्रीय काँग्रेस व मुस्लिम नेते एकत्र येताना आढळले, त्या प्रत्येक वेळी परकीय शासकांनी त्यात खीळ घातली. साम्राज्यवादी शासकांनी भारतीय मुस्लिमांना हाताशी धरून राष्ट्रीय चळवळ खच्ची करण्याचे कारस्थान रचले, भारताची फाळणी हा याच धोरणाचा परिपाक होता, असे विवेचन केलेले आढळते. डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनी भारतीय संग्रामाचे विवेचन वस्तुनिष्ठ भूमिकेवरून करताना भारतीय नेत्यांनी केलेल्या चुकांवर बोट ठेवले असले तरी ब्रिटिश शासकांनी भारताला स्वायत्तता देण्याचे नाकारण्यास, जमातवादाचे निमित्त पुढे केले असे मत प्रदर्शित केले आहे.

**प्राचीन भारताबाबत लिखाण करणारे काही महत्त्वाचे इतिहासकार**

**काशीप्रसाद जयस्वाल : (१८८१-१९३७)**

उत्तरप्रदेशात जन्माला आलेल्या काशीप्रसादांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात कायद्याचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर कलकत्त्याच्या उच्च न्यायालयात वकिलीचा व्यवसाय सुरू केला. प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभिमान असलेल्या काशीप्रसादांचे नाव शासकांनी काळ्या यादीत घातले होते. इंग्रजांनी भारतीय संस्कृतीची अवहेलना व अवमूल्यन केले आहे, ही ठाम समजूत झालेले काशीप्रसाद प्राचीन संस्कृतीच्या अमोल वारशाचे पुनरुज्जीवन करण्यास इतिहाससंशोधन व लेखनाकडे वळले. त्यांनी संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळविले; धर्मशास्त्रीय ग्रंथांचा, कोरीव लेखांचा, प्राचीन नाण्यांचा त्यांनी नेटाने अभ्यास केला. ह्या सखोल अध्ययनाने दोन मौलिक ग्रंथ निर्माण केले- *'Hindu Polity'* व *'History of India (150-350 AD.)'* यांपैकी *'Hindu Polity'* हा विशेष महत्त्वाचा ग्रंथ होय. यात भारतात प्राचीन काळी प्रातिनिधिक संस्था नव्हत्या, निरंकुश राजसत्ता फक्त होती ह्या आरोपांना पुराव्यानिशी छेद दिला आहे. वैदिक काळात सभा व समिती ह्या प्रातिनिधिक संस्था होत्या, त्या राजावर अंकुश ठेवीत. कधी कधी राजाची निवड केली जाई, राजा मंत्र्यांच्या सल्ल्याने कामकाज करी, बौद्ध काळातील संघात लोकशाहीचे तत्त्व अस्तित्वात होते, येथील सोळा महाजनपदांत गणराज्येही होती- अशा प्रकारे पाश्चात्य जग रानटी अवस्थेत असताना भारतात घटनात्मक राजपद्धतीसारख्या प्रगत विचारप्रणाली व संस्था अस्तित्वात होत्या असा निष्कर्ष ते काढतात. *'History of India'* ह्या ग्रंथात नागांनी शक व कुशाण आक्रमणाचा शौर्याने प्रतिकार केला याचे विवेचन केले आहे. जयस्वालांच्या काही निष्कर्षांवर नंतर आक्षेप घेतले गेले, मात्र भारतातील गणराज्यांचे त्याचे विवेचन मान्य झालेले आहे. त्यांच्या संपूर्ण लिखाणातून त्यांचा प्रखर राष्ट्रवाद व प्राचीन संस्कृतीचा अभिमान आविष्कृत होतो.

राधा कुमुद मुखर्जी (१८८०-१९६३) :- बंगालमधील एका प्रतिष्ठित कुटुंबात जन्माला आलेल्या व विद्यार्जनात प्राविण्य मिळविलेल्या राधाकुमुद यांचा पिंडही राष्ट्रवादी होता. प्राचीन भारतीय लोक केवळ परलोकावर दृष्टी खिळवून बसले होते, त्यांनी कोणतीही भौतिक व शास्त्रीय प्रगती केली नाही हे परकीय इतिहासकारांचे आरोप कसे दिशाभूल करणारे व भ्रामक आहेत, हे त्यांनी आपल्या लिखाणातून दाखवून दिले. *The History of Indian Shipping Maritime Activity from the earliest Times; Local self Government in Ancient India, Ancient Indian Education: The Fundamental Unity of India: The Gupta Empire* हे त्यांच्या अनेक ग्रंथांपैकी महत्त्वाचे ग्रंथ होत. प्राचीन काळापासून मुघल शासनकाळापर्यंत भारतीयांच्या नाविक हालचाली चालू होत्या, आफ्रिका व मलाया बेटांच्या समूहापर्यंत भारतीय नौका जात होत्या, सागरी व्यापार चालू होता, हे ते भिन्न भाषांतील साहित्य व पुरावशेष व नाण्यांच्या आधारे सिद्ध करतात. प्राचीन भारतातील विद्याध्ययनाची उत्क्रांती ते उलगडून दाखवितात. भौगोलिक स्थिती, राजकीय विचार तसेच समान संस्कृती यांत भारताच्या ऐक्याची बीजे स्पष्ट निदर्शनास येत असल्याचे ते ठामपणे प्रतिपादन करतात, तर गुप्त साम्राज्यावरील ग्रंथात गुप्त शासनकाळात झालेल्या सांस्कृतिक व भौतिक विकासाचा उहापोह करतात. त्यांनी प्राचीन भारतावर विपुल लिखाण केले असून विन्सेंट स्मिथ, ए.बी. कीथ सारख्या सुप्रसिद्ध इंग्रज लेखकांनी देखील त्यांच्या लिखाणाची प्रशंसा केलेली आढळते.

**डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर (१८३७-१९२५) :-**

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर प्राचीन भारतीय इतिहासाचा शोध घेण्यास जे आंग्लशिक्षित तरुण पुढे सरसावले, त्यात भांडारकरांचे नाव अग्रगण्य आहे. त्यांनी सर्व उपलब्ध ऐतिहासिक साधनांचे चिकित्सक विश्लेषण करून, वस्तुनिष्ठ व संतुलित वृत्तीने निष्कर्ष काढून ते सोप्या परंतु परिणामकारक भाषेत शब्दबद्ध करण्याचा शास्त्रीय इतिहासलेखनप्रवाह रूढ केला.

चतुरस्र बुद्धिमत्ता लाभलेल्या भांडारकरांचा संस्कृत, प्राकृत व इंग्रजी भाषेचा, तसेच तत्त्वज्ञान व धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास होता. ह्या प्रज्ञावंताने सारी हयात इतिहाससंशोधनात व लिखाणात व्यतीत केली. *'The Early History of the Deccan'* आणि *'A Peep into the Early History of India'* हे त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. दख्खनच्या इतिहासावरील ग्रंथात ते पश्चिम भारताचा प्राचीन काळापासून मुस्लिम आक्रमणापर्यंतचा इतिहास रेखाटतात. त्यात राजकीय घडामोडींबरोबर आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक स्थितीचे वर्णनही आढळते. भारताच्या इतिहासावरील ग्रंथात उत्तर भारताचा मौर्यकाळापासून गुप्तसाम्राज्याच्या अंतापर्यंतचा वृत्तांत दिलेला आहे. ह्या दोन्ही ग्रंथांत वर्ण्य-विषयाचे तपशिलात चिकित्सक विवेचन केलेले दिसते. युरोपातील रांकेप्रणित शास्त्रीय इतिहासलेखनपद्धतीचे ते खंदे पुरस्कर्ते असून पूर्वग्रहाने केलेले इतिहासलेखन ते त्याज्य मानतात. व्यक्तिगत जीवनात धर्मनिष्ठ असले तरी त्याची यत्किंचितही छाया त्यांच्या लेखनावर पडलेली नाही. पुण्यात उभी असलेली 'भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इंस्टिट्यूट' ही संस्था त्यांच्या मौलिक कार्याचे स्मारक आहे. ह्या संस्थेने इतिहासकारांच्या भारतीय तसेच परकीय संशोधकांच्या पिढ्यांना प्रेरणा दिली आहे, मार्गदर्शन दिले आहे.

**डॉ. अनंत सदाशिव आळतेकर (१८९८-१९५९)**

संस्कृत व इतिहास विषयाचे व्यासंगी अभ्यासक असलेल्या आळतेकरांनी बनारस हिंदू विद्यापीठात व पाटणा विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक म्हणून काम केले. इतिहासाच्या क्षेत्रातील मौलिक संशोधनकार्याने त्यांना काशीप्रसाद जयस्वाल रिसर्च इंस्टिट्यूटचे संचालकपद मिळवून दिले. शिलालेख, ताम्रपट, पुरावशेष, नाणी यांचा त्यांनी विशेष अभ्यास केला. सर्वांगीण चिकित्सक संशोधन व वस्तुनिष्ठ दृष्टिकोण ही त्याच्या लेखनाची वैशिष्ट्ये होत. शैक्षणिक क्षेत्रात पाश्चात्यांच्या तुलनेत प्राचीन भारत मागासलेला होता हा भ्रामक समज त्यांनी *'Education in Ancient India'* ह्या ग्रंथाद्वारा दूर केला. येथे संपन्न उच्च दर्जाची विद्यापीठे होती, परदेशी विद्यार्थी देखील येथे विद्यार्जनासाठी येत असल्याचे नमूद केले, राष्ट्रकुट व गुर्जर प्रतिहारांच्या इतिहासावर प्रकाश टाकला. प्राचीन काळातील स्त्रीजीवनाचा अभ्यास करून प्राचीन काळी स्त्रियांना समाजात बरचा दर्जा होता, मध्ययुगात धार्मिक रूढी, कर्मकांड, परंपरा, अंधश्रद्धा यांचे स्तोम माजल्यानंतर तो घसरत गेला असे त्यांनी प्रतिपादन केले. मनुस्मृती, शुक्रनीती, अर्थशास्त्र, बौद्ध वाङ्मय यांचा सूक्ष्म अभ्यास करून येथे गणराज्ये व प्रतिनिधी गृहे होती, राज्यसत्तेचे वेगवेगळे सिद्धांत प्रचलित होते हे त्यांनी साधार सिद्ध केले. महाभारताच्या व्यासपर्वातील राजनीतीचा विचार त्यांनी उलगडून दाखविला. तसेच शालीवाहन शक, संवत्सर यांवर लेख लिहून कालगणनेत सुस्पष्टता आणली. इतिहासलेखनात शास्त्रीय दृष्टिकोण व साधनांचे चिकित्सक परीक्षण यावर ते भर देतात.

**मध्ययुगीन भारताबाबतचे इतिहासलेखन :-**

भारताच्या मध्ययुगातील मुस्लिम शासनाबाबतचे प्रचलित गैरसमज खोडून काढण्याच्या इतिहासकारांनी केलेल्या प्रयत्नात डॉ. महंमद हबीब आणि के. एम. अशरफ यांचे लिखाण लक्षणीय ठरते.

**डॉ. महंमद हबीब :-**

ऑक्सफर्ड विद्यापीठात पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान आधुनिक इतिहासाचे अध्ययन करून परत आल्यानंतर मध्ययुगीन भारतातील मुस्लिम शासनाचे सखोल अध्ययन करणारे ते पहिले आधुनिक मुस्लिम इतिहासकार होत. त्याकाळी मुस्लिम लेखकांत कट्टर मूलतत्त्ववादी आणि हिंदूविरोधी लेखनाचा प्रवाह प्रामुख्याने अलिगढ विद्यापीठात रूढ होता. त्या प्रवाहाला छेद देण्याचा आणि अलिगढला राहूनही वस्तुनिष्ठ आणि निधर्मी भूमिकेतून भारतातील मुस्लिम शासनाचा अभ्यास करणारे इतिहासकार म्हणून महंमद हबीबांचे कार्य मोलाचे आहे. आपल्या संशोधन कार्यासाठी त्यांनी गझनीच्या महंमदाचा विषय निवडला आणि निधर्मी दृष्टिकोणातून त्याचा अर्थ लावला. हे एक क्रांतिकारी पाऊल होते. अकराव्या शतकात इस्लाम धर्मीयांतील धर्मनिष्ठा, नैतिकता मागे पडून महंमदासारखे महत्त्वाकांक्षी मुस्लिम धर्मप्रसारासाठी नव्हे, तर द्रव्यलोभाने आणि कीर्तीच्या मोहाने शस्त्राचा वापर करू लागले होते. हिंदूंच्या मंदिरांत विध्वंस करण्यामागे धार्मिक नव्हे, तर लुटालूट करण्याचा व द्रव्य मिळविण्याचा हेतू होता; आपल्या सैनिकांना धर्माच्या नावावर आवाहन करून लढण्यास प्रवृत्त करणे सुकर होते, तेच महंमदाने केले; त्यामुळे महंमदाला इस्लाम धर्माचा प्रसारक मानणे योग्य नाही; त्याला शूरवीर, मुस्लिम प्रेषिताचा दर्जा देणे चुकीचे आहे. महंमदाच्या द्रव्यलालसेला व सत्तालालसेला धर्माचा आधार नव्हता, मध्यआशियातील लष्करी मोहिमांत त्याला द्रव्यबळाची गरज होती, म्हणून तो प्रचंड लूट घेऊन परत गेला; असा महंमदाच्या आक्रमणाचा अन्वयार्थ लावून डॉ. हबीबांनी कट्टर धर्मनिष्ठ मुस्लिमांना धक्का दिला. डॉ. हबीबांच्या लिखाणातून राष्ट्रवादी विचारांचे निःसंदिग्ध दर्शन घडते. धर्म ही वैयक्तिक बाब आहे, ती सार्वजनिक जीवनाच्या आड येऊ नये, भारतीय मुस्लिमांनी राष्ट्रवादी वृत्तीने स्वातंत्र्य लढ्यात इतर गटांबरोबर सहभागी व्हावे व साम्राज्यवादाविरुद्ध लढा द्यावा असा सल्ला ते भारतीय मुस्लिमांना देतात. हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार त्यांनी लिखाणाद्वारे केला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ते समाजवादाकडे वळले. इलियट डाऊसन यांच्या '*History of India*' ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीला लिहिलेल्या प्रस्तावनेत 'सामाजिक विकासासाठी भारतात समाजवाद लाभदायक ठरेल' असे विधान ते करतात; तसेच मध्ययुगीन भारतात तुर्की सुलतानांच्या काळात शहरांमध्ये व ग्रामीण भागात क्रांती घडून आली, निम्न वर्गातील कामगार, लहान शेतकरी जाचातून मुक्त झाले आणि म्हणून मंगोल आक्रमण परतवून लावण्यात सुलतानांना यश आले असे वस्तुनिष्ठ भाष्य, धर्माचा विचार बाजूला सारून डॉ. हबीब करताना आढळतात. मध्ययुगातील पश्चिम आशियापासून भारतापर्यंतच्या इस्लाम धर्मीय समाजाचे ते विश्लेषण करतात. महंमद पैगंबराने प्रस्तापित सामाजिक व धार्मिक संस्थांना नैतिक आव्हान दिले व इस्लामने रक्तहीन नैतिक क्रांती घडवून आणली. ही क्रांती घडवून आणण्यास नवे विचारही कारणीभूत असतात असे, डॉ. हबीब ठामपणे प्रतिपादन करतात आणि ह्या दृष्टीने ते इस्लाम धर्माच्या कार्याचे विवेचन करतात. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी डॉ. हबीबांनी दिली आणि राष्ट्रवादाचा पुरस्कार केला हे त्यांचे मोलाचे योगदान होय.

**के. एम्. अशरफ :-**

याच सुमारास मध्ययुगीन भारताचा, विशेषतः सुलतानशाहीचा अभ्यास अशरफ करीत होते. १९३५ साली '*Life and Conditions of the people of Hindustan (1200-1500 A.D.)*' हा त्यांचा ग्रंथ प्रकाशित झाला. सुलतानशाहीतील भारतीय समाजजीवनाचा निधर्मी वृत्तीने अभ्यास करणारे ते दुसरे इतिहासकार आहेत. समाजातील भिन्न गट, आमीर उमराव, गुलाम, शेतकरी, कारागीर, वेषभूषा, करमणुकीची साधने यांचा उहापोह ते करतात. मुस्लिम राज्यकर्ते आल्यामुळे भारतीयांच्या दैनंदिन जीवनात कोणताही मूलभूत बदल घडून आला नाही, हिंदू व मुस्लिम गटांत कोणत्याही प्रकारचा संघर्ष निर्माण झाला नाही, उलट ह्या दोन्ही समाजात सांस्कृतिक समन्वयाचे वातावरण निर्माण झाले; असे विवेचन अशरफ करतात. मुस्लिम राज्य स्थापन झाल्यानंतर समाज दोन भिन्न गटांत विभागला गेला, राज्यकर्ते जुलमी/अत्याचारी होते, इस्लाम धर्म प्रजेवर लादण्याचा त्यांचा प्रयत्न होता, अशा इंग्रज लेखकांनी केलेल्या आरोपात तथ्य नाही, ते आरोप दिशाभूल करणारे आहेत अशी राष्ट्रवादी भूमिका डॉ. हबीब आणि अशरफ यांनी घेतलेली दिसते.

**सर जदुनाथ सरकार : (१८७०-१९५८) –**

जर्मन इतिहासकार लिओपोल्ड संके याने पुरस्कृत केलेल्या सत्याधिष्ठित चिकित्सक व वस्तुनिष्ठ इतिहासलेखनाच्या सैद्धांतिक भूमिकेनुसार संशोधन व लेखन करणाऱ्या भारतीयांत जदुनाथ सरकार यांचे स्थान अग्रगण्य आहे. प्राचीन भारताच्या अध्ययनात हा प्रवाह आणण्याचे श्रेय जसे डॉ. भांडारकरांना, तसे मध्ययुगीन भारतात मूलगामी संशोधन व वस्तुनिष्ठ लेखनाचे श्रेय जदुनाथ सरकारांचे आहे. इंग्रजी साहित्य आणि इतिहास ह्या दोन्ही विषयांवर सारखे प्रभुत्व असलेले, कुशाग्र व चिकित्सक बुद्धीची देणगी लाभलेले जदुनाथ, इंग्रजी वाङ्मयाच्या अध्यापनाकडून इतिहास विषयाकडे वळले आणि सारी हयात संशोधन व लेखनात व्यतीत केली. संशोधन कार्याला पुरेसा वेळ देता यावा म्हणून कलकत्ता विद्यापीठाच्या कुलगुरूचे दुसऱ्यांदा मिळणारे पद त्यांनी नाकारले. वयाच्या पन्नास वर्षांपेक्षाही अधिक वर्षे जदुनाथ सरकारांनी संशोधन व लेखनांत व्यतीत केली.

जदुनाथांचा व्यासंग दांडगा आणि लेखन विपुल व वैविध्यपूर्ण आहे. त्यांच्या अध्ययनाचे क्षेत्र स्थूलमानाने मुघल कालीन भारत हे असून, ह्या काळाचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. इंग्रजी बरोबरच संस्कृत, फारसी, पोर्तुगीज, फ्रेंच, मराठी भाषांचा अभ्यास केला. ज्या प्रदेशांचा वर्ण्यविषयाशी संबंध असेल त्या प्रदेशाचा प्रत्यक्ष दौरा केला व भौगोलिक स्थिती अभ्यासली. वर्ण्यविषयाचा समग्र अभ्यास व त्यावर प्रदीर्घ मनन व चिंतन यातून त्यांच्या वर्ण्यविषयाचे प्रारूप तयार झाले आणि मोजक्या परंतु अर्थपूर्ण शब्दांत व साहित्यिक ओघवती भाषेत त्याला मूर्तरूप मिळाल्यामुळे त्यांचे लेखन शास्त्रशुद्ध, सत्याधिष्ठित,

चिकित्सक, वस्तुनिष्ठ व तरीही परिणामकारक व अतिशय वाचनीय झाले आहे. सरकारांच्या विपुल ग्रंथसंपदेतील *'History of Aurangzeb'* हा पंचखंडात्मक ग्रंथ, चार खंडात प्रकाशित झालेला *'Fall of the Mughal Empire'* आर्यविनच्या *'Later Mughals'* ह्या ग्रंथाला जोडलेली अखेरची प्रकरणे आणि महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधीची *'Shivaji and His Times'* व *'House of Shivaji'* हे ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहे. याशिवाय त्यांनी मूळकागदपत्रांचे केलेले चिकित्सक संपादन आणि त्या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना मोलाच्या आहेत. उदाहरणार्थ, फारसी बातमीपत्रे, पुणे रेसिडेन्सीचा पत्रव्यवहार इत्यादी. याखेरीज जदुनाथ सरकारांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे इतिहासकारांची एक पिढी त्यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रेरणेने तयार झाली. डॉ. आशिर्वादीलाल श्रीवास्तव, डॉ. हरीराम गुप्ता, डॉ. कानुनगो, डॉ. रघुवीर सिंह ह्यांसारख्या प्रसिद्धी पावलेल्या मध्ययुगीन भारताच्या अभ्यासकांना इतिहासाचे संशोधन व लेखन कसे करावे याबाबत त्यांनी दिलेल्या बारिकसारिक परंतु मोलाच्या सूजना आश्चर्यजनक वाटतात. याद्दष्टीने त्यांनी डॉ. रघुवीर सिंह व गो. स. सरदेसाईंना लिहिलेली पत्रे बोलकी आहेत. "खऱ्या इतिहासकाराचे काम जठरासारखे आहे; विविध प्रकारचे अन्न पचवून त्यातून नेमके आवश्यक तेच रस शोषून घेण्याचे काम जठराप्रमाणे इतिहासकाराला करावयाचे असते." हे त्यांचे सरदेसाईंना लिहिलेल्या पत्रातील विधान म्हणजे इतिहास संशोधन व लेखनाचे मार्मिक सार आहे. इतिहासाच्या क्षेत्रात सरकारांनी जपलेली व जोपासलेली सत्यनिष्ठा हे त्यांचे लक्षणीय वैशिष्ट्य होय. आपले लिखाण ऐतिहासिक सत्यावर आधारलेले असावे याबाबत ते कटाक्षाने काळजी घेत आणि अशा लेखनामुळे काही वाचकांत क्षोभ निर्माण झाला तरी त्याची पर्वा ते करीत नसत. औरंगजेबावरील ग्रंथाच्या तिसऱ्या खंडात औरंगजेबाच्या शासनाबाबतच्या विधानांनी काही मुस्लिम वाचक, तसेच शिवाजीवरील ग्रंथाने मराठी मने दुखावली गेली. परंतु त्यामुळे सरकारांची सत्यनिष्ठा ढळली नाही. १९१५ साली बंगालच्या इतिहास परिषदेपुढे बोलताना 'सत्य सुखद आहे की नाही याचा विचार मी करीत नाही; माझ्या राष्ट्राच्या महानतेला सत्यदर्शनाने धक्का पोचेल की काय हा विचार माझ्या मनात येत नाही. सत्याचा शोध, जाण व सत्याचा स्वीकार हे माझे ब्रीद आहे', असे वक्तव्य सरकारांनी केले.

हे त्यांचे विधान जर्मन इतिहासकार नीबूर याच्या सुप्रसिद्ध विधानाचे स्मरण करून देते. अशा कठोर सत्यनिष्ठेमुळे ते भारतातील शास्त्रीय इतिहासलेखनाच्या प्रवाहातील अग्रगण्य इतिहासकार ठरतात. त्यांची लिखाणामागील प्रेरणा कट्टर राष्ट्रवादाची नसली तरी एका भारतीयाने भारतीय द्दष्टिकोणातून केलेले मध्ययुगीन काळाचे सत्यदर्शी चित्रण या द्दष्टीने त्यांचे लिखाण मोलाचे आहे. डॉ. आशिर्वादीलाल श्रीवास्तव डॉ. श्रीवास्तव यांचे *'The Delhi Sultanate'* आणि *'The Mughal Empire'* हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. मूळ ऐतिहासिक साधनांचे अध्ययन

व विश्लेषण करून हे ग्रंथ लिहिलेले आहेत. ह्या काळातील राजकीय घडामोडी, मुस्लिम आक्रमणांच्या काळातील भारताची राजकीय स्थिती, भारतीयांनी आक्रमकांना दिलेला लढा, राजकीय संकुचित स्वार्थाने झालेली फंदफितुरी, मुघल सत्तेची स्थापना व विस्तार याबरोबर त्या काळातील कला, स्थापत्य, समाज, धर्म, अर्थकारण याचीही माहिती ते देतात. त्यांचा दृष्टिकोण एकांगी नसून समन्वयात्मक आहे.

**ब्रिटिश शासनकाळासंबंधीचे इतिहासलेखन**

भारतातील ब्रिटिश शासनकाळातील विविध पैलूंवर भारतीय अभ्यासकांनी प्रचंड प्रमाणात लेखन केलेले आढळते. अशा लेखनाचा श्रीगणेशा एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस झाला असला तरी त्याला विसाव्या शतकात बहर येत राहिला. हे लेखन राष्ट्रवादी वृत्तीने झाले. त्या ग्रंथातून ब्रिटिश शासनाची वसाहतवादी शोषण, नीती, उद्योगांचा ऱ्हास, ग्रामीण भागात वाढणारे दैन्य, राष्ट्रीय भावनेचा उदय व विकास, भारतीय स्वातंत्र्य संग्राम, त्यातील भिन्न प्रवाह अशा अनेक विषयांचे चिकित्सक विश्लेषण केले गेले. अशा राष्ट्रवादी इतिहास लेखनात आत्यंतिक टोकाची राष्ट्रवादी भूमिका घेणारे विनायक दामोदर सावरकर, मेजर बसू, भारतीयांवर इंग्रज शासकांकडून केल्या जाणाऱ्या आरोपांचा खोटेपणा मूळ साधनांच्या आधारे सिद्ध करणारे व राष्ट्रवादी भूमिकेची पुष्टी करणारे सुरेंद्रनाथ बॅनर्जी, डॉ. ताराचंद्र, राष्ट्रीय भूमिकेतून ब्रिटिशाच्या आर्थिक नीतीचे विश्लेषण करणारे डॉ. रमेशचंद्र दत्त, तर पूर्णतः वस्तुनिष्ठ वृत्तीने स्वातंत्र्यसंग्रामाचे विवेचन करणारे डॉ. रमेशचंद्र मुजुमदार असे अनेक अभ्यासक उल्लेखनीय आहेत.

**डॉ. रमेशचंद्र दत्त (१८४८-१९०९) :-**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडला जाऊन स्पर्धा परीक्षा उत्कृष्ठ प्रकारे उत्तीर्ण होणारे जे मूठभर भारतीय होते त्यांपैकी रमेशचंद्र दत्त हे एक होते. १८७० साली भारतात परत आल्यानंतर धानंतर ते मुलकी सेवेत रुजू झाले. परंतु तेथे वर्णभेदाच्या कटू अनुभवाने स्वाभिमान दुखावल्या गेलेल्या रमेशचंद्रांनी शासकीय शृंखला तोडल्या व ते इतिहासाकडे वळले. भारताची आर्थिक स्थिती हे त्यांचे अध्ययनाचे क्षेत्र होते. शासकीय सेवेत असताना १८७४ साली बंकिमचंद्र चॅटींशी झालेल्या भेटीने रमेशचंद्रांच्या विचारांना नवी दिशा मिळाली. भारतीय इतिहासाचा व संस्कृतीचा अभ्यास ते करू लागले आणि बंकिमचंद्रांनी दिलेल्या प्रेरणेने मातृभाषेत कादंबऱ्या लिहिल्या. ऋग्वेद, रामायण, महाभारत यांचे त्यांनी बंगालीत भाषांतर केले. १८८९ साली *'The History of Civilization in Ancient India'* हा त्यांचा ग्रंथ प्रकाशित झाला. डॉ. रमेशचंद्र मुजुमदार 'पहिला खरा राष्ट्रवादी इतिहास' अशी ह्या ग्रंथाची प्रशंसा करतात. मात्र रमेशचंद्र दत्तांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांचा दोन खण्डात लिहिलेला *'Economic History of India'* हा ग्रंथ होय, ब्रिटिश शासक वेगवेगळ्या मार्गांनी भारताचे करीत असलेले शोषण व त्यामुळे भारताची होणारी आर्थिक दु:स्थिती ह्या ग्रंथाचा विषय आहे. इंग्लंडच्या कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचे भारतात उत्पादन करणे आणि भारताला ब्रिटिश मालाची बाजारपेठ बनविणे ही ब्रिटिश वसाहतवादी शासनाची दोन उद्दिष्टे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भारताच्या वाढत्या आर्थिक हलाखीचे मूळ कृषिसमस्येत आहे, शेतकऱ्यांना न पेलवणारा कराचा बोजा, जमीनदारांकडून होणारे शोषण व कर्जबाजारीपणा हे कायमधारा पद्धतीचे दुष्परिणाम आहेत, असे निर्भीड प्रतिपादन त्यांनी केले. ब्रिटिशांच्या वित्तीय धोरणातील दोषांवर त्यांनी बोट ठेवले. रेल्वे मार्गाच्या विस्तारावर होणाऱ्या अमाप खर्चापेक्षा शेतीला पाणीपुरवठ्याची व्यवस्था सुधारण्यावर अधिक द्रव्य खर्च करणे निकडीचे आहे; असे मत मांडून भारताच्या द्रव्यापहरणाचा जो विचार त्यापूर्वी दादाभाई नौरोजींनी मांडला होता, त्या सिद्धांताची त्यांनी पुष्टी केली. त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य म्हणजे ब्रिटिश पार्लमेंटचे कामकाजाचे अहवाल, वित्तीय शासकीय अहवाल आणि शासकीय कागदपत्रांत ब्रिटिशांनी नमूद केलेल्या आकडेवारी ह्या पुराव्यांवर त्यांनी ब्रिटिश शासनाने चालविलेल्या भारताच्या आर्थिक शोषणाचे विदारक चित्र रंगविले. ह्या ग्रंथाने भारतीय राष्ट्रवादाला आर्थिक आधार दिला. १८९९ साली राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाचे त्यांना देण्यात आलेले अध्यक्षपद हा त्यांच्या राष्ट्रवादी भूमिकेचा भारतीयांनी केलेला सन्मान व गौरव होता.

**डॉ. ताराचंद :-**

राष्ट्रीय चळवळीवर अधिकारवाणीने लिहिणाऱ्या लेखकांत डॉ. ताराचंद यांना महत्त्वाचे स्थान आहे. *'The Influence of Islam on Indian Culture'* आणि *'History of Indian Freedom Movement'* हा त्यांचा चार खण्डांचा ग्रंथ, ही त्यांची विशेष गाजलेली ग्रंथरचना होय. यात त्यांची विवेकी राष्ट्रवादी भूमिका आविष्कृत होते. व्यासंगी अभ्यासक व लेखक म्हणून त्यांची ख्याती होय. मूळ ऐतिहासिक साधनांचा चिकित्सक अभ्यास करून विषयाची तर्कशुद्ध मांडणी ते करतात. भारतावरील इस्लामचा प्रभाव विशद करताना भारताची संस्कृती ही केवळ हिंदू संस्कृती नसून, हिंदू व इस्लामी संस्कृतीच्या समन्वयातून उत्क्रांत झालेली ती एक संपन्न संस्कृती आहे हा विचार ते साधार व तर्कशुद्धरीत्या मांडतात. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यावरील चार खण्डांत इंग्रजी सत्ता स्थापन होण्यापूर्वीच्या भारतात असलेली आर्थिक परिस्थिती, आत्मनिर्भर ग्रामीण व्यवस्था, उद्योग व व्यापारातील भरभराट, या पार्श्वभूमीवर बंगालमध्ये कंपनीची सत्ता स्थापन होताच त्या प्रांतातील रहिवाशांची झालेली आर्थिक दुरवस्था यांचे तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या पत्रांतील उतारे देऊन ते विवेचन करतात. तसेच एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी होऊ लागलेले राष्ट्रीय प्रबोधन, भारतीय अस्मितेचे पुनरुज्जीवन, त्यात राष्ट्रीय वृत्तीच्या साहित्यिकांनी व पत्रकारांनी केलेली कामगिरी आणि स्वातंत्र्य संग्रामाच्या व्यापक प्रवाहातील महत्त्वाच्या घडामोडी व राष्ट्रीय नेत्यांचे कार्य, जन आंदोलने यांचे ते तपशिलात वर्णन करतात. निवेदनाच्या ओघात ब्रिटिशांच्या कूटनीतीवर ते प्रकाश टाकतात, मुस्लिम अल्पसंख्यांकांचे बुजगावणे पुढे करून ब्रिटिशांनी आपली सत्ता कशी कायम टिकविली; मुस्लिम जमातवादाची बीजे कशी रोवली व वेळोवेळी त्याला कसे खतपाणी घातले; ज्या ज्या वेळी काँग्रेस व मुस्लिम लीग राष्ट्रीय लढ्यात एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली त्या त्या वेळी

ब्रिटिश शासकांनी लीग नेत्यांना आमीष दाखवून लढ्यात सामील होण्यापासून कसे परावृत्त केले, याचे अनेक दाखले ते देतात आणि भारताची फाळणी हे ब्रिटिश कूटनीतीचे कटू फळ होते असे साधार प्रस्थापित करतात. भारतीय समाजाचा एकजिनसीपणा इंग्रजांनी राजकीय व आर्थिक स्वार्थापोटी नष्ट केला, समाजातील भिन्न गटांना विलग केले असा आरोपही ते करतात. स्वातंत्र्य संग्रामावरील हा ग्रंथ म्हणजे त्या विषयावरील डॉ. ताराचंदांचे राष्ट्रवादी भाष्य आहे.

**डॉ. रमेशचंद्र मुजुमदार (१८८८-१९८०) :-**

ऐतिहासिक सत्याचा आणि शास्त्रीय, चिकित्सक लेखनपद्धतीचा निःसंदिग्धपणे पुरस्कार करणारे आणि त्या अनुसार लेखन करणारे जे व्यासंगी व प्रतिभासंपन्न लेखक आधुनिक भारतात पुढे आले, त्यांपैकी डॉ. रमेशचंद्र मुजुमदार हे एक जागतिक कीर्तीचे लेखक होत.डॉ. मुजुमदार यांचे लिखाण सखोल व साक्षेपी अध्ययनावर आधारलेले आणि बहुआयामी आहे. प्राचीन भारतीय समाजजीवन, संस्कृती, भारतीय संस्कृतीचा देशाबाहेर झालेला विस्तार, भारतात ब्रिटिश सत्तेचे बीजारोपण व विस्तार, भारतीयांचा स्वातंत्र्यलढा, तसेच भारतीय इतिहासलेखनाचे स्वरूप अशा नानाविध विषयांवर ते सारख्याच अधिकाराने लिहितात. सत्यनिष्ठा आणि वस्तुनिष्ठ विवेचन व मूल्यांकन हा त्यांच्या लिखाणाचा आत्मा आहे. इतिहास अध्ययन म्हणजे सत्याचा अखंड शोध होय; सत्य, केवळ सत्य आणि संपूर्ण सत्य यावरच इतिहासाचा पोलादी साचा उभारलेला असावा (*Truth, nothing but the truth and the whole truth.... should form the steel frame of history)* इतिहासकाराने काढावयाचे निष्कर्ष आणि मूल्यांकन आवश्यक असले तरी ते सत्याधिष्ठित व निःपक्षपाती असावे; अशी इतिहासलेखनाबाबतची त्यांची ठाम मते त्यांनी दिलेल्या अनेक भाषणांतून व्यक्त केलेली आढळतात. कोणत्याही विशिष्ट वैचारिक भूमिकेवरून अगर उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेऊन केलेले लिखाण ते त्याज्य मानतात. उलटपक्षी ऐतिहासिक सत्य बाजूला सारून लिहिलेले इतिहास देशाला हितकारक ठरत नाहीत, देशाचे भवितव्य हे सत्याच्या भक्कम पायावरच उभारले जाणे आवश्यक व हितकारक आहे, अशा कट्टर वस्तुनिष्ठेचा ते पुरस्कार करतात. (*History divorced from truth does not help a nation... Its future should be laid on the stable foundations of truth)* याच भूमिकेतून १९६७ साली दिलेल्या हेरास मेमोरिअल लेक्चर्स

मधील तिसऱ्या भाषणात ते आदर्श इतिहासकाराला आवश्यक असलेले गुण सांगतात आणि भारतीय इतिहासलेखनातील व लेखकांतील त्रुटी व दोष यांचेही निर्भीड विवेचन करतात.डॉ. मुजुमदारांचे लिखाण ऐतिहासिक सत्याच्या भक्कम पायावर उभे असले तरी त्यांची वस्तुनिष्ठता सर्वत्र टिकते असे नाही. त्यांनी केलेल्या घटितांवरील भाष्यातून, घटनांच्या अन्वयार्थातून आणि व्यक्त केलेल्या मतांतून त्यांची राष्ट्रीय भूमिका डोकावते. '*Corporate Life in Acient India*', '*Outline of Ancient Indian History and Civilization*': '*Ancient India Colonies in the Far East*'; '*The Sepoy Mutiny and the Revolt of 1857*'; '*History of the Freedom Movement*' हे त्यांच्या ग्रंथांपैकी काही सुप्रसिद्ध ग्रंथ आहेत. याशिवाय '*An Advanced History of India*' सारख्या काही ग्रंथांचे ते सहलेखक आहेत. तसेच भारतीय विद्या भवनाच्या '*The History and Culture of the Indian People*' ह्या शीर्षकाच्या प्रकल्पातील अकरा खण्डांचे मौलिक संपादनकार्य त्यांनी केले आहे. प्राचीन संस्कृतीवरील त्यांच्या ग्रंथातून, तसेच आग्नेय आशियात भारताने केलेले सांस्कृतिक वसाहतीकरण ह्या विषयांवरील त्यांच्या लिखाणातून त्यांचा प्राचीन संस्कृतीबाबतचा अभिमान स्पष्ट दिसतो. आग्नेय आशियात झालेल्या भारतीय संस्कृतीच्या विस्ताराला ते 'बसाहतीकरण' हा शब्द वापरतात, त्यातून त्यांची राष्ट्रीयता डोकावते. १८५७ च्या उठावाला ते कालबाह्य झालेल्या मध्ययुगीन सरंजामशाहीचे अखेरचे पर्व मानीत असले, तरी ती एक महान घटना होती व तिने बलशाली ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले हे ते मान्य करतात.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे डॉ. मुजुमदारांनी तपशिलात केलेले मूलगामी विवेचन निश्चितच उद्‌बोधक आहे. ह्या लिखाणात डॉ. ताराचंदांप्रमाणे निःसंदिग्ध राष्ट्रवादी भूमिका निदर्शनास येत नसली, तरी भारतीय समाजातील विशेषतः हिंदू व मुस्लीम गटांतील फूट वाढविण्यात ब्रिटिश शासकांचा सिंहाचा वाटा होता, ह्या दोन गटांच्या लोकांचे एका राष्ट्रीय व्यासपीठावर येण्याचे प्रयत्न त्यांनी हेतुपुरस्सर हाणून पाडले, हे ते मान्य करतात. तसेच देशाच्या फाळणीला, ते ब्रिटिश व फ्रेंच रहिवाशांत सतत राजकीय वितुष्ट असताना देखील इंग्रजांनी कॅनडाची फाळणी केली नाही, हे उदाहरण देऊन ते भारतातील ब्रिटिशाच्या कुटील डावावर प्रकाशझोत टाकतात. मात्र हिंदू व मुसलमान यांच्यात मूलतः सांस्कृतिक भेद आहे, त्यांच्यात सामंजस्य नव्हते, यावर ते भर देतात. राष्ट्रीय नेतृत्वाने केलेल्या चुकांवर ते प्रखर टीका करतात, महात्मा गांधींनी धर्म व राजकारणाची सरमिसळ केल्याबद्दल त्यांना दोष देऊन "गांधी हे राजकीय संत होते की संतत्व असलेले राजकारणी होते," *(Saintly Politician or a political Saint)* असे खोचक विधान करतात. मात्र १९४६ साली गांधीजींनी प्राणपणाने केलेल्या नौखालीतील महनीय कामगिरीबद्दल ते गांधीजींचा तोंड भरून गौरवही करतात. अशा प्रकारे ऐतिहासिक सत्याच्या भक्कम पायावर खंबीरपणे पाय रोवून केलेल्या स्वातंत्र्य संग्रामावरील त्यांच्या लिखाणातून राष्ट्रीय वृत्ती डोकावल्या खेरीज राहात नाही. इतिहासाच्या क्षेत्राला केलेल्या विपुल व मौलिक योगदानाला सार्वजनिक मान्यता, देशात व जगात मिळण्याचे भाग्य लाभणारे ते पहिले भारतीय इतिहासकार होत. प्रख्यात संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषविली, भारतीय विद्याभवनच्या इतिहास प्रकल्पाचे प्रमुख संपादक म्हणून त्यांची झालेली निवड आणि त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे म्हणजे युनेस्को ह्या जागतिक संघटनेने मानवाच्या शास्त्रीय व सांस्कृतिक विकासाच्या इतिहासाच्या प्रकल्पाच्या कामासाठी स्थापन केलेल्या जागतिक समितीच्या उपाध्यक्षपदी त्यांची झालेली नियुक्ती, ही त्यांच्या इतिहास क्षेत्रातील मौलिक कामगिरीबद्दल राष्ट्रीय व जागतिक स्तरावर लाभलेली मानाची लेणी होती. राष्ट्रीय वृत्तीने काही इतिहासकारांना प्रादेशिक इतिहास अध्ययनाला उद्युक्त केले. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील अशा लेखकांत अनेकांची नावे समाविष्ट करता येतील. त्यात इतिहासाचार्य म्हणून संबोधले जाणारे विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, डॉ. नीलकंठ शास्त्री यांची नावे अग्रगण्य आहेत.

**राष्ट्रवादी इतिहासलेखनातील गुणदोष :-**

इंग्रज इतिहासकारांनी खच्ची केलेल्या राष्ट्रीय अस्मितेला जागृत करण्याच्या हेतूने सुरू झालेल्या राष्ट्रवादी इतिहासलेखनाला विसाव्या शतकात व्यापक स्वरूप आले. इंग्रजांनी केलेल्या आरोपांचे खंडन केले. त्यांनी केलेले भारतीय संस्कृतीचे अवमूल्यन कसे दिशाभूल करणारे आहे हे भारतीयांना पटवून देण्याच्या हेतूने सुरू झालेल्या राष्ट्रवादी लिखाणाने ब्रिटिश राजवटीचे साम्राज्यवादी रूप उलगडून दाखविले, भारतीयांतील न्यूनगंड नाहीसा करून

त्यांच्यात भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान जागृत करण्यास, आत्मसन्मानाची भावना निर्माण करण्यास मदत केली आणि राष्ट्रीय चळवळीला वैचारिक आधार दिला. राष्ट्रवादी इतिहासाने नवी आव्हाने स्वीकारली, संशोधनाला चालना दिली आणि भारतीय इतिहासलेखनाचे क्षेत्र विस्तारले. भारतीयांनी लिहिलेला भारताचा नवा इतिहास तयार झाला. आपला इतिहास जाणून घेण्याच्या जिज्ञासेने मूलभूत संशोधनकार्याला गती दिली. ऐतिहासिक मूळ साधनस्रोतांचा शोध घेणारी संशोधकांची पिढी मागून पिढी पुढे आली. अनेकांनी इतिहास संशोधनाचे जणु व्रत स्वीकारले आणि संपूर्ण हयात, द्रव्याचा अगर लोकमान्यतेचा विचार न करता संशोधनाला वाहून घेतले. नवनवी ऐतिहासिक साधने उपलब्ध होऊ लागली तसे संपादन कार्याला चालना मिळाली. ऐतिहासिक साधनांच्या ग्रंथांना मौलिक प्रस्तावना जोडल्या गेल्या व त्यातून इतिहासलेखनाचे क्षेत्र समृद्ध होत गेले. राष्ट्रवादी इतिहासाने केवळ राजकीय इतिहासाला बांधून घेतले नाही, तर त्याने आर्थिक व सामाजिक पैलूंचीही दखल घेतली. प्राचीन व मध्ययुगीन संस्कृतीचा व सामाजिक स्थितीचा साधार उहापोह करण्यात आला. ब्रिटिशकालीन शासनाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले दुष्परिणाम विशद करण्यात आले आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीला आर्थिक आशय दिला गेला. राष्ट्रवादी वृत्तीने इतिहासलेखन करणाऱ्या काही अभ्यासकांनी इतिहासाशी निगडित असणाऱ्या आणि उपकारक ठरणाऱ्या सहाय्यकारी शास्त्रांचीही दखल घेतली आणि इतिहास ही एकाकी ज्ञानशाखा नाही, तिचा इतर शास्त्रांशी संबंध आहे हे दाखवून दिले. पाश्चात्यांइतकेच शास्त्रीय व वस्तुनिष्ठ इतिहासलेखन व अथक संशोधनकार्यात भारतीय कुशल व सक्षम आहेत हे ह्या काळातील इतिहासलेखनाने सिद्ध केले.

ह्या प्रकारच्या इतिहासनलेखनात काही त्रुटी, काही दोष निर्माण झाले. इंग्रज लेखकांनी केलेल्या आरोपांचे खंडन करण्याच्या अभिनिवेशात कधी वस्तुनिष्ठेचे भान सुटले; काही अतिरंजित, अतिशयोक्त विधाने केली गेली; कधी तर्काला न पटणारे भाष्य केले गेले. स्वतःवरील आरोप बिनबुडाचे आहेत, निराधार, पूर्वग्रहदूषित आहेत, हे दाखविण्याच्या भरात घड्याळाचा लंबक क्वचित दुसऱ्या टोकाला गेला. हे लिखाण देखील मूळ साधनांच्या आधारेच केले गेले; त्याचा अन्वयार्थ लावताना तर्कनिष्ठा काहीशी बाजूला राहिली. कधी अतिरेकी राष्ट्रवादी लेखकांनी ऐतिहासिक साधनांची व पुराव्यांची निवड करताना आपल्या विषयप्रतिपादनाविरुद्ध जाणाऱ्या पुराव्यांकडे दुर्लक्ष केले. आपल्या दृष्टिकोणाला पुष्टी देणारा पुरावाच फक्त वापरला. यामुळे लिखाणाला प्रचारकी रूप आले. मुख्यतः प्राचीन भारतीय संस्कृतीना गुणगौरव करताना सद्यस्थितीतील अधःपतन आपण मान्य करतो आहोत हे भान राहिले नाही. अतिरेकी राष्ट्रवादी लेखनाने राष्ट्रवादाचे पोषण केले खरे, परंतु मध्ययुगातील ऐतिहासिक वीर पुरुषांच्या कार्याचा गुणगौरव करताना नकळत जमातवादाची बीजे रोवली गेली. शिवाजी, राणा प्रताप यांच्या जीवनकार्याचे वर्णन करताना त्याचा केवळ राष्ट्रीय आशय स्पष्ट करण्याऐवजी मुस्लिम शासकांविरुद्धचे लढे, असे स्वरूप त्याला देण्यात आल्यामुळे सामाजिक ऐक्याला तडा गेला. असे काही दोष ध्यानात घेऊनही राष्ट्रवादी लेखनाने इतिहासलेखनाचे क्षेत्र समृद्ध केले हे निर्विवाद आहे. डॉ. रोमीला थापर ह्या विदूषीने भारताचा इतिहास उभा करण्यात राष्ट्रवादी इतिहासकारांनी मौलिक योगदान केल्याचे मत प्रदर्शित केलेले आढळते.

# भारतातील मार्क्सवादी इतिहासलेखन
# *(Marxist History)*

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उगम पावलेला राष्ट्रवादी लेखनाचा प्रवाह उत्तरार्धातही गतिमान होता, लेखकांना नवे ऐतिहासिक साहित्य उपलब्ध होऊ लागले. नवे विषय हाताळले जाऊ लागले आणि लेखन अधिक चिकित्सक बनले. या दरम्यान कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी विचारप्रणालीने प्रभावित झालेले काही भारतीय इतिहासकार मार्क्सच्या सिद्धांतांच्या आधारे भारतीय इतिहासाचे अध्ययन करू लागले. हे सर्व अभ्यासक पोथीनिष्ठ मार्क्सवादी नाहीत. मार्क्सने लिहिलेला प्रत्येक शब्द, मांडलेले प्रत्येक प्रमेय ते शिरोधार्य मानतात असे नाही. मार्क्सने प्रतिपादित केलेला मानवी जीवनाच्या विकासामागील आर्थिक हेतुमूलकतेचा आणि भौतिकवादी विरोधविकासाचा सिद्धांत हे मानवी समाजाच्या अध्ययनाचे मौलिक आधार आहेत ही त्यांची वैचारिक निष्ठा आहे. ह्या भूमिकेतून प्राचीन भारतीय इतिहासापासून आधुनिक भारताच्या इतिहासाचे ते विश्लेषण करतात. ह्या विचारप्रवाहाचा प्रारंभ स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वी झालेला आढळत असला तरी मार्क्सवादी इतिहासलेखनाला विशेष चालना १९५० नंतरच्या काळात मिळाली. ह्या लेखनप्रवाहाने मूलभूत संशोधनाबरोबरच उपलब्ध साधनसामग्रीचे मार्क्सवादाच्या आधारे पुनर्मूल्यांकन करण्याचा मार्गही अवलंबिला. ह्या क्षेत्रात प्रारंभीच्या कालावधीतील श्रीपाद अमृत डांगे यांचा '*From Primitive Communism to Slavery*' तसेच रजनी पाम दत्त यांचा '*India Today*' हे ग्रंथ लक्षणीय आहे. १९५० नंतरच्या मार्क्सवादी इतिहासलेखकांच्या पिढीत डॉ. नुरुल हसन, डॉ. राम शरण शर्मा, डॉ. रोमीला थापर, डॉ. हरबन्स मुखिया, डॉ. महम्मद हबीब, डॉ. इर्फान हबीब, डॉ. बिपन चंद्र ही नावे विशेष उल्लेखनीय आहेत. मात्र मार्क्सवादी भारतीय इतिहासलेखनावर आपल्या विद्वत्तेचा व मूलगामी संशोधनकार्याचा कायमचा ठसा उमटविणारे प्रतिभावंत इतिहासकार म्हणून डॉ. दामोदर धर्मानन्द कोसांबी यांचे नाव अग्रगण्य ठरते.

## डॉ. दामोदर धर्मानन्द कोसांबी (१९०७-१९६६)

नामवंत मार्क्सवादी इतिहासकार म्हणून कोसांबी ख्यातनाम असले तरी त्यांचे अध्ययन क्षेत्र इतिहासापुरते मर्यादित नाही. गणित, सांख्यिकी, जननशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, नाणेशास्त्र अशा विविध शाखांचा तसेच संस्कृत व पाली भाषेचा त्यांचा गाढा व्यासंग होता. कुशाग्र बुद्धीचे देणे लाभलेले कोसांबी मूलगामी संशोधकही होते. त्यांच्या चतुरस्त्र बुद्धिमत्तेमुळे व व्यापक, सखोल व्यासंगामुळे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फन्डामेंटल रिसर्च ह्या मौलिक संशोधनकार्याला उत्तेजन देणाऱ्या *Bengal Library* सुप्रसिद्ध संस्थेचे संचालकपद भूषविण्याचा मान त्यांना मिळाला.

डॉ. कोसांबीच्या लिखाणाला सुरुवात स्वातंत्र्यपूर्वकाळात झाली असली, तरी त्यांचे मौलिक संशोधनपर लिखाण त्यानंतर प्रकाशित झाले. प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती हे त्यांचे संशोधन व लेखनाचे क्षेत्र होते. '*Introduction to the Study of Indian History*', '*The Culture and Civilization of Ancient Indian Culture*' ह्या मान्यताप्राप्त ग्रंथाबरोबरच त्यांचे शंभरापेक्षा अधिक संशोधनात्मक लेख प्रकाशित झाले आहेत. इतिहासलेखनाबाबतची आपली सैद्धांतिक बैठक कोसांबींनी आपल्या लिखाणातून निःसंदिग्धपणे मांडली आहे. इतिहास म्हणजे केवळ घटनांची कालक्रमानुसार केलेली नोंद नाही किंवा महान व्यक्तींच्या कार्याचे निवेदनही नाही, तर उत्पादनसाधने व उत्पादन प्रक्रियेतील भिन्न घटकांचे संबंध, ह्यात काळानुसार होत गेलेल्या परिवर्तनांची मीमांसा म्हणजे इतिहास होय, *(History is a presentation in a chronological order of successive changes in the means and relations of production);* कोणत्या कालखंडात कोण शासक होता, हा विचार महत्त्वाचा नसून विशिष्ट कालखंडात उत्पादन पद्धतीचे स्वरूप काय होते, कोणती अवजारे वापरली जात होती, ती कोणत्या धातूची होती हे जाणून घेणे अधिक महत्त्वाचे आहे; शासकीय धोरणाचा अभ्यास उत्पादन प्रक्रियेवर त्याचा काय परिणाम झाला एवढ्या पुरताच मर्यादित असावा; असे मत ते मांडतात. अर्थपूर्ण इतिहासाचे वैशिष्ट्य सांगताना ते म्हणतात की, माणसाच्या कृतीमागील कारकशक्तींचे वर्गीकरण करून त्या आधारे भविष्याबाबत आडाखे बांधता यावेत. ते म्हणतात "*The inner causes which ultimately manifest themselves in the striking events, the driving forces which underlie great movements have to be made clear before*

*any work can be dignified by the name of serious history*" डॉ. कोसांबी मार्क्सवादी असले तरी मार्क्सच्या लिखाणातील सर्व प्रमेये ते आंधळेपणाने स्वीकारीत नाहीत. मार्क्सने मानवी जीवनाच्या विकासात गुलामगिरीची अवस्था महत्त्वाची मानली, तशी ती कोसांबी मानीत नाहीत. भारतात सरंजमशाहीपूर्वीच्या काळात गुलामगिरीची अवस्था आढळत नाही; ब्राझीलमध्येही सरंजामशाहीपूर्वी दासप्रथा अस्तित्वात असल्याचे निदर्शनास येत नाही; उलट अमेरिकेत दासप्रथा सरंजामशाही खेरीज आलेली दिसते असा निष्कर्ष स्वतंत्रप्रज्ञ कोसांबी काढतात. तसेच मार्क्सने प्रतिपादित केलेला आशियाई उत्पादन पद्धतीचा सिद्धांतही ते पूर्णतः स्वीकारीत नाहीत. आशियात गावे आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होती, याचा अर्थ तेथील व्यवस्था गतिहीन, अपरिवर्तनीय व स्थितिशील होती असा नाही हे कोसांबी सप्रमाण सिद्ध करतात.

मानवी जीवनाच्या विकासाचा अभ्यास करताना कोसांबींनी केलेले प्रागैतिहासिक काळाचे अध्ययन हे त्यांच्या संशोधनकार्याचे वैशिष्ट्य होय. प्रागैतिहासिक काळाचे अध्ययन करण्यासाठी लिखित साधने नसल्यामुळे त्यांनी पुरातत्त्वशास्त्राचा आधार घेतला. पाषाण युगातील लहान मोठी हत्यारे (*monoliths, megaliths)* यांचा अभ्यास केला. तसेच आपल्या संशोधनातून निघालेल्या निष्कर्षांना मानववंशशास्त्रीय सिद्धांताची जोड दिली. तसेच प्राचीन इतिहासाच्या अध्ययनासाठी लिखित साहित्यातून मिळालेल्या माहितीचा उत्खननातून मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे तौलनिक अभ्यास केला. प्राचीन काळातील नाण्यांचा अभ्यास हे त्यांच्या संशोधनकार्याचे एक महत्त्वाचे क्षेत्र होय. निरनिराळ्या प्रदेशात मिळालेल्या सुमारे १२०० चिन्हांकित नाण्यांचा त्यांनी अभ्यास केला व त्या आधारे तत्कालीन समाजाची संस्कृती, सामाजिक धारणा व आर्थिक स्थितीबाबत निष्कर्ष काढले. भारतात संस्कृतीचा उदय कसा झाला याचे तर्कशुद्ध विवेचन महाराष्ट्रातील उदाहरणे देऊन ते करतात. सिंधू संस्कृतीच्या उदयाची कारणमीमांसा करतात, जातिव्यवस्थेचा उदय अभ्यासतात, बौद्ध व जैन धर्माच्या उदयाची आर्थिक दृष्ट्या कारणमीमांसा करतात; तसेच सोळा महाजनपदांपैकी मगधाला प्राप्त झालेले महत्त्व, सम्राट अशोकाच्या काळातील अवनती यांचेही आर्थिक दृष्टिकोणातून विवेचन करतात.धर्माविषयीचा कोसांबींचा दृष्टिकोण पूर्णतः भौतिकवादी आहे. या विषयाच्या संबंधात त्यांनी केलेली काही विधाने परंपरावाद्यांना जबर धक्का देणारी आहेत. बौद्ध धर्माच्या हासाची कारणे सांगतांना त्यामुळे वाढलेला आर्थिक बोजा हे एक महत्त्वाचे कारण सांगतात. वेदकालीन ब्राह्मणवर्ग बळी दिलेल्या गाईंचे मांस भक्षण करून गलेलठ्ठ झाला होता; असे विधान करतात. यापेक्षाही 'परिणामांचा विचार बाजूला सारून कोणत्याही कृतीचे समर्थन करण्यास परवानगी देणारा, परस्परविसंगत गोष्टींचा कौशल्याने समन्वय करणारा ग्रंथ' असे गीतेचे त्यांनी केलेले वर्णन (*Geeta with its superb sanskrit and superb inconsistency is a book that allows a reader to justify almost any action while shrugging off its consequences)* केवळ हिंदूधर्ममार्तंडांनाच नव्हे तर सर्वसामान्य हिंदूला धक्कादायक वाटणे स्वाभाविक होते. डॉ. कोसांबी यांनी केलेली सर्व विधाने अगर त्यांनी मांडलेली प्रमेये सर्वांना मान्य होण्याजोगी नसली व त्यांनी केलेली काही विधाने त्यांच्या नंतरच्या काही संशोधकांनी साधार खोडून काढली असली, तरी त्यांचे लिखाण मूलगामी संशोधनावर आधारलेले, चिकित्सक बुद्धीचे निदर्शक व विचारप्रवर्तक आहे ह्याबद्दल शंका नाही. आंतरज्ञानशाखीय अभ्यासपद्धतीचा, तौलनिक तंत्राचा, तसेच लिखित साधनांचा, पुरावशेषांचा व लोककथा, मिथक कथांचा वापर प्रागैतिहासिक काळाच्या व प्राचीन इतिहासाच्या अध्ययनासाठी करणारे स्वतंत्रप्रज्ञ मार्क्सवादी इतिहासकार म्हणून त्याचे इतिहासक्षेत्रातील स्थान अढळ आह.

**डॉ. राम शरण शर्मा** :-

प्राचीन भारताच्या सामाजिक व आर्थिक इतिहासाचे मार्क्सप्रणित भौतिकवादी सिद्धांताच्या आधारे चिकित्सक विश्लेषण करणारे व्यासंगी संशोधक व लेखक म्हणून डॉ. शर्मा सुप्रसिद्ध आहेत. इंग्लंडमधून उच्चशिक्षण घेऊन परत आल्यानंतर त्यांनी अध्यापनाच्या व संशोधनाच्या कार्याला वाहून घेतले. १९५७ साली स्थापन झालेल्या इंडियन कौंसिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च ह्या संस्थेचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला. भारतातील राष्ट्रीय व्यासपीठावरूनच केवळ नव्हे तर पाश्चात्य जगातही अमेरिका, इंग्लंड, कॅनडा मध्ये त्यांनी दिलेल्या विद्वत्ताप्रचुर भाषणांमुळे त्यांना जागतिक पातळीवर प्रसिद्धी मिळाली आहे. त्यांच्या लिखाणात

1) *Shudras in Ancient India*
2) *IndianFeudalism*
3) *Light on Early Indian Society and Economy*
4) *Urban Decay in India*
5) *Material culture and Social Formation in Ancient India* ह्या ग्रंथांचा अंतर्भाव आहे. ह्या शिवाय त्यांचे अनेक संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहे. '*Shudras in Ancient India*' ह्या वाङ्मयीन साधनांच्या आधारे लिहिलेल्या पहिल्या अभ्यासपूर्ण ग्रंथात समाजामधील निम्न स्तरावरील जातींचे वरिष्ठ समाजघटकांशी असलेले संबंध व उत्पादन प्रक्रियेतील स्थान याचे विवेचन ते करतात. जातिव्यवस्था हा कलंक असला तरी वर्णव्यवस्थेचा उद्‌भव सामाजिक गरजेतून झाला; भटके गट स्थिर होऊ लागल्यानंतर भिन्न स्वरूपाची कामे करण्याच्या गरजेतून भित्र व्यवसाय सुरू झाले, त्यातून वर्णव्यवस्थेचा जन्म झाला व नंतर धर्मशास्त्राने त्याला कायदेशीर रूप दिले असे वैदिक काळापासून गुप्त काळापर्यंतच्या सामाजिक व्यवहारांचे परीक्षण करून, त्यातील शूद्रांच्या स्थानाचे चिकित्सक विवेचन ते करतात. गुप्तांच्या शासनकाळात त्यांना स्वतंत्रपणे शेती करण्याचा अधिकार तसेच नागरिकत्वाचे व काही धार्मिक अधिकार मिळाले, परंतु व्यावसायिक व सांस्कृतिक दृष्ट्या खालच्या स्तरावरील शूद्रांना मात्र अस्पृश्य मानले गेले; असे डॉ.

शर्मा प्रतिपादित करतात. '*Indian Feudalism*' हा त्यांचा विशेष प्रसिद्ध ग्रंथ होय. इतिहास क्षेत्रात यावर बरीच उलटसुलट चर्चा झाली. ह्या ग्रथांत भारतात झालेल्या सरंजामशाही व्यवस्थेच्या उदयाचे ते पुरातत्त्वीय साधनांच्या कोरीव लेख, ताम्रपट, वतनपत्रे इत्यादींच्या आधारे चिकित्सक विश्लेषण करतात. जमीन महसूल व्यवस्थेवर आधारित प्रशासकीय पद्धती व भूदास व्यवस्था यातून सरंजामशाहीचा उदय झाला व मंदिरे, देवस्थाने, ब्राह्मण, अधिकारी यांना दिलेल्या वतनावरून हे सिद्ध होते; असे प्रतिपादन डॉ. शर्मा करतात. सरंजामशाहीच्या उदयाचा संबंध ते गुप्तकाळाच्या अखेरी झालेल्या उद्योग व नगरांच्या हासाशी जोडतात. ह्या ग्रंथात डॉ. शर्मानी युरोपातील व भारतातील सरंजाम पद्धतींचे तौलनिक विवेचनही केले आहे.

'*Material Culture and Social Formation in Ancient India*' हा ग्रंथ म्हणजे प्राचीन भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेवरील भौतिकवादी भाष्य 'आहे. ऋग्वेद कालीन *Pastoral* अर्थव्यवस्था उत्तर वैदिक काळापर्यंत प्रगत झाली, पशुपालनावर उपजीविका करणारे मानवीसमूह शेती करून स्थिर जीवन जगू लागले. उत्पादन पद्धतीतील बदलाबरोबर सामाजिक, सांस्कृतिक बदल झाले, प्रशासन व्यवस्था प्रस्थापित झाली. स्थिर जीवनपद्धतीत भिन्न व्यवसाय करणारे वर्ग उदयाला आले. शेतीसाठी पाळीव जनावरांची गरज प्रकर्षाने वाटल्यामुळे त्यावेळी प्रचलीत असलेल्या पशुबळीच्या प्रथेला बौद्ध धर्माने विरोध केला; एकूण तत्कालीन आर्थिक व्यवस्थेचे रूप व गरजा ध्यानात घेऊन बौद्ध धर्माने शिकवण दिली, असे तत्कालीन परिस्थितीचे आर्थिक हेतुमूलकतेच्या आधारे ते विश्लेषण करतात. वरील विषयांच्या अनुषंगाने डॉ. शर्मा यांनी दासप्रथा, स्त्रियांचा समाजातील दर्जा, विवाह संस्था, वतने यांवरही लेख प्रकाशित केले आहेत. एकूण त्यांच्या मार्क्सवादी विचारप्रणालीचा प्रत्यय त्यांच्या लिखाणात स्पष्टपणे येतो.

### डॉ. रोमीला थापर

मार्क्सवादी इतिहासकारांच्या यादीत डॉ. रोमीला थापर ह्या विदुषीचे महत्त्वाचे स्थान आहे. लंडन विद्यापीठात काही वर्षे इतिहासाचे अध्यापन केल्यानंतर भारतातील प्रख्यात जवाहरलाल नेहरू विद्यापीठात प्राचीन भारतीय इतिहासाच्या प्राध्यापिका म्हणून त्या रुजू झाल्या. तेथे इतिहास अध्ययनाचे केंद्र स्थापन करण्यात व नवसंशोधकांना मार्गदर्शन करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. *Ashoka and the Decline of the Mauryas, History of India Vol. I, Interpreting early India, Ancient Indian social History. From lineage to state,* ही त्यांची प्रसिद्ध ग्रंथरचना आहे. '*Problems of Historical Writing in India*' ह्या लेखसंग्रहाच्या त्या संपादिका असून, त्यातील प्राचीन भारतीय इतिहासाच्या संशोधनावरील त्यांचा लेख विचारप्रवर्तक आहे. '*Asoka and the Decline of the Mauryas*' हा त्यांचा पहिला महत्त्वाचा ग्रंथ होय. त्याच्या अनेक आवृत्या निघाल्या हा त्याच्या

लोकमान्यतेचा पुरावा आहे. सम्राट अशोकाच्या शासनाचा भौतिकवादी दृष्टिकोणातून त्यांनी ह्या ग्रंथात अन्वयार्थ लावला आहे. मुख्य म्हणजे अशोकाने बौद्ध धर्माचा केलेला पुरस्कार त्याच्या धर्मनिष्ठेचे अगर नैतिक भूमिकेचे प्रतीक नसून तत्कालीन राजकीय व सामाजिक गरजेच्या जाणिवेतून तो जन्माला आला होता, असा साधार निष्कर्ष त्या काढतात. मौर्य साम्राज्याच्या पतनाची कारणमीमांसाही त्यांनी तपशिलात केलेली आढळते.

'*History of India Vol. I*' हा ग्रंथ ख्रिस्तपूर्व पंधराशे वर्षांपासून सोळाव्या शतकात झालेल्या युरोपीयांच्या आगमनापर्यंतच्या भारताच्या इतिहासाचा आढावा घेतो. राजकीय इतिहासाच्या स्थूल चौकटीच्या आधारे भिन्न कालखंडातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, कला, साहित्य यांची माहिती त्या देतात व त्यांच्यातील परस्परसंबद्धता स्पष्ट करतात. सामान्य वाचकाला डोळ्यापुढे ठेऊन लिहिलेल्या ह्या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे राजकीय घडामोडींपेक्षा शेती, उद्योग, व्यापार, ग्रामीण व नागरी जीवन, सागरी हालचाली या विषयांवर भर देऊन भिन्न कालखंडांचे केलेले चित्रण हे होय.

'*Ancient Indian Social History*' हा ग्रंथ त्यांच्या तेरा लेखांचे संकलित रूप असून त्यात प्राचीन काळापासून इ.स. १००० पर्यंतच्या सामाजिक जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे. बौद्ध धर्माचा उदय हा तत्कालीन ब्राह्मणी जीवनपद्धती विरुद्धचा निषेध होता; असे मत त्या मांडतात. इ.स. पूर्व १००० ते इ.स. १००० पर्यंतच्या कालखंडात भारतीय समाज गतिहीन, स्थितिशील होता ह्या मार्क्सच्या विधानाचे त्या साधार खंडन करतात. तसेच मोठ्या संख्येने आर्यांच्या टोळ्या भारतात आल्याचा पुरावा सापडत नाही; इंडो-आर्यन भाषा बोलणारे व लोखंडाचा वापर जाणणारे काही गट आले; जातीव्यवस्थेची बीजे हडप्पा संस्कृतीतही आढळतात; वैदिक संस्कृतीत अनार्यांच्या धार्मिक रूढी आढळत असल्यामुळे वैदिक साहित्य ही केवळ आर्यांची निर्मिती नाही, अशी परंपरागत मतांना प्रतिरोध करणारी मते त्यांनी आपल्या लिखाणांत व भाषणांत व्यक्त केलेली आढळतात. '*From Lineage to State*' ह्यात गंगेच्या खोऱ्यातील प्रदेशात प्राचीन काळी राज्यशासन व्यवस्थेचा उदय होण्यास कारणीभूत झालेल्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण केलेले आहे. '*Ideology and Interpretation of Early Indian History*' ह्या आपल्या प्रदीर्घ लेखात आर्य वंशाची संकल्पना आणि पौर्वात्य हुकुमशाही ह्या बाबत पाश्चात्य इतिहासकारांनी केलेल्या विधानांना त्या छेद देतात. पुरावशेष, भाषाशास्त्र व सोशल ॲन्थ्रॉपॉलाजी यांचा आधार घेतल्यास आर्यवंशाचा सिद्धांत सत्याच्या निकषावर उतरत नाही; तसेच प्राचीन काळातील धर्मशास्त्र, कौटिल्याचे अर्थशास्त्र व पुरातत्त्वीय पुराव्यांचा विचार करून प्राचीन काळातील समाज गतिहीन नव्हता आणि शासकीय हुकुमशाही नव्हती असे त्या सप्रमाण सिद्ध करतात. एकूण डॉ. रोमीला थापर यांचे लिखाण त्यांच्या मार्क्सवादी विचारसरणी बरोबरच त्यांच्या स्वतंत्र बुद्धीचे, सखोल अध्ययनाचे, चिकित्सक विश्लेषण क्षमतेचे व सृजनशील प्रतिभेचे दर्शन घडविते.

**डॉ. इर्फान हबीब :-**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अलीगढ विद्यापीठात मार्क्सवादी विचारधारणेच्या आधारे भारतीय इतिहासाचे भाष्य करणारा एक गट संघटित झाला, त्या गटातील एक अग्रगण्य इतिहासकार डॉ. इर्फान हबीब हे आहेत, जवाहरलाल नेहरू विद्यापीठात त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले. काही वर्षे *I.C.H.R.* चे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. मध्ययुगीन भारतातील अर्थव्यवस्था हे त्यांच्या अध्ययनाचे व संशोधनाचे विशेष क्षेत्र आहे. याशिवाय मार्क्सवादी तत्त्वज्ञान सामान्य वाचकांपर्यंत पोचविण्याचाही त्यांचा प्रयत्न आहे. याचा त्यांनी लिहिलेले मार्क्सचे चरित्र हे उत्तम पुरावा आहे.

*Interpreting Indian History, Caste and Money in Indian History, Problems of Marxist Historiography, Agrarian System of Mughal India, Cambridge Economic History of India vol. I. The Atlas of Mughal Empire* ही त्यांची प्रसिद्ध ग्रंथरचना आहे. तसेच जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या इतिहासविभागाने मार्क्सवादी दृष्टिकोणातून भारताचा इतिहास लिहिण्याचा जो प्रचंड प्रकल्प हाती घेतला, त्यातील मध्ययुगीन इतिहासाचे तीन खण्ड प्रकाशित करण्यात डॉ. इर्फान यांचा सिंहाचा वाटा आहे. या खेरीज

मुघलकालीन तंत्रज्ञान, पेढीव्यवस्था, चलन व्यवस्था, कर पद्धती, कृषिजीवनाचे विविध पैलू इत्यादी अनेक विषयांवर त्यांनी स्फुट लेखन केले आहे.

'*Interpreting Indian History*' ह्या ग्रंथात इतिहासलेखनाची उद्दिष्टे काय असावीत याचे विवेचन करताना, राजकीय घडामोडीपेक्षा सामाजिक इतिहासाचे विवेचन व त्याचा अन्वयार्थ लावणे महत्त्वाचे असते यावर डॉ. हबीब भर देतात. तसेच महम्मद घोरीच्या भारतावरील आक्रमणाच्या वेळी भारतातील सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण करतात. मध्ययुगीन भारतातील अर्थव्यवस्था व सामाजिक जीवन सरंजामशाही व्यवस्थेहून सर्वस्वी भिन्न असल्याचा निष्कर्ष ते काढतात. '*Caste and Money in Indian History*' ह्या ग्रंथात आर्थिक हेतुमूलकतेच्या सिद्धांताच्या आधारे जातिव्यवस्थेच्या उदयाचे विवेचन करतात. उत्पादन प्रक्रियेतील घटकांच्या परस्परसंबंधांतून व श्रमविभाजनाच्या व्यवस्थेतून जातिव्यवस्था जन्माला आल्याचे मत ते मांडतात. '*Agrarian System in Mughal India*' ह्या अभ्यासपूर्ण ग्रंथात, जास्तीत जास्त महसूल गोळा करण्याच्या मुघल शासनाच्या धोरणामुळे शेतकरी वर्गात दारिद्र्य वाढले; व त्या असंतोषातून उठावांचा प्रादुर्भाव झाला; औरंगजेबाच्या शासनकाळात जे अनेक उठाव झाले, त्यामागे धार्मिक अत्याचाराचे कारण नसून ती आर्थिक शोषणाविरुद्धची प्रतिक्रिया होती; असे प्रतिपादन डॉ. हबीब करतात. शेतकऱ्यांना अध्ययनाचा केंद्रबिंदू बनवून त्यांनी हा ग्रंथ लिहिलेला आहे. '*Cambridge Economic History of India* (१२००-१७५०)' हा डॉ. तपन चौधरी यांच्या सहकार्याने डॉ. इर्फान यांनी संपादित केलेला ग्रंथ होय. मध्ययुगीन अर्थव्यवस्थेच्या विविध घटकांचे तपशिलात विवेचन ह्या मौलिक ग्रंथात केलेले आढळते. '*The Atlas of Mughal Empire*' व '*Economic Map of India*' हे मध्ययुगीन इतिहासाला त्यांनी केलेले मोलाचे योगदान आहे. भौगोलिक रचना दर्शविणाऱ्या बत्तीस नकाशांचा सटीप संच तयार करून त्यांनी हा दुर्लक्षित परंतु महत्त्वाचा प्रांत प्रकाशात आणला आहे. '*Problems of Marxist Historiography*' ह्यात ते काहीसे नवमार्क्सवादाकडे वळताना दिसतात. मानवी जीवनाच्या विकासातील मार्क्सने दर्शविलेले टप्पे जसेच्या तसे स्वीकारण्याची किंवा भौतिक परिस्थिती विचारांना जन्म देते, असेच मार्क्सने प्रतिपादन केले असे मानण्याचे कारण नाही; मार्क्सवादाची मूलतत्त्वे म्हणजे समाजजीवनातील आर्थिक व्यवहारांचे महत्त्व आणि द्वंद्वात्मक भौतिक विकासाचा सिद्धांत हे आहेत व त्या आधारे मानवी समाजाचा विचार इतिहासकाराने स्वतंत्रबुद्धीने करावा; असे मत डॉ. इर्फान व्यक्त करतात. मध्ययुगीन भारतीय आर्थिक व्यवहारांचा सखोल अभ्यास करणारे ज्येष्ठ मार्क्सवादी इतिहासकार म्हणून देशातच नव्हे तर देशाबाहेरही ते ख्यातनाम आहेत.

**डॉ. बिपन चंद्र :-**

भारतातील मार्क्सवादी इतिहासकारांत आधुनिक भारताचे व विशेषतः भारतीय राष्ट्रीय चळवळीचे भाष्यकार म्हणून डॉ. बिपन चंद्र सुप्रसिद्ध आहेत. अमेरिकेतील स्टॅनफर्ड विद्यापीठात उच्च शिक्षण घेतल्यानंतर जवाहरलाल नेहरू विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी व्यावसायिक जीवनाला प्रारंभ केला. भारतीय राष्ट्रीय चळवळीवर त्यांच्या पूर्वी अनेक अभ्यासकांनी संशोधनात्मक लिखाण केले होते. बिपन चंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या विषयाच्या अध्ययनाला त्यांनी मार्क्सवादी विश्लेषण पद्धतीची व तात्त्विक मांडणीची जोड दिली.

डॉ. बिपन चंद्र यांची राष्ट्रीय चळवळीबाबतची तात्त्विक भूमिका केंब्रिज स्कूलच्या त्याविषयीच्या भूमिकेला छेद देणारी आहे. सी.ए. बेली, अनिल सील सारखे केंब्रिज स्कूलचे इतिहासलेखक भारतातील ब्रिटिश शासन शोषक वसाहतवादी होते असे मानीत नाहीत; उलट भारतीय राष्ट्रवादी विचार पाश्चात्य विचारसरणीतून जन्माला आला असे म्हणतात. तसेच भारतीय राष्टीय चळवळीचे रूप एकजिनसी नव्हते; ते वेगवेगळ्या गटांचे मिळून बनलेले एक व्यासपीठ होते; उच्चशिक्षित मध्यम वर्गीयांची स्वहिताची जपणूक करण्याच्या उद्दिष्टाने उभी केलेली ती चळवळ होती. ह्या केंब्रीज स्कूलच्या धारणांचे खंडन डॉ. बिपनचंद्र करतात.

केंब्रिज स्कूलने प्रतिपादित केलेली प्रमेये नाकारताना भारतीयांची राष्ट्रीय चळवळ ही प्रामुख्याने जनसामान्यांची चळवळ होती; त्यात समाजाच्या निम्न स्तरावरील अनेक गटांचा सक्रिय सहभाग होता; त्यांच्या प्रचंड प्रमाणावरील

सहभागामुळे चळवळीला राष्ट्रीय रूप आले; कोणत्याही आंदोलनाला वैचारिक नेतृत्व सुशिक्षित मध्यम वर्गातील विचारवंतांकडून मिळते हे ऐतिहासिक सत्य आहे, तसेच ते भारतात घडले; मात्र ह्या नेतृत्वाने आपल्या गटाचे नव्हे तर जनसामान्यांचे प्रश्न उचलून घरले व त्यासाठी संघर्ष केला, अशी डॉ. बिपन चंद्रांची तात्त्विक भूमिका आहे. राष्ट्रवाद तसेच त्याच्याशी निगडित असलेल्या वसाहतवाद, जमातवाद व राष्ट्रवादाच्या वैचारिक व आर्थिक प्रेरणा इत्यादी विषयांचा ते उहापोह करतात. राष्ट्रीय चळवळीच्या गतिमान स्वरूपाचे विश्लेषण ते करतात.

डॉ. बिपन चंद्र यांच्या प्रसिद्ध लिखाणात *The Rise and Growth of Economic Nationalism, Nationalism and Colonialism in India, Communalism in Modern India'* हे ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहेत. *'India's Struggle for Freedom'* ह्या लेखसंग्रहाचे ते संपादक आहेत. यांखेरीज त्यांचे स्फुट लिखाणही बरेच आहे. आपल्या *'Rise and Growth of Economic Nationalism'* ह्या ग्रंथात स्वदेशी चळवळीपूर्वीच्या राष्ट्रवादी विचारामागील आर्थिक व वैचारिक प्रेरणांचे विवेचन ते करतात. *Nationalism and Colonialism in India'* ह्या ग्रंथात ब्रिटिश शासनकाळात उदयाला आलेला भारतीय भांडवलदार वर्ग परकीय शासनाला धार्जीणा नव्हता; परकीय शासकांनी त्यांना उत्तेजन न दिल्यामुळे व आर्थिक धोरणात दुय्यम स्थान दिल्यामुळे तो वर्ग असंतुष्ट राहिला, त्यामुळे त्या बगनि स्वदेशी चळवळीला पाठिंबा दिला असा निष्कर्ष ते काढतात. *'Communalism in India'* ह्या ग्रंथात जमातवादाच्या उद्‌भवाची व विकासाची ते कारणमीमांसा करतात. जमातवाद वसाहतवादाने जन्माला घातला, समाजाच्या भिन्न गटातील तणावांना वसाहतवादाने जमातवादाचे विकृतरूप दिले गेले; १९३७ पर्यंत उदारमतवादी असलेल्या जमातवादाने नंतर उग्र रूप धारण करण्यास असुरक्षिततेची भावना व अविवेक कारणीभूत होता आणि वसाहतवादी शासनाने त्याला भरपूर खतपाणी घातले; तसेच सर्व मुस्लीम जमातवादी नव्हते असेही ते ठामपणे प्रतिपादित करतात. राष्ट्रवादी लेखकांनी राष्ट्रीय चळवळीतील नेतृत्वावर, त्यांच्या कार्यावर भर देऊन लिखाण केले. त्यांच्यापेक्षा बिपन चंद्रांच्या लिखाणाचे स्वरूप सर्वस्वी भिन्न आहे. ते राष्ट्रीय चळवळीचे जनआंदोलनाचे रूप अधोरेखित करतात आणि त्यांच्या वाढत्या सहाभागामुळे ही चळवळ अधिकाधिक राष्ट्रव्यापी कशी बनत गेली याचे विवेचन करतात. हे त्यांच्या ऐतिहासिक लिखाणाचे वैशिष्टये आहे.

भारतीय मार्क्सवादी लेखनाची वैशिष्ट्ये :

भारतात मार्क्सवादी इतिहासलेखन प्रवाह स्थूलमानाने विसाव्या शतकाच्या मध्यात सुरू झाला असला तरी अल्पावधीतच तो एक समृद्ध प्रवाह बनला आहे. अनेक तत्त्वनिष्ठ परंतु स्वतंत्र बुद्धीच्या विचारवंतांनी ह्या प्रवाहाला व्यापक व सखोल बनविले आहे. इतिहास विषयाचा आवाका, मांडणी आणि विश्लेषणाचे तंत्र या दृष्टीने परंपरागत इतिहासलेखनाला ह्या प्रवाहाने नवी दिशा दिली आहे. राजकीय घडामोडीवर तोवर असलेला भर बाजूला सारून ह्या प्रवाहाने आर्थिक व सामाजिक घटकांच्या अध्ययनाचे महत्त्व अधोरेखित केले. घटना अगर व्यक्ती याऐवजी दुर्लक्षित समाजगट, भिन्न सामाजिक व आर्थिक व्यवस्थांचा मूलगामी अभ्यास ह्या प्रवाहाला अपेक्षित आहे. ह्या प्रवाहातील इतिहासकारांनी शेती, ग्रामीण व्यवस्था, वर्ण व्यवस्था, यांचा शास्त्रीय अभ्यास केलेला आढळतो. वैदिक काळ, जैन व बौद्ध धर्म यांसारख्या विषयांचा देखील भौतिकवादी दृष्टिकोणातून नवा अन्वयार्थ मार्क्सवादी लेखकांनी लावला आहे. ह्या लिखाणाचे स्वरूप निवेदनात्मक अगर वर्णनात्मक नसून विश्लेषणात्मक व चिकित्सक आहे. ह्या लिखाणाला बुद्धिवादाचे, तर्कनिष्ठेचे अधिष्ठान आहे. ऐतिहासिक साधनसामग्री बरोबरच भाषाशास्त्र, समाजशास्त्र, लोकवाङ्मय, अभिजात साहित्य, पुरातत्त्वशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी विविध ज्ञानशाखांचा वापर मार्क्सवादी इतिहासकारांनी केलेला आढळतो. ढोबळमानाने ह्या प्रवाहातील लेखक मार्क्सवादी विचारसरणीचे आहेत, आर्थिक व्यवहार हे सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवन निर्धारित करतात आणि भौतिक विकास द्वंद्वात्मक पद्धतीनेहोतो ह्या मार्क्सवादाच्या मूलभूत धारणांच्या आधारे ते भारतीय इतिहासाचा अन्वयार्थ लावतात; मात्र डॉ. इर्फान हबीब आणि डॉ. बिपनचंद्र मानवी जीवनातील परिवर्तनात विचार व संकल्पनांचे महत्त्व विशद करतात. डॉ. हबीब तर मार्क्सने ह्या पैलूंचा विचार दुर्लक्षित केला असे म्हणणे समर्थनीय ठरत नाही; असेही ठासून प्रतिपादित करतात. एकूण, मार्क्सवादी इतिहासलेखन हा भारतीय इतिहास लेखनातील एक प्रगल्भ व समृद्ध प्रवाह आहे याबद्दल शंका नाही.

## सबाल्टर्न स्टडीज *'Subaltern' Studies*

**प्रस्तावना:-**

'सबाल्टर्न' ही मुलतः इटालियन संकल्पना आहे. याचा अर्थबोध 'दुय्यम दर्जाचा" असा होतो. या शब्दाचा वापर प्रथमतः इग्लडमध्ये मध्ययुगात भुदास आणि शेतकऱ्यांसाठी करण्यात आला. इ. स. १७०० नंतर इटालियन लष्करात ही संकल्पना वापरली गेली. ही संकल्पना इटालियन लष्करातील कॅप्टन दर्जाच्या पदाच्या खाली असणाऱ्या सैनिकाकडे म्हणजे दुय्यम सैनिकाकडे निर्देश करीत असल्याने दुय्यमत्व सिद्ध करण्यासाठी इतिहास संशोधकांनी या संकल्पनेचा वापर केलेला दिसून येतो. कनसाईज ऑक्सफर्ड डिशनरीमध्ये 'लहान हुद्दा' असा असून रणजित गुहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दक्षिण अशियाई समाजाच्या अधिनस्त वर्गाकरीता या शब्दाचा सर्रासपणे वापर केलेला दिसतो.

इटलीमध्ये फॅसिस्ट हुकुमशाहीच्या काळात साम्यवादी चळवळीने जोर धरला होता. इ. स. १९२१ मध्ये ग्रामशीने इटलीमध्से साम्यवादी पक्षाची स्थापना केली. इटलीमध्ये रुजू पहाणारा साम्यवाद आणि समाजवाद हा सिद्धांत मोडून काढण्यासाठी मुसोलिनेने कडक धोरण अवलंबिले होते. याच काळात आपल्या लेखणीतून मुसोलिनीच्या राजवटीवर आपल्या लेखणीतून' अँटोनिओ ग्रामशी' अव्याहतपणे टिका करीत होता. मुसोलिनीने साम्यवाद दडपून टाकण्यासाठी केलेल्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून त्याने अॅन्टोनियो ग्रामशी याला पकडून तुरुंगात टाकले. तुरुंगातही ग्रामशी स्वस्त बसला नाही. तुरुंगात असतांना त्याने तुरुंगातील राजकैद्यांच्या मुलाखती घेवून लिहून ठेवल्या, मात्र या काळात ग्रामशीचे रोममधील एका फॅसिस्ट कामगार दवाखान्यात निधन झाले. ग्रामशीच्या निधनानंतर त्याची मेव्हणी * तत्याना शूश' ग्रामशीच्या सामान घेण्यासाठी तुरुंगात आली तेव्हा तीच्या हाती ग्रामशीचे हे लिखाण लागले आणि ते त्याच्या मृत्यूनंतर प्रकाशित करण्याचे काम तत्याना शुश हीने केले. ग्रामशीने 'सिलेक्टेड फॉर फॉर पॉलिटीकल रायटींग्ज आणि सिलेक्टेड फॉर प्रिझन नोटबुक्स' हे दोन खंड लिहून ठेवले होते. हे दोन ग्रंथ प्रकाशित इ ाल्यानंतर विद्वानांच्या जगात यावर चर्चा सुरु झाल्या आणि अनेकांनी ग्रामशीच्या संकल्पनांच्या आधारे इतिहासाला नवा आकार देण्याचा प्रयत्न केला. सबाल्टर्न स्टडीज या शब्दाचा वापर 'वर्ग' या व्यापक अर्थाने ग्रामशीने केला आहे. त्यातून सबाल्टर्न स्टडीज या विचार प्रवाहाचा उगम झालेला दिसून येतो.

### ग्रामशीची 'वर्चश्वाची' संकल्पना (*Hegemony Concept*)

ग्रामशीने लेलीनने केलेल्या मार्क्सच्या व्याख्येच्या सैद्धांतिक दृष्टीकोनावर आपले लक्ष केंद्रीत केले कारण, "इतिहास आणि समाजशास्वाच्या परीप्रेक्षात ऐतिहासिक भौतिकवादाची पुर्नव्याख्या करण्यासाठी एक निश्चित आधार त्याला मिळवून देता येईल." असे ग्रामशीचे मत होते. ग्रामशी प्रिझन नोटबुकमध्ये ऐतिहासिक भौतिकवादाचे लवचीक आणि मानवतावादी संस्करण देण्याचा प्रयत्न करतो. त्याचा सिद्धांत हा समाज आणि समाजिक परीवर्तनाचा एक मौलिक आणि सारगर्भित सिद्धांत आहे. मात्र ग्रामशी हा सिद्धांत मांडतांना या गोष्टीकडेही अंगुलिनिर्देश करतो की, औद्योगिकरणामुळे प्रगत झालेल्या पाश्चिमात्य देशातील प्रगतीशिल समाजात परीवर्तन घडवून आणणे कठीन आहे. मात्र ग्रामशीने पुर्वीच्या संरचनेतील सरळ विचारांपासून फारकत घेतली आणि अभिजनवर्गाच्या सांस्कृतीक वर्चश्वाचे (*Cultural Hegemony*) विचार मांडले. त्यांनी वर्चश्वाची व्याख्या राजकिय, बौद्धीक आणि नेतीक दृष्ट्या मांडली. ग्रामशीच्या वर्चश्वाच्या सिद्धांताने सामाजिक संरचना, राजकारण, कायदा, संस्कृती, धर्म, कला इ. शास्त्रांमध्ये नवे चर्चाविश्व निर्माण केले. ज्याकडे समकालीन मार्क्सवादी लेखकांनी विशेष लक्ष दिलेले दिसून येत नाही. हे वर्चश्वाची संकल्पना मांडतांना ग्रामशीने *The German Idiology* या मार्क्सच्या ग्रंथातील विचार स्विकारले. मार्क्सने मांडलेल्या " प्रत्येक युगात अधिराज्य गाजवणारे विचार सत्ताधिश वर्गाचे विचार असतात आणि जो वर्ग समाजावर भौतिक दृष्ट्या सत्ता गाजवितो तोच वर्ग समाजावर बौद्धीक दृष्ट्या सत्ता गाजवितो." याचाच मार्क्सला अभिप्रेत असलेला अर्थ असा कि समाजावर बौद्धीक सत्ता गाजविणारे विचार सत्ताधिशांच्या भौतिक हितसंबंधांचे अविस्कार असतात.

ग्रामशीने मांडलेल्या हेजिमनीच्या सिद्धांताचा आशय असा होता की, प्रत्येक काळात सत्ताधिश वर्ग अंकित वर्गावर वर्चश्व ठेवण्यासाठी दोन मार्गांचा वापर करतो. त्यातील पहिला मार्ग दमनाचा (*Coercion)* आणि दुसरा मार्ग संमतीचा (*Consent)* हा होय. शासक वर्ग आपले अंकित वर्गावर नियंत्रण कायम ठेवतो, या संदर्भात ग्रामशी वर्चश्व (*Dominance)* आणि प्रभुत्व ( *Hegemony)* हे दोन भिन्न शब्द वापरतो. वरील दोन्ही मार्ग प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी शासकवर्गाने निवडलेली होती. शासकवर्ग हा पहिल्या दमन मार्गाचा अवलंब कायदा, दंड यंत्रणा, पोलिस यंत्रणा, इ. मार्गानी वर्चश्व प्रस्थापित करतो. तर संमती मार्गाचा वापर अंकितांच्या बौद्धीक, मानसिक आणि सांस्कृतीक जाणिवांना सोईस्करपणे प्रभावित करुन आपल्या शासनाला त्यांची मान्यता मिळविली जाते. हा आपला सिद्धांत मांडतांना ग्रामशीने कार्ल मार्क्सने मांडलेल्या सिद्धांताचा बदललेल्या जागतिक परिस्थितीच्या संदर्भात नवा अन्वयार्थ लावला. "सामाजिक विकासाचा आणि परिवर्तनाचा मुळ आधार उत्पादन प्रक्रिया असते. आर्थिक व्यवहार समाजाच्या विकासाची दिशा निर्धारीत करतात, विचार आणि संस्कृतीही त्यामुळे निर्धारीत होतात. असा विचार मार्क्सने मांडला. हा विचार 'पाया इमला' सिद्धांत म्हणून ओळखला जातो." या सिद्धांतावर विचार मांडतांना ग्रामशी असा युक्तीवाद करतो की, आर्थिक व्यवहार सामाजिक जिवनाला आधारभूत असले तरी त्यावरील सांस्कृतिक इमला देखील तितकाच महत्वाचा असतो. सामाजिक परिवर्तनाला संस्कृती गतीमान करीत असते. या शिवाय ग्रामशीने आपल्या हेजिमनी' या संकल्पनेचे विवेचन करतांना 'सबाल्टर्न' ही संकल्पना वापरली आहे. सबाल्टर्नची संकल्पना मांडतांना ग्रामशीने सामाजिक क्रांतीचा जो आधार मांडला तो राज्यावर सरळ आक्रमण करुन नाही तर 'भुमिका युद्धातून (*War of Position)* साकार झाला पाहीजे. सामाजिक क्रांती घडून येण्यासाठी कामगार वर्गाने राजकीय आणि वैचारीकदृष्ट्या सक्षम बनले पाहिजे. वैचारीक आणि राजकिय संघर्षातून कामगार वर्गाने बुझ्वा वर्गाला निशब्द करुन सोडले पाहिजे. आणि अश्या मार्गाकडे मार्गक्रमण केले पाहिजे ज्यामुळे कामगार वर्गाचे हितसंबंध जोपासले जावून सत्ता कामगारांच्या ताब्यात राहील. ग्रामशीने मांडलेल्या साम्यवादी क्रांतीच्या धोरणात अंर्तभूत असलेल्या 'प्रभुत्वाची संकल्पना' आणि त्या संबंधी विचारांनी विशेषतः समाजाविषयीच्या अभ्यासात व आधूनिक इतिहास लेखनावर खोलवर छाप टाकली.

समाजाच्या वैचारीक प्रभुत्वाच्या संकल्पनेवर दक्षिण अशियाई समाजाने आणि इतिहासकारांनी प्रकाशझोत टाकला आहे. सामाजिक क्रांतीमधील बुद्धीवादी वर्गाची जी भुमिका ग्रामशी मांडली त्यामुळे मार्क्सवादी समाजिक इतिहासकारांना, नेत्यांना राजकिय दृष्टीकोनातून बुद्धीवाद्यांचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळाले.

१९८० च्या दशकाच्या पूवार्धातील अर्नेस्ट लेक्ला, शैथाल मॉफे इत्यादी मुलगामी सिद्धांतकारांच्या लेखनाबरोबर युरोपीय इतिहास अभ्यासकांना प्रभावित केले. ज्या युरोपीय इतिहासकारांवर ग्रामशीचा प्रभाव होता त्यात ई. पी. थॉमसन यांचे नाव आग्रक्रमाने घेतले पाहिजे. या शिवाय काही केंब्रीजपंथी इतिहासकारांवरही ग्रामशीच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

भारतीय इतिहासलेखनात ग्रामशीच्या तत्वज्ञानाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. वसाहतीक राज्यांच्या विश्लेषणासाठी वर्चश्वाच्या संकल्पनेचा वापर करुन बिपीन चंद्रा यांनी या वसाहतवादाला ब्रिटीश वसाहतवाद हा अर्धवर्चस्ववादी होता असे म्हटले. बहूजन वर्गाला शासक वर्गाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रभुत्वाची मुल्य आत्मसात करण्यासाठी नियमितपणे तयार केले जाते. या ग्रामशीच्या सिद्धांताचे बिपीन चंद्रा यांनी भारतीय परिस्थितीच्या संदर्भात परिक्षण केले. भारतातील शेतकरी चळवळीचे विश्लेषण करण्यासाठी सुमित सरकार आणि के. एम. पन्नीकर या इतिहासकारांनी 'भुमिकायुद्ध' या संकल्पनेचा वापर केला. ग्रामशीचा हा 'सबाल्टर्नचा' विचारप्रवाह रणजित गुहांनी स्विकारला. त्यांनी सबाल्टर्न स्टडीजच्या केलेल्या प्रकाशनानंतर ग्रामशीच्या विचारांचे भारतीय इतिहासलेखनातील महत्व वाढले. खरे तर भारतीय परीप्रेक्षात सबाल्टर्न स्टडीजचा उदय हा अभिजनवादी इतिहासलेखनाच्या विरोधाची प्रक्रिया होती. कारण सबाल्टर्नचा विचारप्रवाह भारतात आला त्यावेळी तिन प्रमुख इतिहासलेखनाचे प्रवाह भारतात होते.

१) सम्राज्यवादी किंवा वसाहतवादी इतिहासलेखनाचा प्रवाह या प्रवाहाने अज्ञानी जनतेला ज्ञान देण्याकरीता वसाहतीक शासनाचा उदोउदो करण्यात धन्यता मानली आणि भारतीयांच्या मनावर या गोष्टीचे चित्रण करण्यात आले की, मागासलेल्या भारतात ज्ञानप्रसाराचे कार्य ब्रिटीश शासनच करीत आहे.

२) दुसरा प्रवाह सम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या विरुद्धची प्रतिक्रिया होती. या इतिहासलेखनाने वसहतवादाच्या विरोधी अंदोलनांचा अभ्यास केंद्रीभुत मानला. आणि ब्रिटीशांना प्रतिकार करुन नव्या राष्ट्रीय जाणिवांची निर्मिती करण्यावर भर दिला.

३) तिसरा प्रवाह मार्क्सवादी इतिहास लेखनाचा होता. जो जनतेला क्रांती करण्याची प्रेरणा देवून समाजवादी राज्य स्थापन्यावर भर देत होता. कामगारांचे राज्य कल्याणकारी राज्य असते असे या प्रवाहाचे मत होते.

सबाल्टर्न स्टडीजची संकल्पना ग्रामशीच्या विचारातून उदयास आली. याच काळात एरीक हॉब्जबॉम, रेमंड विल्ययम्स, स्टुअर्ट हॉल यांनी आपल्या विचारातून ग्रामशीच्या संकल्पनेचा स्विकार केला. तर पेरी अँण्डरसन, टॉम नैर्न याच काळात ग्रामशीचे विचार मांडत होते. तर जॉर्ज लेफेबन, ख्रिस्तोफर हिल, इ.पी. थॉमसन युजीन जेनोवेज आणि इतर पाश्चिमात्य मार्क्सवादी इतिहासकार ज्यांनी सामाजिक इतिहासाची मांडणी करतांना जनतेच्या दृष्टीकोनावर भर देण्याचे इतिहासकारांना आवाहन केले.

शहिद अमिनने महात्मा गांधींबद्दल जनतेच्या दृष्टीकोनाचा अभ्यास केला. त्यांनी '*Gandhi as a Mahatma*' या लेखात पूर्व उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील अनेक साधनांचा धांडोळा घेवून असे मत मांडले की, काँग्रेसी नेते महात्मा गांधीकडे ज्या दृष्टीने बघत होते आणि सामान्य जनता ज्या दृष्टीने बघत यामध्ये मुलभुत असे अंतर होते. यात आर्थिक तत्व आणि राजकीय सहभाग होता. गांधींचा आदेश अफवेप्रमाणे सगळीकडे पसरत होता. कारण चोरीचोरा घटनेच्या काळात पोलिस चौकी जाळण्यासाठी, पोलिसांना मारण्याकरीता, बाजार लुटण्यासाठी गांधींच्या नावाचा वापर सर्रास करण्यात आला. रणजित गुहांनी आपल्या 'द प्रोज ऑफ काऊंटर इंसरजेंसी' या लेखात भारतातील शेतकरी समुहातील इतिहासकारांवर टिका केली. कारण त्यांनी शेतकरी अंदोलनांना आकस्मित आणि अनियोजित अंदोलने होती असा ठपका ठेवला होता. त्यांच्यामतानुसार या प्रकारच्या इतिहास लेखनात शेतकरी विद्रोहाची चर्चा एक व्यक्ती कींवा वर्गाच्या रुपात करण्यात आली. शेतकऱ्यांच्या आस्मितेवर भर देण्यात आला नाही. शिवाय शेतकरी अंदोलनांविषयीच्या दंतकथांचा वापर तथ्य म्हणून करण्यात आला. रणजित गुहांनी सरकारी आकडेवारीची आणि डाव्यां इतिहासकारांच्या विद्राही लिखाणावर टिका केली. त्यांनी त्या लिखाणाला प्रति विद्रोहाचे घडे असे म्हणून विद्रोहीना इतिहासाचे नायक बनण्यास या इतिहासकारांनी हरकत घेतली असे मत गुहांनी मांडले.

*पिजेंट रीवोल्ट अॅन्ड इंडीयन नॅशनालिझम* १९१९ ते १९२२ या लेखात ग्यान पांडे हे असा तर्क देतात की, असहकार अंदोलनापुर्वी अवधमध्ये उसळलेली शेतकरी चळवळ स्वायक्त होती. शेतकऱ्यांना शहरी भागातील आणि कॉंग्रेस नेत्यांपेक्षा अधिक या गोष्टीचे ज्ञान होते की, स्थानिक सत्ताधिश आणि वसाहतीक शासनाचे असलेले संबंध हे मैत्रीचे संबंध आहेत. या शिवाय काँग्रेस संघटना जेव्हा जेव्हा मजबूत झाली त्यावेळी शेतकरी अंदोलन कमी हिंसक झाले. यावर ग्यान पांडे यांचा मतितार्थ असा की, शेतकऱ्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अंदोलनाचे समर्थन केले.

स्टिफन हेनिंगहम यांनी क्वीट इंडीया इन बिहार ऍन्ड इस्टर्न युनाइटेड प्रोविन्सेज या लेखात असे मत मांडले की, दुय्यम जनसमुह आणि अभिजन हे वर्ग स्पष्टपणे वेगळे होते. म्हणूनच १९४२ ची महान क्रांती अभिजनांच्या राष्ट्रीय चळवळीबरोबर दुय्यम जनसमुहांचाही विद्रोह होता. मात्र त्या दोन्ही वर्गाचे हितसंबंध आणि मागण्या वेगवेगळ्या होत्या. अभिजनांच्या राष्ट्रीय अंदोलनात शामिल अंदोलनकर्त्यांनी सरकारने काँग्रेसी कार्यकर्त्यांचे केलेल्या दमनाचा विरोध केला आणि भारताला स्वातंत्र्य देण्याची मागणी केली. दुसरीकडे दुय्यम जनसमुहातील अंदोलनकाऱ्यांनी दासत्व आणि शोषणापासून मुक्ती मिळवण्याची मागणी केली. त्यामुळेच सरकारला क्रांतीमधील या दुहेरी भुमिकांमुळे हे अंदोलन दडपून टाकणे शक्य झाले.

डेव्हिड हार्डिमनने आपल्या अनेक लेखांमध्ये दुय्यम जनसमुहांच्या इतिहासावर प्रकाश टाकला आहे. आणि असे मत मांडले की, दक्षिण गुजरातमधील कबिल्यांचे अंदोलन असो की, पूर्व गुजरातमधील भिल्ल अंदोलन असो अथवा सविनय कायदेभंग अंदोलनातील शेतमतमजुरांची विद्राहाची भावना असो, ही अभिजनांच्या विरोधात दुय्यम जनसमुहांचे स्वतंत्र्य राजकारण होते.

सुमित सरकार ने द कंडीशन अँन्ड नेचर ऑफ सबाल्टर्न मिलिटेन्सी या लेखात असे मत मांडले की, बंगालमध्ये असहकार अंदोलनाच्या काळात जनतेने नेत्यांचा अपमान केला. सरकार यांनी सांगीतले की, सबाल्टर्न मध्ये मुलतः तीन सामाजिक समुह शामिल करता येतात. यात फिरस्ते कबिले, खालच्या जातीतील शेतमजूर, आणि खंडाने जमिन कसणारे शेतकरी सामान्यपणे बंगालमध्ये मध्यवर्ती जातीचे लोक चहाच्या मळ्यांमध्ये काम करणारे, खान आणि उद्योगांमध्ये काम करणारे मजूर, या समुहांमध्ये आपसात विभाजन होते. यामध्ये शोषक आणि शोषीत दोन्ही वर्ग होते तरीही त्यांचे म्हणणे असे होते की, दुय्यम जनसमुह हा स्वतंत्र्य राजकिय वर्ग होता. त्याची खास अशी काही वैशिष्ट्य आणि वेगळी मानसिकता होती. ही मानसिकता शोधून काढली पाहिजे. आणि हे अभिजन राजकारण्यांच्या राजकाणापेक्षा वेगळे होते. २० व्या शतकात बंगालमध्ये अभिजन राजकारणी हे उच्च जातीतील आणि उच्चशिक्षीत व्यावसाईक वर्गातील होते. त्यांचा संबंध जमिनदार वर्गाशी होता. अशा प्रकारे वेगवेगळ्या सबाल्टर्न स्टडीजच्या खंडामध्ये वेगवेगळ्या लेखांमध्ये अभिजन आणि दुय्यम भागांना वेगवेगळे करुन दुय्यम जनसमुहांमधील जागृतीला स्वायक्त मानण्याचा प्रयत्न करण्यात आला. यात पार्थ चटर्जीसारख्या लेखकांचा अपवाद आहे.

काही वर्षांनंतर सबाल्टर्न स्टडीजच्या इतिहासकारांच्या दृष्टीकोनात बदल दिसून आले. यात उत्तर आधुनिकता आणि उत्तर वसाहतवादी विचारांचा प्रभाव सबाल्टर्नवर पडला. तरीही गुहा, पांडे, अमिन, हार्डीमन, हेनिंगहम, सरकार या विद्वानांनी दुय्यम जनसमुहांच्या दृष्टीकोनातून इतिहासाच्या मांडणीवर भर दिला. मात्र पार्थ चटर्जीच्या लेखनावर सुरुवातीपासून उत्तर वसाहतवादी विचारांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी आपल्या नॅशनालिस्ट थॉट अन्ड कलोनियल वर्ड (१९८६) या ग्रंथाम एडवर्ड सैदच्या उत्तर वसाहतवादी चौकटीशी एकनिष्ठ राहून विधाने केली. त्यांच्यामते वसाहतीक शक्ती आणि ज्ञानाचा संहिता सांभार खुप मोठा आहे. त्या नंतर द नेशन ॲन्ड इट्स फ्रैगर्मेंट्स (१९९५) मध्ये ते हेच विश्लेषण पुढे ओढत नेतात. पुढे जावून इतर लेखकांनीही मार्क्सवादाचा विचार सोडून दिला. त्यामुळे या विचारप्रवाहामध्ये बौद्धीक मत विभाजनाची परिस्थिती निर्माण झाली. एकिकडे आजही असे काही सबाल्टर्न इतिहासकार आहेत जे दुय्यम जनसमूहांच्या इतिहासाशी जोडलेले आहेत. मात्र बहुतेक लेखक उत्तर वसाहतवादी लेखन करतात. त्यामुळे आता आर्थिक आणि सामाजिक मुद्यांपेक्षा सांस्कृतीक आणि उत्तर वसाहतवादी विश्लेषणावर भर दिला जातो.

सबाल्टर्न प्रकल्पात फुकोच्या चिंतनाचे भारतीय इतिहास मिमांसेसाठी प्रस्तावित करण्याचे श्रेय्य गायत्री चक्रवर्ती स्पिवॅक यांच्याकडे जाते. ज्ञान- सत्ता यांच्या तील अंतरसंबंधाचा फुकोवादी दृष्टीकोन बर्नार्ड कोहन, डेव्हिड ऑर्नाल्ड यांचा इंडीयन प्लेग १८९६ ते १९०० हा लेख फुकोवादी विश्लेषण पद्धतीचेचे द्योतक आहे. या शिवाय फुकोवादी विश्लेषण पद्धतीचा अंगिकार करुन पार्थ चटर्जी, ग्यान प्रकाश, दिपेश चक्रवर्ती, शहीद अमिन हे लेखन करीत असलेले आपणास दिसतात.

सबाल्टर्न स्टडीजच्या नवव्या खंडामध्ये जातीव्यवस्थेसंबंधीचा कांचा इलैय्या यांचा एक लेख प्रकाशित करण्यात आला. मुळात उत्तर आधुनिकतावादी विचारसरणीला सोईचा आणि जवळचा हा लेख होता. इलैय्यांचा हा लेख मुळतः उच्चभ्रु जातींच्या ब्राह्मणी-हिंदू संस्कृतीच्या विरोधात दलित बहुजनांच्या परंपरेला सांस्कृतीक पर्याय पेश करतो. दलित-बहुजनांच्या श्रमप्रधातेचे इलैय्या कौतुक करतात. परंतु दलित-बहुजनांच्या वाट्याला आलेली श्रमप्रधानता ही जातिव्यवस्थेच्या श्रेणीबद्ध शोषणाची उपज आहे. या वास्तवाकडे ते डोळेझाक करतात.

जातिव्यवस्थेनंतर सबाल्टर्न स्टडीने स्त्री प्रश्नांवर गायत्री चक्रवर्ती स्पीवेंक यांच्या टिकेनंतर लक्ष केंद्रीत करायला सुरुवात केली. त्यामुळे पाचव्या खंडाच्या प्रकाशनानंतर स्त्री प्रश्नांना सबाल्टर्न स्टडीनमध्ये स्थान मिळाले.

महाश्वेता देवी यांच्या 'स्तनदायीनी' या कथेवरील आपल्या लेखात स्पिवेंक मार्क्सवादी सिद्धांत चौकटीत श्रमविभागणी आणि आर्थिक शोषण या संकल्पनातून दाईच्या स्तन-पानाचा अर्थ लागत नसल्याचे दाखवून देतात. तर फुकोच्या तत्वचौकटीत पराधिन, आत्मनिष्ठ व्यक्ती म्हणून स्त्रीयांचा अभ्यास करण्याची भूमिका त्यांनी आग्रहाने मांडली. आईला जेवढे मिळते त्यापेक्षा ती अधिक देत असते. अशा मातृत्वाच्या पराधिन आत्मकल्पनेच्या आधारे स्त्रीयांच्या प्रश्नाचा वेध घेणे त्यांना ईष्ट वाटते. म्हणून उत्तर संरचनावादी चौकटीमध्ये त्यांनी सबाल्टर्न स्टडीजच्या स्वी अभ्यासाची बैठक घडवली.

'चंद्राचा मृत्यू' हा रणजित गुहा यांचा लेख स्त्री जीवनाचा व तिच्या जाणिवेचा उलगडा करण्याचा एक महत्वपूर्ण प्रयत्न आहे. वसाहतीक काळातील चंद्रा या स्वौच्या मृत्यू संदर्भातील न्यायालयीन कागदपत्रावर हा लेख आधारलेला आहे. बागडी जातीतील चंद्रा या विधवेला दिराशी संबंध येवून गर्भ रहातो. जात, समाजात चंद्राच्या वाट्याला आलेल्या या संकटप्रसंगी चंद्राची आई भोगवती तिची बहिण वृंदा आणि तिच्या भावाकडचे आणि आईकडचे नातेवाईक तिला मदत करतात. काली बागडी या स्थानिक वैदूकडून भोगवती गर्भपाताचे औषध मिळविते. वृंदा ते औषध चंद्राला देते व गर्भपात घडून येतो. पण त्यामध्ये चंद्राचा मृत्यू होतो. वसाहतवादी न्यायसंस्थेच्या चौकटीत चंद्राला संकटातून सोडवणारी तिची बहिण वृंदा खुनी ठरते. चंद्राची आई आणि काली बागडी गुन्ह्यातले तिचे साक्षीदार ठरतात. बगालच्या बागडी जातीची आर्थिक सामाजिक पार्श्वभुमी विषद करुन पितृसत्ता, जातीव्यवस्थेच्या संयुक्त प्रभावातून निर्माण झालेल्या नितीनियमांच्या रचनांमध्ये चंद्राच्या मृत्यूला गुहांनी उभे केले. बागडी ही बंगाली जातसमाजामध्ये दुय्यम सामाजिक दर्जा लाभलेली जात होती. या जातीमध्ये जमिनमालकीचे प्रमाण अत्यल्प असल्याने शेतमजूरीचे प्राबल्य होते. दारीद्रय आणि दुय्यम जातीचे जीवन जगणाऱ्या बागडींमध्येही पितृसत्ताक नैतिकतेचा वावर होता. जातसमाजामध्ये जातीची प्रतिष्ठा व दर्जा त्या त्या जातीच्या स्त्रीयांच्या लैगीक पवित्र्याशी जोडला जात होता. जातीव्यवस्थेची पितृसत्ताक नैतिकता स्त्रीयांवर बंधने लादण्याचाच आग्रह धरीत होती. जातपंचायत आणि गावपंचायत या पितृसत्ताक नैतिकतेच्या वाहक होत्या. त्यामुळे जात आणि स्त्रीसंबंध तपासतांना गुहांचे हे संशोधन पथदर्शक ठरते.

**सबाल्टर्न स्टडीजवर टिकाः-**

सबाल्टर्न स्टडीजवर मोठ्या प्रमाणावर टिका करण्यात आली. सबाल्टर्न स्टडीजच्या प्रकाशनानंतर मार्क्सवादी, राष्ट्रवादी आणि केंब्रिज स्कूलच्या इतिहासकारांनी या विचारप्रणालीवर टिका केली. स्वायक्त, उस्पूर्त, दुय्यम जनसमुह, या मद्यांवर कळाडून टिका केली. जावेद आलम यांनी सबाल्टर्न स्टडीजच्या या दाव्यावर टिका केली की, दुय्यम जनसमुह स्वायक्त असतात. आलम म्हणतात की, दुय्यम जनसमुहांचे राजकारणाची स्वायक्तता विद्रोही भावनेच्या सातत्याला आधार मानून करण्यात आली. शेतकऱ्यांमध्ये नियमीतपणे विद्रोह करण्याची जी प्रवृत्ती होती त्या प्रवृत्तीला आधार मानून विश्लेषण करण्यात आले. मात्र ही प्रवृत्ती काही स्वायक्त नव्हती. जरी हे विद्रोह स्वायक्त मानले तरी याचा परिणाम सकारात्मक असो अथवा नकारात्मक असो सबाल्टर्न इतिहासकारांना यामध्ये विशेष आवड नव्हतो. आपल्या एका समिक्षात्मक लेखात संगीता सिंह यांनी शेतकरी विद्रोह उस्पूर्त होते असे गुहांनी चुकीच्या पद्धतीने मांडल्यामुळे त्यांच्यावर टिका केली. त्या म्हणतात गुहा उस्पुर्ततेला प्रतिवादी कारवाईचा मानतात. मात्र उस्पूर्तता परंपरागत जागृतीवर आधारलेली असते. असे असले तरी गुहांचा मुळ उद्देश उस्मूर्ततेला राजकिय क्रिया म्हणून मान्यता मिळवून देण्याचा होता. या शिवाय विद्रोह्यांच्या मानसिक चेतनेमध्ये धर्माच्या प्रमुख भूमिकेवर भर देवून इंग्रजांच्या दृष्टीकोनाचे समर्थन केले. रंजित दासगुप्ता म्हणतात की, दुय्यम जनसमुहांची कोणतीही निश्चीत अशी व्याख्या करण्यात आली नाही. या शिवाय सबाल्टर्न इतिहासकार संघर्ष आणि प्रतिकारावर लक्ष केंद्रीत करतात. या शिवाय आपल्या लेखनात दुय्यम जनसमुहांकडून सहकार्य आणि मौन धारण केलेल्या मानसिकतेकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. डेव्हिड लडेन यांनी आपल्या "*Reading Subaltern Studies: Critical History, Contested meaning and the globalization of South Asia*" या ग्रंथात त्यांच्यावर टिका केली आहे. सबाल्टर्न स्टडीजच्या विचारधारेच्या समथकांमध्ये सुद्धा दोन गोष्टींविषयी नाराजी दिसून येते. पहिली गोष्ट अशी की, अभिजन आणि दुय्यम हि भिंत उभारतांना त्याला सैद्धांतीक आधार देण्यात आला आणि त्यातुनच दुय्यम वर्गाचा उदय झाला.

रोजलिड हेलनन ने आपल्या सबाल्टर्न स्टडीज या लेखात प्रारंभिक खंडांवर टिका केली आहे. ते म्हणतात की, सबाल्टर्न इतिहासकारांचा असा दावा होता की, त्यांनी इतिहासलेखनाचा नवा मार्ग तयार केला. मात्र ज्या स्थितीत दुय्यम वर्ग समोर आले, त्यांचे योगदान समोर आले त्या स्थितीत ते उदारमतवाद आणि मानवतावादाप्रमाणेच दिसून येतात. ख्रिस्ताफर बेली यांनी 'रैलिंग अराउंड द सबाल्टर्न' या लेखात सबाल्टर्न स्टडीजच्या मुल्यांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणतात की, सबाल्टर्न इतिहासकारांनी नव्या सांखिकी आणि अभिलेखागारातील एतद्देशिय सामग्रीचा वापर इतिहास लेखनासाठी केला नाही. त्यामुळे त्यांनी केलेल्या मांडणीचे खंडन करता येते शिवाय आपण नवा इतिहास लिहत आहोत हा त्यांचा दावा फोल ठरतो.

या शिवाय सबाल्टर्न विचारप्रवाहात शामील असलेल्या सुमित सरकारांनीसुद्धा सबाल्टर्नचा विचार हा उत्तर वसाहतवादाकडे झुकल्यामुळे त्यावर टिका केली. *The Decline of Subaltern & Subaltern Studies* व *Oriental Revisited* या दोन लेखांतून सबाल्टर्न इतिहासकारांच्या उत्तर वसाहतवादाकडे वळणावर कळाडून टिका केली.

*Prof- Vijay p. Salunkhe Assistant Professor, Pratap College, Amalner*

# उत्तर आधुनिकवाद

## *(Post-Modernism)*

विसाव्या शतकाच्या अखेरच्या वीस पंचवीस वर्षांत पाश्चात्य जगातील, विशेषतः युरोपातील बौद्धिक क्षेत्रात संरचनावाद, उत्तर संरचनावाद, विरचनावाद, उत्तर वसाहतवाद असे काही संज्ञाप्रवाह प्रचारात आले. त्यापैकी एक महत्त्वाचा प्रवाह उत्तर आधुनिकवाद हा होय. यातील 'वाद' ह्या शब्दामुळे उत्तर आधुनिकवाद म्हणजे एक मोठा सिद्धांत असावा, त्यात एखादे मूलगामी तत्त्व अनुस्यूत असावे असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु उत्तर आधुनिकवाद हा एक सिद्धांत, अगर एकजिनसी विचार नाही; अनेक विचारांचा मिळून बनलेला तो एक संच आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्य जगात, तेथील जीवनपद्धतीत, संस्कृतीत, जीवनाच्या विविध घटकांत जे परिवर्तन झाले, त्याकडे पाहण्याचे बहुविध दृष्टिकोण, त्याबाबतच्या विभिन्न वैचारिक भूमिका यांचा गुंतावळा म्हणजे भुत्तर आधुनिकवाद होय. यामुळे ह्या संज्ञेचे स्वरूप गुंतागुंतीचे आहे. निधित अर्थवाही अशी ही संज्ञा नसल्यामुळे तिची एक सर्वंकष व्याख्या करणे अशक्य असल्याचे मत अलीकडील सर्व विचारवंत व्यक्त करतात. ह्या शब्दप्रयोगाचा वापर प्रथम स्थापत्य, कला, साहित्य ह्या क्षेत्रात करण्यात आला व त्यानंतर त्याचे लोण समाज, तत्त्वज्ञान, आर्थिक इतिहास इत्यादी क्षेत्रांत पसरले. अलीकडे पाश्चात्य जगात जे झपाट्याने सांस्कृतिक बदल घडून आले, त्याबाबतची चर्चा, त्यावरील भाष्य हा उत्तर आधुनिकवादाचा गाभा आहे.

अमेरिकेच्या कोलोराडो विद्यापीठातील प्राध्यापिका डॉ. मेरी क्लेग्ज *(Mary Klages)* यांनी उत्तर आधुनिकवादाबाबत भिन्न विचारवंतांनी वेगवेगळे विचार मांडलेले असल्यामुळे ह्या शब्दप्रयोगाची सर्वव्यापी व्याख्या करणे अशक्यप्राय आहे; असे मत मांडले असले, तरी त्याची पुढील प्रमाणे स्थूल व्याख्या केलेली आढळते. त्या म्हणतात "*Post-Modernism is the belief that direction, evolution and progress have ended in social history and society is based instead upon the decline of absolute truths and rise of relativity.*" (सामाजिक इतिहासात दिशा, उत्क्रांती व प्रगती लुप्त झाली आहे आणि वैश्विक चिरकालीन सत्याचा मूल्यांचा हास व सापेक्षतेच्या उदयाचा विचार म्हणजे उत्तर आधुनिकवाद होय.) *'Post-Modernism and the Environmental Crisis'* ह्या ग्रंथाचा लेखक ॲरन गेअर 'उत्तर आधुनिकवादाची केवळ व्याख्या करून त्या संज्ञेचे आकलन होत नाही. त्याचे आकलन योग्यरीत्या करून घेण्यासाठी वर्तमानकाळाची वैशिष्ट्ये समजून घेणे आणि आपली त्याबाबत काय प्रतिक्रियां असावी याचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे.' असे वक्तव्य करतो *("To define the post-modern is not just to define a term; It is to characterise the present age and to assess how we should respond to it")*

### उत्तर आधुनिकवाद :

संज्ञेचा उगम उत्तर आधुनिकवाद ह्या शब्दप्रयोगाचा वापर १९८० च्या शतकात होऊ लागल्याचे आढळते. फ्रेंच तत्त्वज्ञ जीन लिओटार्डचा "*The Post- Modern Condition- A Report on Knowledge*" ह्या शीर्षकाचा ग्रंथ १९७९ साली प्रकाशित झाला. तेव्हापासून ह्या विषयाने बुद्धिवंतांचे लक्ष वेधून घेतले. त्यावर चर्चा होऊ लागली. प्रारंभी साहित्याच्या व स्थापत्याच्या क्षेत्रात आलेल्या ह्या संज्ञेचा वापर सामाजिक, आर्थिक व्यवहार, तत्त्वज्ञान, इतिहास इत्यादी क्षेत्रात होऊ लागला. त्या आधारे भिन्न क्षेत्रांबाबत विचार मांडले गेले आणि अशा प्रकारे ह्या संज्ञेला बहुआयामी स्वरूप प्राप्त झाले. काही विचारवंतांच्या मते उत्तर संरचनावाद व उत्तर आधुनिकवाद ह्या पर्यायी संज्ञा आहेत. परंतु त्यांच्यात एक मूलभूत भेद आहे, तो म्हणजे उत्तर संरचनावाद ही संज्ञा प्रामुख्याने ज्ञानाच्या सिद्धांताबाबत आहे, तर उत्तर आधुनिकवादाचा संबंध समाज व संस्कृतीच्या क्षेत्रांशी आहे. काही सामाजिक तत्त्वज्ञांनी *Post-Modernity* व *Post-Modernism* हे दोन शब्दप्रयोग समानार्थी मानले आहेत. डेव्हिड लिऑन *(David Lyon)* याने *'Post-Modernity'* ह्या पुस्तकात ह्या दोन शब्दातील भेद स्पष्ट करताना *Post-Modernity* शब्दाला सामाजिक संदर्भ आहे, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील सामाजिक परिवर्तन तो शब्द दर्शवितो; तर *Post- Modernism* हा विचार

संस्कृतीशी, बौद्धिक दृष्टिकोणाशी निगडित आहे; मात्र ह्या दोन्ही बाबी परस्पर संबंधित आहेत; एकाचे सम्यक् आकलन करून घेण्यासाठी दोहोंचे आकलन आवश्यक आहे; असे मत व्यक्त करतो. (*In Post-Modernism the accent is on cul- turai while in Post-Modernity it is on social; but it is impossible to separate the two... to understand social change, one has to understand cultural change.)*

उत्तर आधुनिकवाद ह्या शब्दप्रयोगात उत्तर व आधुनिक हे दोन शब्द एकत्र जोडलेले दिसतात. याचा अर्थ कालक्रमानुसार आधुनिक नंतरचा असा होतो. परंतु उत्तर आधुनिकवादात केवळ कालक्रमाचा संदर्भ नव्हे, तर त्याहून अधिक अर्थ अभिप्रेत आहे. उत्तर आधुनिकवाद ही आधुनिकवादाविरुद्धची बौद्धिक व मानसिक प्रतिक्रिया आहे. या दृष्टीने उत्तर आधुनिकवाद समजून घेण्यासाठी प्रथम आधुनिकतेचे स्वरूप काय आहे? त्याची वैशिष्ट्ये काय आहेत? हे जाणून घेणे अगत्याचे आहे.

आधुनिक म्हणजे काय? सर्वसाधारणपणे अठराच्या शतकाच्या मध्यानंतरचा १९५० सालापर्यंतचा काळ हा आधुनिकतेचा काळ मानला जातो. यालाच सांस्कृतिक दृष्ट्या प्रबोधनाचा काळ (*Age of Enlightenment)* असे संबोधण्यात येते. प्रबोधनकाळाची जी व्यवच्छेदक लक्षणे आहेत, तीच आधुनिकतेची वैशिष्ट्ये आहेत. काही पाश्चात्य विद्वानांच्या मते -आधुनिकतेचा काळ प्रबोधन चळवळीच्या (*Renascence)* प्रारंभापासून सुरू होतो. सूक्ष्म दृष्टीने विचार केल्यास सोळाव्या शतकात युरोपमध्ये जी नवी वैचारिक मूल्ये प्रसृत होऊ लागली, त्या मूल्यांना अठराव्या शतकात दृढता प्राप्त झाली, ती समाज मनात खोलवर रुजली, आणि ती प्रबोधनाची मूल्ये आधुनिकतेची मूलभूत मूल्यव्यवस्था बनली. ही मूल्ये विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत पाश्चात्य जगातील बौद्धिक क्षेत्रावर अधिराज्य गाजवीत होती. त्यानंतर मात्र ही मूल्य व्यवस्था झपाट्याने कोलमडली, म्हणून आधुनिकतेचा काळ अठराव्या

शतका पासून तो विसाव्याच्या मध्यापर्यंत मानला जातो. वैचारिक दृष्ट्या प्रबोधन युगाचे तीन मुख्य आधार आहेत; पहिला विवेकवाद- अज्ञानावर मात करणारा, त्याचा नाश करणारा विवेकवाद; दुसरा अराजक व गोंधळातून मार्ग काढणारा सुव्यवस्थेचा व मानवी प्रगतीचा विचार ! आणि तिसरा निसर्गावर ताबा मिळविणाऱ्या शास्त्रीय ज्ञानाचे व तंत्रज्ञानाचे महत्त्व, प्रबोधनाची चळवळ व त्या चळवळीने प्रसूत केलेला विचार मुळात मानववादी होता, मानव केंद्रित होता. डॉ. मेरी क्लेग्ज यांनी प्रबोधनाची पुढील वैशिष्ट्ये नमूद केली आहेत. १) माणसाची जाण ही स्वायत्त आहे, स्थिर आहे, वैश्विक आहे २) बुद्धीच्या सहाय्याने माणसाला आत्मज्ञान व जगाचे ज्ञान प्राप्त करून घेता येते. ३) ज्ञानप्राप्तीचा मार्ग शास्त्रीय आहे व शास्त्रीय पद्धतीने मिळणारे ज्ञान सत्य व चिरंतन स्वरूपाचे आहे. ४) शास्त्रीय पद्धतीने मिळणारे सत्य हे शिव आहे, हितकारक आहे, ते माणसाला प्रगती पथावर नेते. ५) विवेक इष्ट व अनिष्टातील भेद सांगतो व माणसाला योग्य मार्गावर वाटचाल करण्यास मदत करतो. ६) विवेकाने प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या आधारे मानवी व्यवहारांचे विश्लेषण करता येते. नियम तयार केले जातात. मूल्ये निर्धारित केली जातात व ती पालन करण्याने माणसाच्या स्वातंत्र्याची जपणूक होते. ब्रिटिश तत्त्वज्ञ फ्रान्सिस बेकन हा प्रबोधनाचा प्रेषित मानला जातो.

अठराव्या शतकापर्यंत पाश्चात्य जगात अंधश्रद्धा, कल्पनारंजन, निसर्ग व मानवी जीवनाबद्दल अज्ञान पसरले होते, धर्माची मगरमिठी मानवी मनावर व बुद्धीवर असल्यामुळे मानवाची स्वतंत्र विचारशक्ती दडपली गेली होती. मानवी बुद्धीवर जमलेली ही अज्ञानाची काजळी विवेकवादाने दूर केली. निसर्गाचा व मानवी व्यवहारांचा बुद्धिनिष्ठरीत्या, शास्त्रीय पद्धतीने विचार होऊ लागला. त्यातून निघालेले फलित सुव्यवस्थित व सुसूत्रपणे, पद्धतशीररीत्या मांडले जाऊ लागले. यामुळे ज्ञानाच्या क्षेत्रातील गोंधळ नाहीसा होऊन, ज्ञानाला सुव्यवस्थितपणा आला; निसर्गाच्या अभ्यासातून निष्पन्न झालेल्या निष्कर्षांचा वापर भौतिक जीवनाच्या प्रगतीसाठी होऊ लागला. तंत्रज्ञानाचा विकास होऊन औद्यागिक उत्पादन वाढले, व्यापार वृद्धी झाली. निसर्गाच्या अभ्यासातून जसे काही सर्वसामान्य सार्वकालीन सिद्धांत शोधून काढता येतात, त्याचप्रमाणे शास्त्रीय पद्धतीने मानवी व्यवहारांचा अभ्यास करून त्याबाबत काही चिरंतन शाश्वत तत्त्वे शोधून काढता येतील, ह्या जाणिवेतून तत्त्वज्ञ मानवी समाजाच्या अध्ययनाकडे वळले आणि निसर्गात आढळून येणारे शाश्वत नियम मानवी जीवनातही आढळतात; असे त्यांचे ठाम मत बनले. मानवी जीवनाच्या विकासाच्या प्रक्रियेत काही सामान्य तत्त्वेचे आढळतात, ती तत्त्वे चिरकालीन सत्य आहेत. सर्वत्र मानव

समान व स्थिर असल्यामुळे संपूर्ण मानवजातीबद्दल सार्वकालीन व शाश्वत तत्त्वे हाती लागतात. त्यांचा अवलंब केल्यास अज्ञान, दारिद्रय, असुरक्षितता ह्यातून मानव जात मुक्त होऊन सतत प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करीत राहील, अशा पद्धतीने प्रगतीचा उच्चांक गाठणे अशक्य नाही, याच मार्गाने मानवाला स्वातंत्र्य अनुभवता येईल, हे सर्व विचार माणसाच्या जीवननिष्ठा बनल्या. मानवी जीवनाबाबत लोकशाही सारख्या आदर्श मूल्यांवरील निष्ठा, भौतिक विकास व मानवी प्रगतीवरील गाढ विश्वास आणि त्यातून निर्माण झालेला प्रचंड आत्मविश्वास ही आधुनिक जगाची वैशिष्ट्ये होती.

**मूल्यनिष्ठेचा ऱ्हास :-**

ह्या वैचारिक भूमिकेला छेद देणारे सूर विसाव्या शतकाच्या तिसऱ्या व चौथ्या दशकात उमटू लागले. व्हर्जिनिया वुल्फ, जेम्स जॉईस यांच्या लिखाणातून एकोणिसाव्या शतकातील आधुनिक निष्ठांवर, मूल्यांवर, तात्त्विक श्रद्धांवर टीका होऊ लागली. परंतु त्यांना प्रचंड हादरा दिला तो दुसऱ्या महायुद्धाने! ह्या युद्धात झालेल्या असीम मानवी संहाराने आणि युद्धानंतरही जागतिक शांततेचे स्वप्न हे मृगजळच राहिल्यामुळे विवेकवाद व शास्त्रीय ज्ञानाच्या मदतीने मानव प्रगतीचा उच्चांक गाठेल ह्या निष्ठेला धक्का बसला; नैतिक मूल्यांनी मानवी जीवन सुखकर व स्थिर केलेले नसून उलट दुःख, अस्थिरता व हिंसा वाढली आहे; प्रगती ऐवजी मानव अधोगतीच्या मार्गाने जात आहे; शास्त्रीय व तंत्रज्ञान विकसित झाले खरे, परंतु त्यातून हिंसाचार वाढला; दारिद्र्य व शोषण वाढले. वसाहतवाद व वंशवादासारखे अनिष्ट विचार वाढीला लागून स्वातंत्र्याचे मूल्य नष्ट झाले. लोकशाहीच्या विस्ताराऐवजी हुकुमशाही व्यवस्था आल्या व मानवी जीवन व स्वातंत्र्य असुरक्षित बनले. ह्या प्रत्यक्ष व सार्वत्रिक अनुभवामुळे आधुनिक काळातील प्रबोधनाची मूल्ये विवेकवाद, वैश्विक सत्याची संकल्पना, विज्ञान निष्ठा, चिरंतन तत्त्वे व प्रगतीचा विचार यांबाबत भ्रमनिरास झाला. वैश्विक सत्य म्हणून स्वातंत्र्य, समता यांसारखी जी मूल्ये जोपासली ती चिरकालीन व वैश्विक नाहीत; सांस्कृतिक वारशाचा विचार, तसेच आदर्श सांस्कृतिक मूल्यांची शिकवण देणारे लिखाण, मार्क्सवादासारखे संपूर्ण मानवजातीसंबंधीचे तात्त्विक सिद्धांत हे निरर्थक आहेत, कुचकामी आहेत; मानव जातीला स्थैर्य, सुरक्षितता देण्यास ते सर्व असमर्थ आहेत; परंपरागत शाश्वत मूल्ये इष्ट असतात ही श्रद्धा फोल आहे, भ्रामक आहे अशी मनोभूमिका जगात निर्माण झाली. १९०० ते १९५० च्या दरम्यान आलेल्या कटु अनुभवातून जन्माला आलेली आधुनिकतेची वैशिष्ट्ये असलेल्या प्रबोधनाच्या मूल्यांविरुद्धची ही नकारात्मक प्रतिक्रिया होती. विलीयम बटलर यीट्स् *(W.B. Yeats)* ह्या आयरिश कवीने पुढील ओळीत ह्या परिस्थितीचे समर्पक वर्णन केले आहे. तो म्हणतो "*things fall apart, the centre cannot hold, mere anarchy is loosed upon the world.*" ह्या प्रतिक्रियेचा शाब्दिक आविष्कार १९७० ते ८० च्या दशकात काही पाश्चात्य, विशेषतः फ्रेंच विचारवंताच्या लिखाणात आढळून येऊ लागला. आधुनिकते-विरुद्धच्या नकारात्मक प्रतिक्रियेतून उत्तर आधुनिकतेचा व उत्तर आधुनिकवादाचा जन्म झाला.

**उत्तर आधुनिक जग :**

विसाव्या शतकाच्या मध्यात अशा प्रकारे बौद्धिक भ्रमनिरास झालेला मानव हतबद्ध झाला; त्याची मूल्यनिष्ठा नाहीशी झाली. शास्त्रीय ज्ञानाच्या इष्टतेबद्दल जबरदस्त साशंकता निर्माण झाली. वर्षानुवर्षे उराशी बाळगलेली व जीवनाचा मूलाधार बनलेली तत्त्वे निरर्थक वाटू लागली. यामुळे एक भयानक वैचारिक पोकळी निर्माण झाली. परंतु याच काळात शास्त्रीय ज्ञानाची व तंत्रज्ञानाची प्रगती मात्र द्रुतगतीने होत राहिली; उत्पादन वाढले, व्यापाराने राष्ट्राराष्ट्रांतील सीमा ओलांडल्या; भांडवलाने देशाच्या सीमा पार करून नवी क्षेत्रे हस्तगत केली; वाहतुकीची साधने प्रचंड प्रमाणात विस्तारली. यातून जागतिकीकरणाला गती मिळाली. राष्ट्राराष्ट्रांतील सीमा धूसर होऊ लागल्या; जगातील भिन्न समाज परस्परांजवळ येऊ लागल्याने भिन्न संस्कृतींशी सरमिसळ होऊ लागली व एक व्यामिश्र स्वरूपाची संस्कृती उदयाला आली. तसेच भिन्न समाजांचा व संस्कृतींचा परिचय भिन्न क्षेत्रातील लोकांना करून देण्याचे

इतिहासलेखनातील प्रमुख प्रवाह / २५७ कार्य माहिती व प्रसार माध्यमांनी मोठ्या प्रमाणात केले. आकाशवाणी, दूरदर्शन, सिनेमा, छायाचित्रे, व्हिडिओ कॅमेरा, वृत्तपत्रे, नियतकालिके व मुख्यतः संगणक यांनी जगाच्या प्रत्येक कोपऱ्यातील समाजाला प्रकाशझोतात आणले. ज्ञानप्राप्तीची व साठवणीची नवी साधने उपलब्ध करून दिली. जगाच्या एका कोपऱ्याचे ज्ञान क्षणार्धात दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत पोहचू लागले. अशा प्रकारे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात नवा जागतिक समाज, नवी जागतिक संस्कृती निर्माण झाली. यात संगणकाचा सिंहाचा वाटा असल्यामुळे आधुनिकोत्तर जगाला 'संगणकाचे युग' असे संशोधण्यात येते.

उत्तर आधुनिकवादाचे स्वरूप :- अशा ह्या आधुनिकेत्तर समाजाचे दर्शन घडविणारे, त्याची चर्चा करणारे, त्यावर भाष्य करणारे समाजजीवनाच्या भिन्न क्षेत्रांतील त्याच्या स्वरूपाचे विश्लेषण करणारे लिखाण उत्तर आधुनिकवादाचे प्रतिनिधित्व करते, त्याचे दर्शन घडविते. तत्त्वज्ञान, साहित्य, कला, स्थापत्य, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास इत्यादी विभिन्न ज्ञानशाखांत अभिव्यक्त होणाऱ्या उत्तर आधुनिकवादाची काही समान वैशिष्ट्ये डॉ. मेरी क्लेग्ज यांनी नमूद केली आहेत, ती अशी: "*1) The decline of absolute truths 2) creation of relativity 3) lack of of direction & purpose in historical change, 4) decline of teleology 5) fragmentation and division of all academic subjects into a va- riety of perspectives with no answers and no agreeements and 6) frag- mentation of cultural forms into a playful celebration of chaos*" "वैश्विक चिरंतन सत्यावरील निष्ठेचा ऱ्हास २) सापेक्षतेचा प्रभावी विचार ३) ऐतिहासिक परिवर्तनाची दिशा व उद्दिष्ट यांच्या जाणिवेचा अभाव ४) प्रयोजनवादाचा ऱ्हास ५) सर्व विद्याशाखांचे विभाजीकरणआणि समस्यांची सोडवणूक करू न शकणाऱ्या विभिन्न दृष्टिकोणांचा उदय, ६) सांस्कृतिक प्रकारांचे विभक्तीकरण आणि सांस्कृतिक गोंधळ व अराजक मौजेने साजरा करण्याची प्रवृत्ती" आधुनिकोत्तर पाश्चात्य जगाचे बदललेले स्वरूप व त्याच्या विविध पैलूंवर भाष्य करणाऱ्या विद्वान अभ्यासकांच्या लिखाणातून उत्तर आधुनिकवादाची वैशिष्ट्ये स्पष्टपणे व्यक्त होतात. त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रांची चिकित्सा केलेली असल्यामुळे त्यांच्या लिखाणात एकजिनसी सूत्र नसले तरी आधुनिकोत्तर जगाचे त्यांचे विविध आयामी भाष्य त्यातून व्यक्त होते. ह्या लेखकांपैकी बहुतेक भाष्यकार मार्क्सवादाचे अभ्यासक होते हा मुद्दा ध्यानात घेण्याजोगा आहे. उत्तर आधुनिकवाद काही गोष्टी ठामपणे नाकारतो तर काही दृष्टिकोणाचा स्वीकार करतो.म्हणून त्याचे नकारात्मक व सकारात्मक असे दोन पैलू आहेत असे निदर्शनास येते.

१) नकारात्मक भूमिकेतील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रबोधन काळात आधारभूत असलेली तत्त्वे उत्तर आधुनिकवाद अमान्य करतो, नाकारतो व त्याज्य मानतो. म्हणून ती आधुनिकवादाविरुद्धची नकारात्मक प्रतिक्रिया आहे असे स्थूलमानाने म्हटले जाते. याला जीन लिओटार्ड महान वैश्विक सिद्धांतांचा, महारचनांचा (*meta narratives)* नकार असे म्हणतो. आधुनिकवादाने विवेकवाद, शास्त्रीय ज्ञानाचे महत्त्व व प्रगतीचा विचार दिला. परंतु आधुनिकोत्तर काळातील समाजात विवेकवादाने मानवी जीवनातील समस्या सुटल्याचे आढळत नाही, उलट विवेकवादाने पल्लवित केलेल्या मानवजातीच्या कल्याणाच्या, जागतिक शांततेच्या व सुखाच्या आशा धुळीला मिळालेल्या दिसतात. १९५० नंतर जागतिक शांततेचे स्वप्न मृगजळ ठरले, त्यानंतरही अनेक संघर्ष निर्माण झाले. दोन भिन्न जागतिक विचारप्रणालींनी हिंसक रूप घेतले.